# शब्द रुची

फेब्रुवारी २०१६
मूल्य १० रु.
पृष्ठे ५६



# ग्रंथाली पुस्तक प्रकाशन क्षणचित्रे



इंदिराबाई वाडीकर लिखित 'इंदिरेची स्मृतिकथा' या पुस्तक प्रकाशनसमयी डॉ. मधुकर वाडीकर, डॉ. द.दि. पुंडे, डॉ. नीलिमा गुंडी, डॉ. अरुणा ढेरे, दिनकर गांगल, ॲड. नितीन वाडीकर, प्रशांत कन्हाडे, सुदेश हिंगलासपूरकर.




अरुण घाडीगावकर लिखित 'प्रसंगरंग' या पुस्तक प्रकाशनसमयी धनश्री धारप, दीपक करंजीकर, पंडित शंकर अभ्यंकर, उदयजी सामंत, डॉ. जगदीश सामंत, लेखक अरुण घाडीगावकर, पत्नी मेघा घाडीगावकर, पुत्र आदित्य घाडीगावकर, पद्माकर शिवलकर आणि मोहन जोशी.



चिंतामण पांडुरंग जोशी लिखित 'द वाईस वर्ल्ड' या पुस्तक प्रकाशनसमयी नंदिनी टांकसाळे, लेखक आणि मोहन टांकसाळे.

'पुणे नगर वाचन मंदिर'तर्फे निलिमा गुंडी यांच्या हस्ते 'दृष्टिपटल' पुस्तकासाठी श्री.ज. जोशी पुरस्कार स्विकारताना माधवी मेहेंदळे.



४२

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# शब्द रुची

फेब्रुवारी, वर्ष तिसरे
अंक दहावा, मूल्य १० रु.

संपादक : सुदेश हिंगलासपूरकर
अतिथी संपादक : आल्हाद गोडबोले

**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे / अनिरुद्ध गद्रे**
granthaliruchee@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी १५० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ.'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, बुलन मिल म्युनिसिपल स्कूल,
तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प),
मुंबई ४०००१६ ☎ २४३०६६२४/२४२१६०५०
granthali01@gmail.com
granthali02@gmail.com
granthaliruchee@gmail.com
www.granthali.com

अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

## अनुक्रम



**संपादकीय / ४**

**मराठी संपादक परंपरेतील शेवटचा दुवा / ६**
दिनकर गांगल

**मोठ्या माणसाच्या छोट्या गोष्टी / १४**
अरुण साधू

**ग्रंथविश्वात रमणारा व्यासंगी / १८**
कुमार केतकर

**एशियाटिक सोसायटी आणि डॉ. टिकेकर / २२**
डॉ. मीना वैशंपायन

**निखळ विद्वान / २६**
सुनंदा भोसेकर

**टिकेकर आठवताना... / २९**
राणी दुर्वे

**पत्रकारितेतील गुरू / ३३**
अपर्णा पाडगांवकर

**तिसरा पर्याय / ३५**
डॉ. रविन थत्ते

**प्रतिसाद / ३७**
श्रीराम घैसास, लाखानसिंग कात्र, अभय बंग

**भयभीत अमेरिका / ३८**
डॉ. अनंत पां. लाभसेटवार

**'ग्रंथाली' ठाणे केंद्र : 'वाचकदिन' / ४१**
श्रीमती नंदिनी अविनाश बर्वे

**ग्रंथपाने / ४५**
**रोहन प्रकाशन, लोकवाङ्मय प्रकाशन, मैत्रेय प्रकाशन, मौज प्रकाशन, पद्मगंधा प्रकाशन, भारद्वाज प्रकाशन**


**ग्रंथाली ग्रंथपाने / ५१**

# संपादकीय...



संपादक आणि इतिहासाचा अभ्यासक अशी, डॉ. अरुण टिकेकरांची, दोन रूपे मी लांबून पाहिली आहेत.

टिकेकर संपादक असलेल्या वृत्तपत्रात त्यांच्याबरोबर काम करण्याचा योग माझ्या चार दशकांच्या पत्रकारितेत आला नाही. त्याला मीच कारणीभूत होतो, आणि आला असता तरी मी कितपत टिकू शकलो असतो, तेही सांगता येणार नाही. पण पुणे असू दे, मुंबई विद्यापीठ असू दे, महाराष्ट्रातील कुठलेही 'स्थल' आणि 'काल' असू दे, किंवा किंकेड पिता-पुत्र असू देत, त्यांनी लिहिलेल्या चिकित्सक पुस्तकांच्या रूपाने इतिहासात डोकावण्याची एक दृष्टी त्यांच्यामुळे लाभली, हे मान्य करावे लागेल.




टिकेकर लोकसत्ताचे संपादक झाले तेव्हा मी केसरीत होतो आणि मी त्यांच्या लोकसत्तात, पुण्यात वृत्तसंपादकपदावर यावे, अशी त्यांची इच्छा होती. त्यासाठी दोनदा गळ घालूनही मी गेलो नव्हतो - केवळ केसरीच्या स्पर्धेतील वृत्तपत्रात न जाण्याच्या तात्त्विक भूमिकेमुळे. पुढे मुंबईत आल्यावरही, त्यांच्याबरोबर काम करण्याचा योग आला नाही.

सांगण्याचा मुद्दा हा की, पत्रकार असलो तरी माझ्यात 'संपादक' किती अंश असेल, याची चाचपणी / चाचणी त्यांच्या कसोटीवर करून घ्यायला मी घाबरतही होतो काय, असे आता वाटते. असो.

मुंबईत त्यांची अधूनमधून भेट होई, तेव्हा छान बोलायचे - एकत्र काम करण्याचा योग न आल्याची अढी मनात येऊ न देता. मी प्रहार सोडल्यावर रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीत आम्ही दोन-चारदा एकत्र आलो. अलिकडच्याच एका भेटीत आमचे चीनविषयी बोलणे झाले, तेव्हा एकदा मनीषाला पण भेट, म्हणून आवर्जून सांगितले. ऐतिहासिक संदर्भमूल्ये असलेल्या पुस्तिका किंवा मोनोग्राफ प्रसिद्ध करण्याचे काम एशियाटिकच्या माध्यमातून टिकेकर हाती घेत असल्याचे कानावर होते. तोही एक धागा आमच्या चर्चेत होता.

संदर्भ होता, माजी संरक्षणमंत्री व्ही. के. कृष्ण मेनन यांचा.

भारत - चीन संदर्भात, विशेषतः १९६२ च्या युद्धाविषयी मराठीत दि. वि. गोखले, कर्नल शाम चव्हाण आदींचे तत्कालीन लिखाण किंवा ब्रिगेडियर जॉन दळवी, डी. आर. माणकेकर यांच्या इंग्लिश पुस्तकांचा अनुवाद असे तुरळक, तेही एकांगी वाचायला मिळते (शशिकांत पित्रे यांचे पुस्तक तोपर्यंत प्रसिद्ध झाले नव्हते). पण या युद्धाचा, त्यामागील कारणांचा अभ्यासपूर्ण (अर्थात तटस्थ) इतिहास - त्या घटनेला ५० वर्षे उलटून गेली तरी - पुस्तकरूपात मांडण्याचे धाडस का दाखविले जात नाही, हा माझा मुद्दा होता आणि त्याअनुषंगाने मेनन यांची बाजूसुद्धा समजून घेणे मला महत्त्वाचे वाटत होते. इंग्लिशमध्ये बरीच पुस्तके आता उपलब्ध असली तरी मेनन यांचे पुस्तकही असणे मला, किंबहुना कोणाही इतिहासाच्या अभ्यासकाला आवश्यक वाटावे.

म्हाळगी प्रबोधिनीच्या ग्रंथालयाला कुणीतरी देणगी म्हणून दिलेली - मेनन यांच्या चार दीर्घ भाषणांचे शब्दांकन असलेली, नकाशांसहित मुद्देसूद मांडणी करणारी, इंटरनेटच्या माहितीच्या महाजालातही कुठे न मिळणारी, दुर्मीळ अशी पुस्तिका (मोनोग्राफ) नुकतीच माझ्या पाहण्यात आली होती आणि एक ऐतिहासिक डॉक्युमेंटेशन म्हणून मला ती मोलाची वाटली होती. एशियाटिक सोसायटीत ती उपलब्ध असण्याची शक्यता होती आणि गरज पडल्यास मला ती टिकेकरांकडून मिळवायची होती. आता ती राहून गेली. पण मेनन यांची ही पुस्तिका किंवा मोनोग्राफ कुणी अजूनही प्रकाशित केला तर माझ्या लेखी ती टिकेकरांना श्रद्धांजलीच ठरेल.

**- आल्हाद गोडबोले**


भ्रमणध्वनी : ९५९४५४४८८८
alhadgodbole@gmail.com


# डॉ. अरूण टिकेकर यांच्या पुस्तकांवर २५% सवलत

रोहन प्रकाशन




वैचारिकतेची संस्कृती समाजमनात रुजावी यासाठी
उदारमतवादी पत्रकारितेचे व्रत प्रगल्भपणे जपणारा
व्यासंगी पत्रकर्मी म्हणून
**डॉ. अरूण टिकेकर**
कायम स्मरणात राहतील. लेखन आणि वाचन
यांच्या जोडीनेच ग्रंथनिर्मितीतील बहुमिती सौंदर्यमूल्यांबद्दल
निखळ आस्था बाळगणाऱ्या या आमच्या ज्येष्ठ सहृदास
विनम्र आदरांजली...
**॥ 'रोहन प्रकाशन' परिवार ॥**


## अरूण टिकेकर लिखित आमची पुस्तकं




अक्षरनिष्ठांची मांदियाळी
किं. रु.१४०




कालान्तर
किं. रु.१८०




Power Pen And Patronage
किं. रु.२९५

**'कालान्तर'च्या मनोगतासाठी याच अंकात रोहन प्रकाशनाचे ग्रंथपान जरुर पहा...**

**विशेष ऑफर
फक्त
रोहन प्रकाशनाच्या
मुंबई आणि पुणे
येथील कार्यालयात**

रोहन प्रकाशन

५ व ६ धवलगिरी, शनिवार पेठ, पुणे ४११०३०
☎ पुणे २४४८०६८६ मो. ८१४९१२०२१०
☎ मुंबई २३८९२३७८ मो. ९८६९११८७६२

अधिक माहितीसाठी
आमच्या वेबसाईटला भेट द्या
**www.rohanprakashan.com**

# मराठी संपादक परंपरेतील शेवटचा दुवा

**दिनकर गांगल**

**अरुण टिकेकर किती छोट्या, काही नसल्याच्या परिस्थितीतून कोठल्या कोठे पोचला होता! ऐश्वर्य संपादन केल्याच्या 'रॅग्ज टू रिचेस' कहाण्या सांगितल्या जातात, पण सोलापूरच्या एका गरीब घरातील मुलाने जे वैभव कमावले, जे अनन्य स्थान निर्माण केले त्यास तोड नाही. त्याने अभ्यासक म्हणून व पत्रकार म्हणून दोन्ही ठिकाणी भरीव कामगिरी केली.**



अरुण टिकेकरचे निधन आकस्मिक झाले. त्यामुळे तो धक्का आम्हा समवयस्कांना फार मोठा आहे. टिकेकर- त्याचे अचानक निधन झाले त्याच्या दुसऱ्या दिवशी सुहास बहुलकर यांच्या समवेत सोलापूरला जाणार होता. प्रख्यात जुने चित्रकार आलमेलकर यांची चित्रे संग्रहित करण्याचे काम त्यांना पार पाडायचे होते. बहुलकर सध्या स्वत: चित्रे काढण्याबरोबरच चित्रकलेचा जुना इतिहास संकलित करत निघाले आहेत. त्यांच्या त्या कामी टिकेकर हा त्यांचा मेंटॉर/आधार होता. टिकेकरचे मुंबईत 'ब्राह्मण सेवा मंडळा'त व्याख्यान सोलापूरच्या नियोजित ट्रिपनंतर आठवडाभरात ठरले होते. मला माहीत असलेले त्याचे हे दोन नियोजित कार्यक्रम. आणखीही काही असतील. त्याचे 'एशियाटिक'मधील प्रकल्पाचे व त्याच्या स्वत:च्या पुस्तकांचे काम चालू होतेच.

टिकेकरला मृत्यू आला त्याच्या एक-दोन दिवस आधी त्याला खोकला झाला होता. नेब्युलायझर लावून छातीतून कफ काढून टाकण्याचा बेत डॉक्टरांनी आखला होता. मृत्यूच्या आदल्या रात्री त्याने जेवण घेतले, टीव्ही पाहिला, सकाळी उठून चहा घेतला, दिवसभराच्या कार्यक्रमाची आखणी चालू असताना, समोर बसल्या अवस्थेत त्याने मान खाली टाकली असे त्याची पत्नी, मनीषाच्या बोलण्यात आले. माणसाच्या जीवनाची अशाश्वतता तिला भेदून गेली. ती भीती तिच्या चेहऱ्यावर त्यानंतर काही दिवस दिसत होती; पतीला गमावल्याचे दु:ख अधिक खोलवरपर्यंत होतेच.

टिकेकरची सत्तरी उलटली होती. त्याची नोकरीधंद्यातील कारकीर्द पूर्ण झाली होती. पण त्याच्या लेखन-संशोधन-संपादनाचा पसारा मोठा होता. त्याच्या वीसहजारांहून अधिक पुस्तकांच्या संग्रहाची मांडामांड सतत चालू असायची. त्यात भर पडायची, त्यातील कोणते तरी पुस्तक कोणाला तरी संदर्भासाठी द्यायचे/दाखवायचे असे. मराठी संस्थात्मक व मान्यवरांचे जग त्याच्याकडे विद्वान म्हणून मुख्यत: पाहत होते - ती त्याची भूमिका फार जबाबदारीची होती.

अरुण टिकेकर किती छोट्या, काही नसल्याच्या परिस्थितीतून कोठल्या कोठे पोचला होता! ऐश्वर्य संपादन केल्याच्या 'रॅग्ज टू रिचेस' कहाण्या सांगितल्या जातात, पण सोलापूरच्या एका गरीब घरातील मुलाने जे बुद्धिवैभव कमावले, जे अनन्य स्थान निर्माण केले त्यास तोड नाही. त्याने अभ्यासक म्हणून व पत्रकार म्हणून दोन्ही ठिकाणी भरीव कामगिरी केली. तो पैसेवाला किती होता ते मला माहीत नाही. त्या संबंधात गेल्या पंचेचाळीस वर्षांत आमचे कधी बोलणे झाले नाही.

'लोकसत्ता'चे संपादक ह.रा. महाजनी गेल्यानंतर त्या

वर्तमानपत्राला त्यांच्या काळाची प्रतिष्ठा राहिली नाही. त्यात 'महाराष्ट्र टाइम्स'चा जन्म झालेला. 'मटा'ने पहिल्या पदार्पणातच बुद्धिजीवी वर्गाचे लक्ष वेधून घेतले. दृष्टीची कल्पकता, मजकुराची विविधता आणि लेखनाची गुणवत्ता या सर्व बाबतींत 'मटा' बरचढ ठरत गेला. परंतु मटा'स लोकसत्ते'चा खप काही मिळेना. त्यातून एक वेगळीच स्पर्धा सुरू झाली. त्या चुरशीचा भाग म्हणून माधव गडकरी 'लोकसत्ते'त संपादक म्हणून आले. गडकरी हे 'चौफेर' पत्रकार. त्यांच्या अंगात व्यावसायिकता भिनलेली. त्यामुळे त्यांना मराठी संपादक सर्क्युलेशन मॅनेजरदेखील असावा लागतो अशी व्यावहारिक जाणीव होती. त्यांची वाणी खणखणीत आणि लेखणी ओघवती. त्यांनी 'लोकसत्ते'चा लौकिक वाढवला आणि प्रतिष्ठा संपादण्याचा भाग म्हणून अरुण टिकेकरला लोकसत्ते'त आणले. टिकेकर हा अभ्यासूपणाची ओढ आणि उत्साह यांचे अजब मिश्रण होता. त्याची ग्रंथसंपदा मोठी होती, त्याचे संदर्भज्ञान सूक्ष्म होते. विषयात खोलवर जाण्याची वृत्ती होती आणि स्वीकारल्या कामासाठी अपार कष्ट करण्याची तयारी! त्याने लाला लजपतराय कॉलेजमध्ये व्याख्याता म्हणून असल्यापासून अशा गुणांच्या आधारे ज्येष्ठ साहित्य-कला वर्तुळात कौतुक मिळवले होते. स्वाभाविकच, टिकेकरचे 'लोकसत्ते'तील आगमन उभयपक्षी हुशारीचे ठरले.

टिकेकरने त्याच्या ऐन घडणीच्या काळात मोठे धाडस केले. ते म्हणजे त्याने कॉलेजातील सुखाची नोकरी सोडून 'अमेरिकन लायब्ररी ऑफ काँग्रेस'मधील दिल्लीतील कष्टाची व जबाबदारीची नोकरी पत्करली. त्या नोकरीत अधुनमधून फिरतीदेखील होती. टिकेकरला लायब्ररीच्या त्या कामामुळे दिल्लीचे विशाल जग पाहण्यास मिळाले; अखिल भारतीय दृष्टी लाभली. त्याचे ग्रंथप्रकाशन, साहित्यजगतातील संबंध दृढ झाले. अमेरिकन कार्यपद्धतीचा परिचय झाला. मुंबईहून दिल्लीला गेलेला टिकेकर व तेथून मुंबईला परत आलेला टिकेकर यांत प्रचंड अंतर होते.

त्याची ओढ पूर्णवेळ पत्रकारितेकडे होती. तो तशी संधी शोधत होता. तो एम.ए.ची परीक्षा देत असताना व नंतर कॉलेजात नोकरी करू लागला तरी 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये नियमित येई व साहित्यिक-सांस्कृतिक विषयांवर लेखन करी. इंडियन एक्स्प्रेस, टाइम्स यांमध्ये मराठी नाटकांची परीक्षणे करी. तो त्याचे काका प्रसिद्ध पत्रकार श्री. रा. टिकेकर यांच्याकडे गिरगावात राहत असे. तोही मोठा संस्कार त्याच्यावर होता. त्यामुळे तो शिक्षणक्षेत्रात असला तरी त्याच काळात अर्धा पत्रकार होता.

मी 'मटा'ची रविवार पुरवणी संपादित करत असल्यामुळे माझा व टिकेकरचा संबंध वारंवार येई व त्यातून आमचा स्नेह दृढ जुळला, त्या काळात त्याने अनेकविध विषयांवर 'मटा'त लेखन केले. साहित्य-संस्कृती संस्थांचे साचलेपण, शैक्षणिक क्षेत्रातील ढोंगबाजी असे विषय त्याला त्रास देत, तर विद्वत्ता, कलाक्षेत्रातील चमक त्याला आकृष्ट करे. त्याच्या विविध लेखनातून त्याचे ते कल स्पष्ट होत. आमच्या दोघांच्या सिनेमा-नाटक-साहित्य अशा काही आवडी समान होत्या व त्यात लुडबुड करायला दोघांना आवडे. त्यात आम्ही 'ग्रंथाली'चा आरंभ केला. मी, कुमार केतकर, अशोक जैन, अरुण साधू असे अनेक विविध कौशल्ये असलेले लोक ग्रंथप्रसाराचे काम घेऊन एकत्र आलो. त्यात टिकेकर बाजूला असायचा. तो बाजूला अशासाठी, की आमच्यासारखे स्वभावाला सहज मुरड घालणे त्याला जमत नसे. टिकेकरचे काही आग्रह तीव्र असत. सचोटी, न्यायप्रियता, तत्त्वप्रेम सर्वांनाच हवे असते, पण काही लोक ते फोडाप्रमाणे जपतात व तसे सांगत राहतात. टिकेकर त्यातला होता. व्यवहारात चार माणसे एकत्र येतात, तेव्हा तत्त्वांबरोबर भावना येतात, मग तत्त्वांची धार कमी होते. ते तशा लोकांना मान्य होत नाही. त्यातूनच टिकेकरचे काही वाद झाले. तशा




**टिकेकरने त्याच्या ऐन घडणीच्या काळात मोठे धाडस केले. ते म्हणजे त्याने कॉलेजातील सुखाची नोकरी सोडून 'अमेरिकन लायब्ररी ऑफ काँग्रेस'मधील दिल्लीतील कष्टाची व जबाबदारीची नोकरी पत्करली. लायब्ररीच्या त्या कामामुळे त्याचे ग्रंथप्रकाशन, साहित्यजगतातील संबंध दृढ झाले. अमेरिकन कार्यपद्धतीचा परिचय झाला. मुंबईहून दिल्लीला गेलेला टिकेकर व तेथून परत मुंबईला आलेला टिकेकर यांत प्रचंड अंतर होते.**

वेळी तो लहान मुलासारखा अबोला धरी. त्याचे लहान मुलाप्रमाणे रुसवेफुगवे ही वेगळीच गंमतीदार गोष्ट होती.

टिकेकर दिल्लीची नोकरी सोडून मुंबईला 'टाइम्स'च्या संदर्भ विभागाचा प्रमुख म्हणून आला आणि त्याच्या बुद्धीला व कार्यक्षमतेला खरा वाव मिळाला. त्याला गोविंद तळवलकर, दि.बि. गोखले असा नियमित विद्वत्सहवास लाभला. टाइम्स'च्या संपादकवर्गाबरोबर त्याच्या चर्चा होऊ लागल्या. त्यांना लेखनासाठी संदर्भ पुरवताना त्याची स्वत:ची तयारी होत गेली. त्याने 'एशियाटिक लायब्ररी'च्या संशोधन, लेखन, ग्रंथपालन अशा तिन्ही वर्तुळात शिरकाव केला व तेथेही त्याच्या नावाचा दबदबा वाढू लागला आणि त्याने 'मटा'च्या सहसंपादकपदी उडी मारली. मुख्य संपादक तळवलकर त्याच्यावर पूर्ण विसंबून राहू लागले. तळवलकरांच्या पिढीचे संपादक मॅनेजमेंटशी फार संबंध ठेवत नसत. त्यांना जनरल मॅनेजरांना नोट्स लिहिणे, प्रस्ताव सादर करणे, त्यासाठी त्याचे मन वळवणे या ऑफिसच्या गोष्टी जमत नसत. टिकेकर तशा 'नोट' लिहिण्यात प्रवीण होता. त्यावेळी वदंता अशी होती, की तळवलकर 'मटा'च्या संपादकपदावरून निवृत्त झाले, की टिकेकर त्या जागी येणार! पण तसे होणे नव्हते. मराठी साहित्य-संस्कृती जगातील तीन जोड्या का फुटल्या हे कोडे मला उलगडलेले नाही, कोणा जाणकाराने त्याबाबत मला कधी काही सांगितलेही नाही. त्यातील एक जोडी तळवलकर-टिकेकर यांची. (अन्य दोन - इंडियन एज्युकेशन सोसायटीचे माणिकराव लोटलीकर व एकनाथ ठाकूर यांची आणि दुसरी मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाचे संस्थाधिपाल अच्युत तारी आणि तेथील वाङ्मय मंडळाचे प्रमुख व कवी रमेश तेंडुलकर यांची.)

टिकेकरला माधव गडकरी यांनी उचलले. तो वर्षभरातच लोकसत्ते'चा संपादक झाला. टिकेकरने 'लोकसत्ते'ला दर्जा प्राप्त करून दिला. मराठी वाचकवर्गात 'लोकसत्ते'चे नाव आदराने घेतले जाऊ लागले. तोपर्यंत केशकर्तनालये, दुकाने, डॉक्टरांचे दवाखाने यांची शोभा असलेला 'लोकसत्ता' साहित्य सहवासातील घराघरात विराजमान होताना दिसू लागला.

**टिकेकरला बुद्धिजीवी समाजाचे अस्तित्व हवे होते. तशा व्यक्तींचा संचार सर्व क्षेत्रांत असावा, त्यांनी त्या त्या क्षेत्राचे नेतृत्व करावे असे त्याला वाटे. त्यामुळे ग्रंथालये, पुस्तके यांविषयी त्याला अपार प्रेम होते. त्याच कारणाने बहुधा तो एकोणिसाव्या शतकाच्या ब्रिटिश इंडियाच्या प्रेमात होता. रानडे-गोखले यांच्यावर त्याने व्याख्याने दिली. तो त्याला आवडणारे असे बुद्धिप्रवण काम करत गेला व त्यात तो संतुष्ट होता. त्याच्या कुरबुरी असत त्या माणसांच्या सर्वसामान्यतेतून निर्माण झालेल्या असत.**




टिकेकरचा दृष्टिकोन ताजा होता, त्याला अभ्यासविषयांची, छंद-वेड-कला यांची सखोल माहिती होती. लोकांना लेखनप्रवृत्त करण्याची हातोटी होती. त्याने महाराष्ट्रभरच्या विविध थरांतील व पेशांतील लोकांना लिहिते करून वर्तमानपत्रातील स्तंभलेखनास प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. दरवर्षी जानेवारीपासून नवे स्तंभ कोणते? व त्यासाठी कोणा लेखकांना टिकेकर पाचारण करणार हा औत्सुक्याचा विषय झाला. स्तंभलेखनांची योजना हा नंतर वर्तमानपत्रांतील पुरवण्यांसाठी पायंडा पडला. मात्र त्यामधून दोष असा तयार झाला, की अनाहुत लेखनास वर्तमानपत्रांत स्थान राहिलेले नाही! ते वर्तमानपत्रांच्या सध्याच्या स्वरूपास सोयीचेही आहे.

टिकेकरला स्वत:लाही लिहिण्याची आवड होती. किंबहुना, त्या ओढीतूनच तो वर्तमानपत्रांकडे वळला होता. त्याने 'मटा' व 'लोकसत्ता' या दोन्ही ठिकाणी खूप लेखन केले. मात्र संपादकांना हौस असते व त्यांना त्यांचा तो अधिकार वाटतो, तसा तो सर्व विषयांवर सदा सर्वकाळ लिहीत राहिला नाही. त्याने चोखंदळपणा ठेवला. त्याचे 'जनमन', 'स्थलकाल' व 'तारतम्य' हे स्तंभ खूपच गाजले. 'स्थलकाला'तून महाराष्ट्राचा आगळावेगळा इतिहास प्रकटला. 'जनमना'तून समाजाविषयी विविधरंगी माहिती मिळे. त्यातील संग्रहित चित्रे हा वेगळाच ठेवा होय. अभिजन, महाजन हे शब्द त्यातून रूढ झाले. 'तारतम्य' वाचायला थोडे अवघड असे, पण त्यामधून टिकेकरची मते निर्भीडपणे व्यक्त होत. तो महाराष्ट्र टाइम्समध्ये सहसंपादक असताना टोपणनावाने एक हलकाफुलका छोटेखानी स्तंभ अग्रलेखाच्या पानावर लिहित असे. प्रवीण टोकेकरचे 'सकाळ'मधील लेखन वाचताना त्याची आठवण येते. एरवी, त्याने लोकसत्तेसोबत 'लोकमुद्रा' नावाची अफलातून पुरवणी काही काळ सादर केली. ते साहित्यसंस्कृतीच्या अभिरुचीसंपन्न रसिकजनांसाठी खाद्य असे. त्यामध्ये बुद्धिचातुर्यास खूपच आव्हान व आवाहन असे. 'लोकमुद्रे'च्या पहिल्या पानावर अनेक साहित्यिक-कलावंतांनी काही ना काही निमित्ताने त्यांची भूमिका मांडलेली आहे. तो मोठा विचारप्रबोधनाचा भाग ठरे. फेसबुकवरील उत्तम चर्चा, वाद-प्रतिवाद, माहिती पाहिली की मला 'लोकमुद्रा'

## समता संघर्ष मार्गदर्शिका

संपादन : सुनील दिघे

**समता संघर्ष मार्गदर्शिका पुस्तकाची वैशिष्ट्ये :**

- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उभारलेले जनतेचे संघर्ष.
- भारतीय संविधानातील निवडक व महत्त्वाची कलमे.
- संविधानाची पहिली प्रत, देखणे स्वरूप (वर्णनात्मक) आणि डॉ. आंबेडकरांची त्यावर असलेली स्वाक्षरी.

पाने : २६२ / किंमत : ₹ ३००




## भक्ती आणि धम्म

रावसाहेब कसबे

'**भक्ती आणि धम्म**' या ग्रंथात भक्तीची शक्तिशाली, संघर्षशील, विद्रोही आणि बंडखोर रूपे प्रसिद्ध विचारवंत डॉ. रावसाहेब कसबे यांनी दाखवली आहेत. जगभर तयार झालेले विविध भक्तिप्रवाहांचे सम्यक दर्शन हा ग्रंथ घडवतो. भारतातील बाऊल, अलवार यांसारखे दुर्लक्षित प्रवाहही या ग्रंथात अवतरतात.

पाने : ६९६ / किंमत : ₹ ९७५

सवलतीत : ₹ ७००

# लोकवाङ्मय गृह

## नवी पुस्तके

### एकेकाळी गाजलेल्या रशियन कथांच्या मराठी अनुवादांचे पुनःप्रकाशन



**५ पुस्तकांचा संच**
**किंमत रुपये ५००/-**
**सवलतीत रुपये ४००/-**
**१० संचापेक्षा अधिक संच खरेदी केल्यास सवलतीत रुपये ३५०/-**

पिपल्स बुक हाऊस :
१५, मेहेर हाऊस, कावसजी पटेल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
✆ २२८७ ३७६८
लोकवाङ्मय गृह :
भूपेश गुप्ता भवन, ८५, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५.
✆ २४३६ २४७४ / फॅक्स : २४३१ ३२२०.
E-mail : lokvangmayagriha@gmail.com

आमची निवडक पुस्तके
**BookGanga.com/newshunt.com**
वर उपलब्ध आहेत.

## मराठीतील स्त्रियांची कविता

प्रभा गणोरकर

कोणत्या सामाजिक, सांस्कृतिक पर्यावरणात स्त्रिया लिहीत आहेत, त्यांच्या कवितेच्या आशयात, काव्यविषयक दृष्टिकोनात, शैलीत कसकसे बदल होत आले आहेत आणि मराठीच्या प्रदीर्घ काव्यपरंपरेत स्वतःचे स्वतंत्र स्थान निर्माण करणारी स्त्रियांची कविता आज कोणत्या टप्प्यावर उभी आहे याची चिकित्सा करणारा ग्रंथ.

पाने : २६८ / किंमत : ₹ ३२०




## पायपीट

सतीश काळसेकर

'वाचणाऱ्याची रोजनिशी' या वाचकप्रिय ठरलेल्या गद्यलेखनानंतरचे, कवी सतीश काळसेकर यांनी गेली पन्नासहून अधिक वर्षे देशात केलेल्या भ्रमंतीच्या अनुभवावर आधारित असलेले नवे पुस्तक. मराठी साहित्यात प्रचलित असलेल्या प्रवासवर्णनांपेक्षा काहीसे निराळे प्रवासवर्णन.

पाने : २३६ / किंमत : ₹ २५०



ही पुरवणी फेसबुकची पूर्वसुरी होती असे वाटते. 'लोकमुद्रा' हे स्वतंत्र साप्ताहिक करण्याचा टिकेकरचा प्रस्ताव टिकला नाही, कारण 'लोकमुद्रे'ला जाहिरातींचे पाठबळ मिळत नव्हते.

टिकेकरला बुद्धिजीवी समाजाचे प्रभावी अस्तित्व हवे होते. तशा व्यक्तींचा संचार सर्व क्षेत्रांत असावा, त्यांनी त्या त्या क्षेत्राचे नेतृत्व करावे असे त्याला वाटे. तेही ग्रंथालये, पुस्तके यांविषयीच्या त्याच्या प्रेमाच कारण होते. त्याच कारणाने बहुधा तो एकोणिसाव्या शतकाच्या ब्रिटिश इंडियाच्या प्रेमात होता. ती अभिजातता त्याला मोहक वाटे. टिकेकरने 'सकाळ' व 'लोकमत' या वर्तमानपत्रांमध्येही संपादकपदाच्या तशा जबाबदाऱ्या नंतर पत्करल्या, पण तो तेथे प्रभाव पाडू शकला नाही. त्याच काळात त्याने 'एशियाटिक'मध्ये अधिकाधिक जबाबदाऱ्या स्वीकारल्या, मुंबई विद्यापीठाचा इतिहास इंग्रजी-मराठीमध्ये ललित शैलीत लिहिला. रानडे-गोखले यांच्यावर व्याख्याने दिली. तो त्याला आवडणारे असे बुद्धिप्रवण काम करत गेला व त्यात तो संतुष्ट होता. त्याच्या कुरबुरी असत त्या माणसांच्या सर्वसामान्यतेतून निर्माण झालेल्या असत.

मराठी समाज निर्बुद्ध, मूढ होत चालला आहे यावर टिकेकर कडाडून हल्ला चढवत असे. त्याचे निदान, विश्लेषण बिनचूक वाटे, पण त्यावर उपाय काय याबाबतची चर्चा आदर्शवादी राही. आपल्याकडील बहुतेक विद्वानांना गेला काळ अभ्यासाचा वाटतो, त्याचे संदर्भ जमा करण्यात, दाखले देण्यात संशोधनाची, हुशारीची चमक वाटते. तीच बुद्धिमत्ता! त्यांना बदलता काळ, तंत्रज्ञानाचा प्रभाव, बहुमाध्यमांचा सर्व क्षेत्रांतील हस्तक्षेप यांमुळे आमजनांची बदलत चाललेली मानसिकता याबद्दल विचार करावा असे फारसे वाटत नाही. त्यांना समाज आणि प्रस्थापित व्यक्ती व तशा संस्था यांचा 'कनेक्ट' मुळीसुद्धा राहिलेला नाही हे जाणवत नाही. खरे तर, ते लक्षात आणून देणे ही माध्यमांची जबाबदारी, परंतु माध्यमांतील ज्येष्ठ स्वत:च बघताबघता प्रस्थापित होतात. रुढीत अडकतात. त्यांची वैचारिक मांडणी जुन्या, रूढ डाव्या-उजव्या वादांच्या आधारे अथवा भारतीय आध्यात्मिक बैठकीच्या आधारे होत असते. टिकेकर यांतील दुसऱ्या पंथातील होता व म्हणून आदर्शवादी होता. तो वृत्तीने अभिजाततेत, कल्पनारम्यतेत (रोमँटिक) रमणारा होता. मनीषा ही त्याची विदुषी पत्नी. ती स्वतंत्रपणे तशीच अभ्यासू व विचारी व्यक्ती. त्याच्याकडून तिची पसंती टिकेकरच्या तशाच कोमल भावनेतून झाली असावी.

टिकेकर डॉ. महिषी, रा.भा. पाटणकर, अशोक रानडे यांच्या मुशीत तयार झाला होता. त्याने अभ्यासाचे क्षेत्र निवडले ते एकोणिसाव्या शतकातील ब्रिटिशांच्या प्रभावाखालील महाराष्ट्र हे. त्याला ते वेड लागले असावे, तो किंकेड पिता-पुत्रांवर पीएच.डी.चा अभ्यास करत असताना. ते दोघे सोलापूर-साताऱ्यातील ब्रिटिश अधिकारी. ते लेखक होते. त्यांची कारकीर्द व लेखन हा टिकेकरचा पीएच.डी.चा विषय. त्याने तत्संबंधी माहिती मिळवताना अपार कष्ट घेतले. त्याने तेव्हापासून त्या प्रकारची पुस्तके जमा करण्यास जी सुरुवात केली तो संग्रह अखेरपर्यंत वाढत राहिला. तो त्याची दालनभर पुस्तके कौतुकाने दाखवी. महंमदअली रोडवरील 'कोकीळ अँड सन्स' आणि मेट्रोसमोरील 'ओल्ड अँड न्यू' ही पुस्तकांची दुकाने म्हणजे त्याचे अड्डे असत. तेथील पुस्तकांची त्या दुकानदारांना नसेल एवढी माहिती त्यास असे. तो त्या दुकानदारांबद्दल मित्रभावाने

बोलत असे. त्याचा नव्या खरेदी केलेल्या दुर्मीळ पुस्तकांवर अतिममतेने हात फिरे – जणू नवजात अर्भकच!

टिकेकर संस्थात्मक कामात, चळवळीत अडकणारा नव्हता. कारण त्याचे स्वतःचे नियम असत. त्यामुळे त्याने 'ग्रंथाली'च्या आरंभकाळात कामे अनेक केली; अगदी पुस्तकांचे गठ्ठे वाहून 'साहित्य सहवासा'त घरोघरी नेऊन दिली, परंतु तो 'ग्रंथाली'च्या संस्थापक मंडळींत सामील झाला नाही. त्याचे वडील सोलापुरात सायकलवरून घरोघरी लायब्ररीची पुस्तके पोचवत. तो काळ वेगळा होता. मर्यादित समाजगट पुस्तके वाचू शकत होता. त्यामुळे त्या अभिरुचीला टोक होते. टिकेकर ग्रंथप्रसाराच्या कामाकडे त्या अभिजात नजरेने पाही. तशा वृत्तीने वाटलेला लोकांना शिक्षणप्रसार झाल्यावर पुस्तक हेदेखील त्या विशिष्ट काळात त्यांच्या कला-ज्ञानार्जन यासाठी महत्त्वाइतकेच माहितीचे माध्यम ठरले आहे याची जाणीव राहिली नाही व ते पुस्तकांकडे खजिना म्हणूनच पाहत राहिले. टिकेकर त्यातला होता. त्याला म्युनिसिपालटीच्या शाळांत व आदिवासी भागांत पुस्तके प्रदर्शनासाठी मांडणे कौतुकाचे वाटे, पण ते काम त्याच्या प्रकृतीत बसत नव्हते. अर्थात टिकेकरने पुढे संस्थात्मक पदे स्वीकारली तेव्हा ती कार्यनिष्ठेने निभावली. कारण ती त्याच्या अभिजाततेच्या आवडीशी मिळणारी-जुळणारी होती. त्याने टाइम्सच्या संदर्भ ग्रंथालयास आधुनिक वळण दिले, लोकसत्तेचा संपादक म्हणून वृत्तपत्रीय संयोजनास नवी दिशा दिली. त्या पगारी नोकऱ्या होत्या, परंतु त्याने एशियाटिकचा अध्यक्ष म्हणून केलेली कामगिरी अतुलनीय आहे. ब्रिटिश काळात स्थापन झालेली ती संस्था मोडकळीस आली होती. टिकेकरने ती वास्तू सांभाळलीच, पण त्याहून अधिक महत्त्वाचे म्हणजे तेथील ज्ञानपरंपरा पुनरुज्जीवित केली. निधीचा पुरवठा सुरळीत केला. तो योग्य कामी लावला. तेथे पदाधिकारी म्हणून नवी माणसे आणली. संस्थेत नवचैतन्य आणले. त्याने संस्थात्मक कष्टाचे काम करत असताना तेथे संशोधनाचे उत्तम कामही आरंभले. त्याच्या त्या प्रकल्पात मौलिक अशा तीस-बत्तीस पुस्तिका तयार होत आहेत. एकोणिसाव्या शतकात ज्या ब्रिटिश व्यक्तींनी येथे जी कामगिरी बजावली त्याची ती ऐतिहासिक नोंद आहे (मोनोग्राफ). त्या कामी त्याने अनेक व्यक्तींना अभ्यास करण्यास व सुगम लिहिण्यास लावले. प्राध्यापकाची शिस्त व पत्रकाराचे सद्यकालाचे भान असलेला चटपटीतपणा यांचे झकास मिश्रण त्याच्या लेखनाच्या व संपादकीय कामगिरीमध्ये दिसून येते.

त्याच्या त्या प्रकल्पपुस्तकांबाबतही आमच्यात मजेदार संवाद घडत. मला विसाव्या शतकांत व विसाव्या शतकाच्या आरंभी ब्रिटिश अधिकाऱ्यांनी व सुधारकांनी जी कामे येथे केली, तितक्याच महत्त्वाची कामे येथील लोकांनी केली आहेत हे जाणवते व त्याची यथार्थ नोंद नाही हे खटकते. तळवलकर हे ब्रिटिशधार्जिणे संपादक. त्यांना 'इंग्लिशमन' म्हटले, की गुदगुल्या होत. ते स्वतःला वाचस्पती म्हणवत, पण टिकेकर एक पाऊल पुढे होता. तो अभ्यास करी. तसे करता करता तो 'ब्रिटिश' झाला. त्याने एशियाटिकच्या प्रकल्पामध्ये एकोणिसाव्या शतकातील तीस इंग्लिश लोक जसे शोधून काढले तसे (मी म्हणे) महाराष्ट्रात कितीतरी विविध महत्त्वाची, खास कामे केलेले, त्या काळातील लोक आहेत. त्यांची नोंद कोणी करायची? त्यांचा अभ्यास त्या ब्रिटिश व्यक्तींच्या कार्याच्या अभ्यासाइतकाच महत्त्वाचा नाही का? किंबहुना ती कामगिरी अधिक मोलाची आहे असे मला वाटते. महाराष्ट्रातील खेडोपाडीच्या छोट्यामोठ्या व्यक्ती कशा उपेक्षित राहून गेल्या हे 'ग्रंथाली-ज्ञानयज्ञा'त स्थानिक इतिहासाची पुस्तके करताना लक्षात येई. तशा नोंदींकडे या 'ब्रिटिश' अभ्यासकांचे लक्ष नसे. त्यामुळे 'इंग्लिशमन' हा एक कल्ट होऊन गेला. मी असे काही म्हटले तरी टिकेकर ते हसण्यावारी नेई.


टिकेकर हा अभ्यासू पत्रकारांच्या परंपरेतील बहुधा

**त्याने 'एशियाटिक'चा अध्यक्ष म्हणून केलेली कामगिरी अतुलनीय आहे. ब्रिटिश काळात स्थापन झालेली ही संस्था मोडकळीस आली होती. टिकेकरने ती वास्तू सांभाळलीच, पण त्याहून अधिक महत्त्वाचे म्हणजे तेथील ज्ञानपरंपरा पुनरुज्जीवित केली. निधीचा पुरवठा सुरळीत केला. तो योग्य कामी लावला. तेथे पदाधिकारी म्हणून नवी माणसे आणली. संस्थेत नवचैतन्य आणले.**




शेवटचा दुवा. त्याचा समकालीन कुमार केतकर. त्याच्या व्यासंगाला व प्रगल्भतेला तोड नाही. त्या दोघांचा उल्लेख मराठीतील शेवटचे वृत्तपत्रीय संपादक असाच होई. कारण त्यांच्याच काळात बर्तमानपत्रांतील संपादकाचे केंद्रवर्ती महत्त्व कमी होऊन बिझनेस मॅनेजरकडे सर्व सूत्रे गेली. त्या दोघांना बिझनेसचे अवधान होते, तरी संपादकीय जबाबदारीचे जाज्वल्य भान होते. त्यांच्या आधीची तशीच जोडी गोविंद तळवलकर व माधव गडकरी यांची. तळवलकर यांना 'आयव्हरी टॉवर'मधील संपादक म्हणत. उलट, गडकरी चळवळ्ये पत्रकार. ते दोघे अभावाच्या काळात वाढले व विपुलतेच्या काळात निवृत्त झाले. त्यामुळे त्यांना व्यावसायिकता/नोकरी महत्त्वाची होती. टिकेकर-केतकर वैचारिक आंदोलनाच्या काळात वाढले व तशा भूमिका त्यांनी घेतल्या. त्यांनी मराठी पत्रकारिता तळवलकर-गडकरी यांच्या पुढे नेली. तो काळही सुबत्तेचा आहे. टिकेकर-केतकर यांनी त्यांची त्यांची वैचारिक बांधिलकी जपली. त्यामधूनच टिकेकरची तत्त्वप्रियता निर्माण झाली आणि त्याच्या वर्तनाचे नियम तयार झाले. त्या नियमांचा काच कधी तयार होई, पण ते जाचक झाले नाहीत. मात्र तो सांस्कृतिक धोरण ठरवण्यासाठी स्थापन झालेल्या सरकारी समितीत कसा गेला हे मला कोडे आहे. कारण साहित्य-संस्कृती-कला स्वायत्त असल्या पाहिजेत, त्या समाजाने पेलल्या पाहिजेत, सरकारचा त्यांस पाठिंबा असल्यास हरकत नाही ही त्याची भूमिका. परंतु आ. ह. साळुंके समितीच्या त्या धोरणात तर सरकारच समाजाच्या 'स्वायत्तते'ची जबाबदारी उचलण्याचे सुचवण्यात आले आहे. टिकेकरला ते कसे मान्य झाले हे कळत नाही.

टिकेकरचे दर्शनी रूप गंभीर विचारी पुरुषाचे होते. पण तो मिस्किल, खट्याळ किस्से अनेक सांगत असे. त्याच्याकडे नामवंत व सर्वसाधारण व्यक्तींच्या तशा अनेक गोष्टी असत. क्वचित इरसाल लावणीचे शब्ददेखील तो ऐकवी. त्याला कथनकौशल्य नव्हते, पण त्याच्या वर्णनातील हकिगतींमध्ये 'कंटेंट'चा दम असा पक्का असे की ऐकणारा गुंगून जाई. त्याला आईबद्दल फार प्रेम. त्याची आई शंभर वर्षांची होऊन दोन वर्षांपूर्वी वारली. आईच्या प्रदीर्घ जगण्यामुळे अरुण-मनीषा यांची दैनंदिन जीवनात त्यांचा सांभाळ करताना तारांबळ होई. त्या गंमती तो 'एशियाटिक'मधील एकाद्या विद्वानाच्या भाषणाच्या किश्शाइतक्याच रंगून सांगे. टिकेकरच्या व माझ्या भेटी अलिकडील काही वर्षांत महिन्या-दोन महिन्या- पाच महिन्यांनी होत. मग मधल्या काळातील अनेक हकिगती कळत. तशा गप्पांच्या मैफली करण्यास माणसे राहिली नाहीत याची खंत त्याच्या बोलण्यात वारंवार येई. गेल्या काही वर्षांत त्याचा 'कालिना विद्यापीठा'तील अभ्यासकांचा गट थंडावला, 'साहित्य सहवास'मधील कंपू विस्कटला. त्याच्याबरोबर काम केलेले पत्रकार विराम पावले. टिकेकर स्वभावत: एकटा होताच, तो आणखी एकाकी झाला. अशा वेळी 'एशियाटिक'मधील त्याचे संशोधन व संस्थात्मक कार्य हा त्याला मोठा दिलासा होता. तेथील मंडळी ही त्याची जिवाची साथीदार होती. टिकेकरची काही महत्त्वाची कामे त्याच्या आकस्मिक जाण्याने अर्धवट राहिली आहेत. ती पूर्ण कोण व कशी करणार याचे कुतूहल आहे. त्यातून येणाऱ्या काळाचा सांधा स्पष्ट होणार आहे.




**टिकेकरच्या व माझ्या भेटी अलिकडील काही वर्षांत महिन्या-दोन महिन्या- पाच महिन्यांनी होत. मग मधल्या काळातील अनेक हकिगती कळत. तशा गप्पांच्या मैफली करण्यास माणसे राहिली नाहीत याची खंत त्याच्या बोलण्यात वारंवार येई. गेल्या काही वर्षांत त्याचा 'कालिना विद्यापीठा'तील अभ्यासकांचा गट थंडावला, 'साहित्य सहवास'मधील कंपू विस्कटला. त्यांच्याबरोबर काम केलेले पत्रकार विराम पावले. टिकेकर स्वभावत: एकटा होताच, तो आणखी एकाकी झाला.**




– दिनकर गांगल
९८६७११८५१७
dinkargangal39@gmail.com
('नवशक्ती'त प्रसिद्ध झालेल्या मूळ लेखाचा विस्तार)

## मोनिका गजेंद्रगडकर यांची नवीन कादंबरी



*कथाकार मोनिका गजेंद्रगडकर यांची ही वेगळ्या वाटेनं जाणारी कादंबरी. ही कादंबरी सृजनाच्या अद्‌भुत ताकदीचा नि दुसरीकडे माणसाच्या मुळांचा ठाव घेत, अपार करुणेने त्याच्या मनाचाही तळ शोधते. तसेच माणूसपणाची बीजं पेरणारा म्हणून धर्म या संकल्पनेचा एक वेगळा अर्थही लावू पाहते.*

# उगम

२३६ पृष्ठे • किंमत २५० रुपये

---

## मोनिका गजेंद्रगडकर यांचे कथासंग्रह



*स्त्रीवादी भूमिकाच नव्हे तर कुठलीच भूमिका न घेता, भिडलेल्या अनुभवाशी प्रामाणिक राहून स्वत:चा असा संयत सूर सातत्याने जपणाऱ्या मोनिका गजेंद्रगडकर यांचा कथासंग्रह*

# शिल्प

**भैरुरतन दमाणी पुरस्कार प्राप्त**

दुसरी आवृत्ती • १८० पृष्ठे • किंमत १७५ रुपये



*धर्म, भौगोलिक अंतर, समंजसपणाचा अभाव अशा काही कारणांमुळे आज नात्यांना, संबंधांना, जी एक विकलता आली आहे, त्यातलं आर्त, व्याकुळ करणाऱ्या भावभावना समर्थपणे व्यक्त करणाऱ्या दीर्घकथा.*

# आर्त

तिसरी आवृत्ती • १७६ पृष्ठे • किंमत १६० रुपये



*विविध समस्या, विवंचना यांमुळं व्यापलेल्या, दुरावलेल्या आणि कधी त्याच विवंचनांमुळं सांधल्याही गेलेल्या नातेबंधाचा वेध :*

# भूप

दुसरी आवृत्ती • १६० पृष्ठे • किंमत १५० रुपये

---

मौज प्रकाशन गृह, गोरेगावकर लेन, मुंबई ४००००४

दूरध्वनी २३८७ २४२६ इमेल : moujprakashan@gmail.com

# मोठ्या माणसाच्या छोट्या गोष्टी

अरुण साधू

**दत्तो वामनांना ज्यांनी पाहिले आहे त्यांना प्रकांड पंडित माणूस कसा विक्षिप्त असू शकतो याची कल्पना येईल. टिकेकर एरवी एवढे काही विक्षिप्त नव्हते. पण मोठ्यांच्या छोट्या गोष्टीतही मोठेपणा दिसतो, म्हणून. आणि तो त्यांनाच शोभून दिसतो. येरा-गबाळ्याला नव्हे.**



अरुण टिकेकरांची ओळख झाली तेव्हा आम्ही दोघेही एकमेकांना 'अरे-तुरे' करण्याच्या वयात होतो. आमच्या पूर्वीच्या पिढ्या विशीतही एकमेकांना अहो गोपाळराव, बळवंतराव असे सन्मानार्थी अनेकवचनाने संबोधीत असत. पण आमच्या पिढीने ही एकवचनी सवय सत्तरीतही कायम ठेवली. सांगायचे कारण असे की टिकेकर वयाबरोबर मोठमोठ्या जबाबदाऱ्या स्वीकारू लागले, समाजातील त्यांचा आब वाढू लागला, तेव्हा नाही म्हटले तरी सगळ्यांसमोर असे हाक मारणे जड जाऊ लागले. ते संपादक असतांना एकदा त्यांच्या केबिनमधे स्टाफसमोर बोलताना सहजपणे माझ्याकडून सन्मानदर्शक वचन निघू लागले. तेव्हा ते गालातल्या गालात सौम्य हसले. नंतर म्हणाले, असे काही करण्याची गरज नाही. नेहमीसारखेच बोलत जा. ही पद्धत आम्ही शेवटपर्यंत पाळली. पण तरी आजही आमच्यासारख्या मित्रांना प्रसिद्धीसाठी लेख लिहिताना त्यांच्यासाठी एकेरी वचन वापरणे जडच जावे, असे उच्च स्थान महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वर्तुळात टिकेकरांनी मिळविले आहे. बदलत्या काळानुसार सुसंस्कृत भाषा-व्यवहाराचे आदर्श व प्रथाही बदलतात. त्या बदलांच्या टप्प्यावर आमची पिढी उभी आहे. टिकेकर कदाचित या बाबीबद्दल अधिक विस्ताराने व खोलात जाऊन लिहू शकले असते. महाराष्ट्रातील बदलणारा काळ व संस्कृती हा त्यांच्या अभ्यासाच्या अनेक विषयातील एक.

टिकेकरांचा व्यासंगी स्वभाव, पुस्तकांचे वेड, अफाट वाचन, पत्रकारितेत जरा उशीरा शिरूनही त्यांनी कमावलेले नाव, ह.रा.महाजनी, गोविंदराव तळवलकर, माधवराव गडकरी इत्यादि गाजलेल्या संपादकांशी त्यांची होणारी तुलना, आपला स्टाफ व मित्रमंडळी यांच्याशी ममत्वाने वागण्याचा त्यांचा खुले-दिल स्वभाव, त्यांनी लिहिलेली पुस्तके व गाजलेले वृत्तपत्रीय स्तंभ, तसेच विचार करण्यास प्रवृत्त करणारे त्यांचे गंभीर अग्रलेख इत्यादि बाबतीत एव्हाना खूप ठिकाणी पुष्कळ लिहून आले आहे. त्यामुळे या विषयांवर लिहिण्याऐवजी येथे त्यांच्या थोड्या वेगळ्या पैलूवर लिहायचे आहे. व्यासंगी, विचारी बुद्धिमंत माणसे काहीशी विक्षिप्तही असतात, असे म्हणतात. त्या विक्षिप्तपणामुळे त्यांच्या मोठेपणात भरच पडते. अशा विख्यात, विद्वान माणसांच्या विक्षिप्त गोष्टी. म्हणजे आपल्या मराठीत- मोठ्यांच्या छोट्या गोष्टी.

टिकेकरांच्या घरी भेटायला गेलो की प्रथम त्यांच्या घराची बेल वाजवायची व त्यांच्या पत्नीने किंवा वृद्ध आईने आगत-स्वागत केल्यावर आतल्या त्यांच्या बंद खोलीच्या दारावर टक-टक करायचे. त्यावेळी मला हमखास विख्यात इतिहासतज्ज्ञ दत्तो वामन पोतदार यांची आठवण व्हायची. का ते सांगतो. टिकेकरांच्या त्या छोट्याश्या खोलीचे दार उघडले की आतून तंबाखूच्या धुराचा भपकारा अंगावर यायचा. एकच खिडकी अर्धवट उघडी असलेल्या अंधारलेल्या त्या खोलीत धुराच्या ढगांची दाटी. धूम्रपान न करणाऱ्या व्यक्तीस जणू हा इशाराच. पण त्या काळात मीही धूम्रपान करीत असल्याने काही असाधारण वाटत नसे. खोलीत तीन-चार ॲशट्रे इकडेतिकडे विखुरलेले, थोटकांनी ओसंडून वाहणारे. एका बारक्या खुर्चीवर

टिकेकर काही वाचत बसलेले. आणि सर्वत्र आलमाऱ्यांमधे, उघड्या रॅकवर पुस्तकेच पुस्तके. भिंती दिसेनाश्या. धुरामुळे नव्हे, पुस्तकांमुळे. कपाटात पुस्तके, कपाटावर पुस्तके, टेबलवर, मधल्या स्टुलांवर, जाजमावर, खुर्च्यांवर पुस्तके. काही नेटकी लावून ठेवलेली, काही उलटी-सुलटी, मोठीआडवी, लहान, नवी, जुनी... पुस्तके हलवून आपल्याला मोठ्या प्रेमाने बसायला सांगत आणि जोरदार सिगारेटचा कश ओढत. धुराचा दम मारण्याची त्यांची पद्धत विक्षिप्तच. शहरी वातावरणात आणि इंग्रजी साहित्यात डॉक्टरेट केलेल्या टिकेकरांसारख्या मऊ स्वभावाच्या विद्वानाच्या प्रतिमेशी उगाच जरा विसंगतशी वाटणारी. तर्जनी व मधल्या बोटाच्या खालच्या पेरात फोर स्क्वेयर पकडून, गच्च मूठ दाबून, अंगठा व तर्जनीच्या पोकळीतून ते ओठांनी व फुफ्फुसांनी जोर लावून धूर ओढायचे. समाधानाने नाका-तोंडातून भपकारा सोडत म्हणायचे, बोला... काय वाचताय... खरे तर ही चिलीम ओढण्याची तऱ्हा. मोठ्या जोखमीची. टिकेकरांना ते माहित होते. सांगून उपयोग नव्हता.

असो. तर तपशीलवार गप्पा सुरु झाल्यावर एखाद्या पुस्तकाचा विषय निघायचा. म्हणजे तेच काढायचे. एकवार सभोवतालच्या रॅक्सवर नजर फिरायची, खाली खुर्च्या-टेबलांवरील पुस्तकांच्या चळतीवर. किंवा जमिनीवरच्या ढिगांवर. आणि क्षणार्धात घारीसारखी झेप घेऊन त्या गठ्ठ्यात हात फिरवीत जादूगाराप्रमाणे हवे ते पुस्तक टिकेकर ओढून काढीत. आपल्याला तरी तो चमत्कार वाटायचा. याच दृष्याशी दत्तो वामनांची आठवण जुळलेली आहे. पुण्यात वार्ताहर असताना त्यांच्या (म्हणजे त्यांच्या बंधूंच्या) घरी जाण्याचा योग यायचा. शनिवार पेठेतील त्या जुन्या घरात त्यांची बैठकीची खोली पहिल्या मजल्यावर. खोली कसली, प्रशस्त हॉलच तो. जिना चढतांनाच खणखणीत आवाजात दत्तो वामनांचे कशावर तरी भाष्य चालू असलेले ऐकू यायचे. तेरा-चौदाव्या शतकापासून तो विसाव्या शतकाच्या घडामोडी, फ्रेंच राज्यक्रांती किंवा भारतीय सिनेसंगीत... दत्तो वामनांना कोठलाही विषय वर्ज्य नव्हता. आणि त्याचबरोबर तपकीरीचा उग्र वास. दार सताड उघडे. आव-जाव घर तुम्हारा. खालीच बैठकीवर स्वतः बसलेले. हॉलमधे चारी बाजूने बैठका. तीवर साताठ लोक बसलेले. कोणी इतिहासज्ञ, कोणी पुरातत्वशास्त्रज्ञ, कोणी प्राध्यापक, विद्यार्थी, साहित्यिक, कवी, प्रकाशक... भिंतीवरच्या प्रशस्त उघड्या कोनाड्यांमधे लाल-नारिंगी रंगांच्या रुमालांमधे व्यवस्थित बांधलेले गठ्ठे. त्यात ऐतिहासिक कागदपत्रे व चोपड्या असणार. मधल्या भागात जुन्या सतरंजीवर एक अस्ताव्यस्त ढीग. त्यात काय नाही? जुनी पुस्तके, पोथ्या, चोपड्या, बह्या, पत्रे, पिवळ्या पडलेल्या वर्तमानपत्रांचे कागद, कपटे... गप्पा चालूच. मधेच बाजूच्या ऐतिहासिक अशा वाटणाऱ्या पितळी पात्रातून दत्तो वामन चिमूटभर तपकीर घेऊन उजव्या नाकपुडीत कोंबायचे व चांगला जोर लावून ओढायचे. फर्र असा आवाज करीत तपकीरीचे, कित्येक डाग पडलेल्या, रुमालाने नाक पुसायचे. मधूनच भिंती हादरविणाऱ्या स्फोटासारखा आवाज होई. तो त्यांच्या शिंकण्याचा. लोकांची ये-जा सुरुच आहे. मधेच नव्याने बैठकीत आलेल्या व्यक्तीची विचारपूस. म्हणजे अस्मादिकांची. (हे पहिल्या वारीत.) कोण तू? नाव काय? उपनाम काय म्हणालास, साधू? म्हणजे इलिचपूरचे रामराव साधू तुझे कोण?... तीर्थरुपांचे चुलते, असे उत्तर आल्यावर त्यांचे डोळे चमकतात. लगेच समोरच्या बेशिस्त ढिगाऱ्यात आपला हात

**टिकेकर हे व्यवस्थापनाशी बोलताना नेहमी जवळ तलवार बाळगणाऱ्या संपादकांपैकी नव्हते. उलट त्यांचे विचारांती असे मत झाले होते की अवाढव्य असा वृत्तपत्र व्यवसाय चालविण्यासाठी खूप भांडवल लागते व त्यामुळे जाहिराती या वर्तमानपत्राच्या संजीवनीसारख्या महत्वाच्या घटक असतात.**



खुपसून जराही खुडबुड न करता तो क्षणार्धात बाहेर काढतात. हाती होते एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीस आमचे चुलत आजोबा प्रकाशित करीत असलेले एक नियतकालिक... अशी जादू. आणि स्मरणशक्ती.

टिकेकरांवर लिहितांना फार भरकटणे झाल्यासारखे वाटेल. पण ही जादू पुस्तकांचा, वाचनाचा ज्यांना ध्यास आहे, ज्यांचा व्यासंग आहे, अशांकडेच पाहिली. आणि चांगल्या लायब्रेरियनकडे. टिकेकरांचे बंधू अरविंद टिकेकर यांच्याहीकडे होती. स्वतः अरुण टिकेकरांना दत्तो वामनांशी तुलना केलेली कदाचित आवडली नसती, वाचकांनाही नाही. ही तुलना नव्हेच. पण एखाद्या दृष्याने एकदम भूतकाळातील प्रसंगाची आठवण व्हावी असे हे आहे. दत्तो वामनांना ज्यांनी पाहिले आहे त्यांना प्रकांड पंडित माणूस कसा विक्षिप्त असू शकतो याची कल्पना येईल. टिकेकर एरवी एवढे काही विक्षिप्त नव्हते.. पण मोठ्यांच्या छोट्या गोष्टीतही मोठेपणा दिसतो, म्हणून. आणि तो त्यांनाच शोभून दिसतो. येरा-गबाळ्याला नव्हे.

आणखी एक छोटी गोष्ट. ते संपादक असताना प्रस्तुत लेखक लोकसत्तेत स्तंभ चालवीत होता. खरे तर संपादकाला आपल्या वृत्तपत्राच्या हजार बार्बीकडे रोज लक्ष द्यावे लागते. कटकटी असतात. मालक व व्यवस्थापन, वितरण, जाहिरात विभाग यांच्याशी रोज झगडावे किंवा तडजोडी कराव्या लागतात. पूर्वी इंडियन एक्स्प्रेस समूहात भरपूर काम केल्याने तेथील वास्तवाची चांगली जाणीव होती. संपादकाला वेळेची फार टंचाई असते. टिकेकर हे व्यवस्थापनाशी बोलताना नेहमी जवळ तलवार बाळगणाऱ्या संपादकांपैकी नव्हते. उलट त्यांचे विचारांती असे मत झाले होते की अवाढव्य असा वृत्तपत्र व्यवसाय चालविण्यासाठी खूप भांडवल लागते व त्यामुळे जाहिराती या वर्तमानपत्राच्या संजीवनीसारख्या महत्वाच्या घटक असतात. (संजीवनी हा शब्द त्यांचा नव्हे.) संपादकांची व इतर संपादकीय स्टाफची निर्भीड पत्रकारिता ही रोजच्या जाहिरात पुरवठ्यावर अवलंबून असते. त्यामुळे जाहिरात विभागाला संपादकांनी व पत्रकारांनी यथायोग्य असे महत्व देणे अपरिहार्य आहे. पुणे विद्यापीठातील रानडे इन्स्टिट्यूटच्या आवारातील पत्रकारितेच्या विद्यार्थ्यांसमोर टिकेकरांनी १९९० च्या दशकाच्या शेवटच्या काळात हा मुद्दा चाळवला तेव्हा पत्रकार बाण्याचा अभिमान असलेल्या उपस्थित विद्यार्थी व पत्रकारांनी बरीच खळखळ केली होती. त्या काळात दूरचित्रवाणीवरील वृत्तवाहिन्या नव्याने बाळसे धरू लागल्या होत्या व समोर येऊ घातलेल्या जबर स्पर्धेमुळे वृत्तपत्रे हादरली होती. अशा परिस्थितीत टिकेकरांचा मुद्दा गंभीरपणे विचार करण्यासारखा होता. याचा अर्थ संपादक-पत्रकारांनी मालक व जाहिरात देणाऱ्यांपुढे गुडघे टेकायचे किंवा दुय्यम स्थान स्वीकारायचे असा नव्हे. आज एकूणच हा मुद्दा फार गंभीर झाला आहे. एके काळी जाहिरात खात्यातल्या कारकुनाला देखील संपादकीय विभागात प्रवेश करावयास भीती




**लिहिणे ही गोष्ट टिकेकर स्वतः फार गांभीर्याने घ्यायचे. छान कागद जमवून, शाई भरलेली दोन-तीन निवडक पेन्स् चेक करून हाताशी लागत. टिकेकरांना शाईची वेगवेगळी फौंटन पेने जमविण्याचा छंदच होता. दुर्मीळ पुरातन, वेगवेगळ्या आकारांच्या, रंगांच्या, नाविन्यपूर्ण पेनांचा संग्रह त्यांच्याकडे होता.**

वाटायची, अशा बड्या वृत्तपत्रातील संपादकांनी आज परिस्थितीपुढे पार शरणागती पत्करल्याचे दृष्य दिसते. मग इतर वृत्तपत्र संस्थांची काय कथा? आज सर्वांगीण विकासासाठी आपल्याला मुक्त भांडवलाची अफाट शक्ती व श्रेष्ठत्व ध्यानात येते आहे. पण त्यावेळी हा वाद गाजत होता खरे.

विषयांतर झाल्यासारखे वाटेल, पण नाही, आपण ती छोटी गोष्टच सांगत आहोत. संपादक आधीच व्यस्त. त्यात टिकेकरांची ही अशी उघड भूमिका असल्याने ते अधिकच कामात. अशाही परिस्थितीत माझा स्तंभ लोकसत्ता कचेरीत पोचवायच्या दिवशी बरेच वेळा (नेहमी नव्हे) सकाळी दहा-साडेदहा वाजता टिकेकर वाकडी वाट करून माझ्या घरी येऊन, थोड्या गप्पा मारून, चहा घेत सिगारेटचे कश काढून, स्वतः कॉलमचे हस्तलिखित घेऊन निघून जात. परिचय-मैत्रीचा वगैरे भाग होताच. पण त्यांची वैयक्तिक शिस्त. स्तंभ वेळेवर आला पाहिजे ही संपादकीय काळजी. सकाळीच त्यांचा फोन यायचा. काय, झालं का लिहून...? तेव्हा कुठे अस्मादिकांना भान यायचे..... हे काय आता लिहायला घेतोच आहे की, असे म्हटले की पलीकडे, बोंबला, असे म्हणत डोक्याला हात लावल्याचा भास व्हायचा. एवढ्या संपादकीय कटकटी मागे असताना हा माणूस वेळात वेळ काढून कॉलम नेण्यासाठी स्वतः लेखकाच्या घरी येतो याचा

संकोच वाटायचा आणि गप्पा होतात म्हणून बरेही वाटायचे. लिहिणे ही गोष्ट टिकेकर स्वतः फार गांभीर्याने घ्यायचे. छान कागद जमवून, शाई भरलेली दोन-तीन निवडक पेन्स् चेक करून हाताशी लागत. मग आपल्या केबीनचे दार बंद करून एक-दोन सिगारेटचे कश मारून लिहिण्याची बैठक जमवीत. त्या काळात कोणालाही आत सोडायचे नाही, अशी सक्त ताकीद. बाहेर गंभीर वातावरण. इस्पितळात ऑपरेशन थिएटरच्या, लाल दिवा लावलेल्या, बंद दाराबाहेर असते तसे. दाराशी शिपायाशी कुजबुजत्या स्वरात किंवा नुसतेच खुणा करीत बोलणे. असे लेखनसमाधीचे गंभीर सोपस्कार असल्याने आमच्यासारखे लोक थिल्लरपणे पाट्या टाकल्यासारखे हसत-खिदळत लिहितात, याचे त्यांना वैषम्य वाटत असणार, असा संशय आहे. टिकेकरांनी स्वतः लोकसत्तेत एक हलका-फुलका स्तंभ चालविण्याचा गंभीर प्रयत्न केला. त्याचे पुस्तकही निघाले. निदान हा स्तंभ प्रत्यक्ष लिहितानाही ते अशीच समाधी लावून बसतात की काय, असे एक आपले कुतूहल होते. त्यांच्या लिहिण्याच्या वातावरणाची गोष्ट निघाली म्हणून एक सांगितले पाहिजे. टिकेकरांना शाईची वेगवेगळी फौंटन पेने जमविण्याचा छंदच होता. दुर्मीळ, पुरातन, वेगवेगळ्या आकारांच्या, रंगांच्या, नाविन्यपूर्ण पेनांचा संग्रह त्यांच्याकडे होता. हा छंद त्यांच्या व शरद पवार यांच्यामधील मैत्रीचा धागा होता, असे सांगितले जाते.

मोठ्यांच्या छोट्याच गोष्टी सांगायच्या म्हणून आणखी एक गोष्ट. टिकेकरांना थिल्लर वाटली असती, अशी. नरीमन पॉइंटवरील एयर-इंडियाच्या शेजारचा एक्स्प्रेस टॉवर हा तेथील पहिल्या तीन-चार गगनचुंबी इमारतींपैकी एक. लोकसत्तेच्या कर्मचाऱ्यांना त्याचा कोण अभिमान. कोपऱ्यावरील नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्टस् हे नंतर उभे राहिले. मुंबईतील सर्वात उच्च दर्जाचा इलीट पत्ता सांगताना एक्स्प्रेस-लोकसत्ताच्या लोकांची मान ताठ व्हायची. काही वर्षांनंतर गोयंकांनी आपल्या वृत्तपत्रांचे छापखाने, संपादकीय कचेऱ्या उचलल्या आणि नेऊन टाकल्या त्या थेट लालबागच्या चिवडा गल्लीत. या वृत्तपत्र समूहाच्या मॅनेजमेंटपासून संपादकीय खात्यातल्या शिपायांना हा पत्ता सांगताना संकोच वाटू लागला. ह्याः... चिवडा गल्ली... हा काय पत्ता झाला. त्या वेळी परळ हा गिरणीकामगार वस्तीचा दाटीवाटीने वसलेला भाग. तिथे उत्तुंग इमारती उभ्या राहून जागतिक बाजारात लोअर परेलची पॉश बिझनेस सेंटर व रेसिडेन्शियल एरिया म्हणून ख्याती पसरायची होती. गंमत म्हणजे खुद्द टिकेकरांच्या सात्विक व सुसंस्कृत संवेदनशील मनालाही चिवडा गल्ली असला बीभत्स नावाचा पत्ता भावत नसणार असा समज झाला. खरे म्हणजे अख्ख्या मुंबईत चिवडा गल्ली फेमस होती. मॅनेजमेन्टने उपाय शोधून काढला. गल्लीच्या तोंडावर एका इंडस्ट्रियल इस्टेटची पाटी होती. तोच इंडस्ट्रियल इस्टेट रोड म्हणून अधिकृत पत्ता दिला. टिकेकरही तोच सांगायचे. प्रथमच तिथे टिकेकरांना फोन करून भेटायला गेलो. पत्ता सापडायला थोडी पंचाईतच झाली. मी म्हणालो, हात्तिच्या... सरळ चिवडा गल्ली म्हणून का नाही सांगितलेस? नुसते शीपिश (ओशाळे) हसले.

टिकेकरांना विनोद वगैरे आवडायचे. भाषण करताना तेही अनेक वेळा श्रोत्यांना हसवीत. पण अशी चार-चौघांसमोर खाजगी रीताने गंमत करणे शिस्त व आपला आब राखून राहणाऱ्या टिकेकरांना आवडत नसावे. अशा वेळी ते नाराज वाटत. असा थोडासा कंगोरा. पण टिकेकरांचे प्रेमही होते आणि त्यांना माझ्यासंबंधी काही चांगल्या गोष्टी पूर्णत्वास न्यायच्या होत्या. पण त्या केवळ अस्मादिकांच्या अडेलतट्टूपणामुळे पूर्ण होऊ शकल्या नाहीत. टिकेकर स्वभावाने प्रसंगी कठोर. त्यामुळे त्यांनी माझा नाद सोडला. हाही त्यांचा स्वभावच. एखादा माणूस त्यांच्या यादीतून एकदा काट झाला की काटच. पुन्हा खोडरबर घेणे नाही. आमचे प्रसंगी बोलणे- चालणे होत असे. पण दुरावा फार असा कमी झाला नाही. त्याची कटुता तशीच राहिली. कधी वाटते, मोठ्या माणसाची छोटी गोष्ट म्हणून सोडून द्यायचे.


**टिकेकरांना विनोद वगैरे आवडायचे. भाषण करताना तेही अनेक वेळा श्रोत्यांना हसवीत. पण खाजगी रीताने गंमत करणे शिस्त व आपला आब राखून राहणाऱ्या टिकेकरांना आवडत नसावे. अशा वेळी ते नाराज वाटत. टिकेकरांना माझ्यासंबंधी काही चांगल्या गोष्टी पूर्णत्वास न्यायच्या होत्या. पण त्या केवळ अस्मादिकांच्या अडेलतट्टूपणामुळे पूर्ण होऊ शकल्या नाहीत. टिकेकर स्वभावाने प्रसंगी कठोर. त्यामुळे त्यांनी माझा नाद सोडला. हाही त्यांचा स्वभावच.**




**– अरुण मार्तंड साधू**
भ्रमणध्वनी : ९८६९४२९८९३
sadhu.arun@gmail.com

# ग्रंथविश्वात रमणारा व्यासंगी

**कुमार केतकर**




**डॉ. अरुण टिकेकर विद्वान असले तरी त्यांनी कधीच देखावा केला नाही. या प्रकारे पुरोगामी आणि धर्मनिरपेक्ष, अंगभूत सुसंस्कृत आणि बुद्धिजीवी विचार यातून खऱ्या अर्थाने असा हा व्यासंगी पत्रकार घडला, ज्याने एकोणिसाव्या शतकाचा क्रॉस आपल्या खांद्यावर घेतला. सर्जनशील काळात सगळी मूल्ये ढासळत चालली असताना ते एक प्रकारे 'प्रबोधनपुरुष' होते.**


अरुण टिकेकर आणि माझा संबंध तब्बल चाळीस वर्षांपासूनचा. १९७० दशक हे राजकीयदृष्ट्या अतिशय उलथापालथीचे असले तरी सांस्कृतिकदृष्ट्या ते उत्साहवर्धक होते. विजय तेंडुलकर यांच्या नाटकांनी खळबळ माजवली होती. न्यू वेव्ह सिनेमाचे आगमन झाले होते. मृणाल सेन, शंभू मित्रा, गिरीश कार्नाड, श्याम बेनेगल, हृषिकेश मुखर्जी, जब्बार पटेल हे भावी दिग्गज उदयमान होत होते. कुठल्याही ग्रुपमध्ये घडणारी चर्चा ही वाद-विवादात रूपांतरित होत असे.

तेव्हा वयाच्या तिशीत असलेले टिकेकर (तेव्हा त्यांना डॉक्टरेट मिळाली नव्हती.) इंग्रजीतून नाटक आणि सिनेमावर समीक्षा लिहीत. व्यावसायिक दृष्टीने ते पत्रकार नव्हते. एकसमान रुची जुळल्याने आम्ही एकत्र आलो, गट तयार झाला, पण आमची सगळी मते वा दृष्टिकोन एकसारखे नव्हते. या ग्रुपमध्ये तेव्हा दिनकर गांगल, अरुण साधू, अरुण टिकेकर, अशोक जैन आणि मी यांचा समावेश होता. यातले टिकेकर वगळले तर आम्ही सगळे पत्रकार होतो. (त्यावेळी 'मीडिया पर्सन' असा शब्द प्रचलित झाला नव्हता.) ते तेव्हा आपल्या किन्केड्स या दोन ब्रिटिश भावंडांवरील डॉक्टरेटच्या प्रबंधाची तयारी करत होते. त्यांना टाइम्सच्या संदर्भ विभागातून संदर्भ हवे असत. आम्ही सगळे तेव्हा टाइम्सचेच पत्रकार होतो. अरुण साधू 'टाइम्स

ऑफ इंडिया'मध्ये, मी 'इकॉनॉमिक टाइम्स'मध्ये, तर अशोक जैन आणि दिनकर गांगल 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये होते. त्यामुळे आमचे भेटण्याचे ठिकाण अर्थातच टाइम्सचे कँटीन होते. टाइम्सच्या इमारतीत त्या काळात प्रवेश सहजसोपा होता, ती गढी बनली नव्हती. आमचा ग्रुप चांगला जमला. तिथल्या रेस्टॉरंटमध्ये विल्स सिगारेटी आणि इराणी चहा पित तास न् तास आमच्या गप्पा रंगत. टिकेकरांचे युक्तिवाद अतिशय संतुलित असत. आक्रमक नाही, पण ठाम. हे त्यांचे वैशिष्ट्य ते पत्रकार बनल्यावर, आधी 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये सहसंपादक आणि नंतर 'लोकसत्ता'चे संपादक झाल्याबरही कायम राहिले. त्याकाळी टीव्हीदेखील नवा होता. खासगी चॅनेल नव्हती, अहोरात्र चालणाऱ्या बातम्या नव्हत्या की, टीव्हीचे वलय नव्हते. मराठीतले गोविंद तळवलकर आणि इंग्रजीतले शामलाल हे बुजुर्ग पत्रकार म्हणजे त्याकाळी चालत्या बोलत्या आख्यायिका होते. प्रत्येकाला मराठी आणि इंग्रजीतील नव्या पुस्तकांची माहिती असायची. आम्हाला सगळ्यांना गोविंद तळवलकर, शामलाल आणि खुशवंतसिंग यांचा दरारायुक्त आदर वाटायचा. हे सगळे आमच्यासाठी टाइम्समधले मोठे स्टार होते. आमच्यापैकी कुणालाच संपादक बनण्याची मनीषा नव्हती किंवा आमच्या वार्ताहर किंवा उपसंपादक म्हणून कामाबद्दल आम्ही असमाधानी होतो, असेही नाही. तंत्रज्ञानाचा प्रसार, नवे मुद्दे, प्रखर वादविवाद आणि ठाम दृष्टिकोन याबरोबर उत्क्रांत होत चाललेल्या एका व्यवसायात आम्हीही घडत होतो. टिकेकर आम्हा सगळ्यांपेक्षा वेगळे होते. त्यांना अभ्यास आणि व्यासंगाची आवड होती. त्यांनीच टिकेकरांना अधिक वस्तुनिष्ठ बनवले. पण हे जग लहान होते आणि मराठी लेखक-कवी एका मोठ्या वर्तुळाचा भाग होते... ज्यात पत्रकार, प्राध्यापक आणि समीक्षकांचा समावेश होता, तर टिकेकर अशा वर्तुळाचा भाग




**तेव्हा वयाच्या तिशीत असलेले टिकेकर इंग्रजीतून नाटक आणि सिनेमावर समीक्षा लिहीत. व्यावसायिक दृष्टीने ते पत्रकार नव्हते. एकसमान रुची जुळल्याने आम्ही एकत्र आलो, गट तयार झाला, पण आमची सगळी मते वा दृष्टिकोन एकसारखे नव्हते. ते तेव्हा किन्केड्स या दोन ब्रिटिश पिढ्यांवरील डॉक्टरेटच्या प्रबंधाची तयारी करत होते.**




होते, ज्याकडे कुणीही उच्चभ्रू' म्हणून पाहत नव्हते. टिकेकरांच्या जातकुळीतील म्हणता येतील असे पत्रकार फार नव्हते. इतिहासकार असण्यात प्रतिष्ठा मानणारे आणि स्वत:ला पत्रकाराच्या आधी स्कॉलर' समजणारे टिकेकर एक अभ्यासू पत्रकार होते. त्यांना संपादक आणि लेखक म्हणून संपादकीय लेख लिहायला आवडत असले तरी संपादक असतानाही त्यांनी संशोधकाची भूमिका कधीच सोडली नाही.

पुस्तके हे आपले सर्वात चांगले मित्र आहेत, असे ते म्हणायचे. ते पुस्तके विकत घ्यायचे आणि त्यांच्यावर लहान मुलांप्रमाणे प्रेम करायचे. कधी विषयानुसार, तर कधी लेखकांनुसार घरातली पुस्तके नीट लावण्यात वेळ घालवणे हा त्यांचा छंद होता. दुर्मीळ आणि अभिजात पुस्तकांसाठी त्यांच्या घरात खास जागा होती. लेखकाची सही असलेल्या पहिल्या आवृत्तीचा किंवा अतिशय सायास करून विकत घेतलेल्या पुस्तकांचा संग्रह ते लोकांना दाखवत. अमेझॉन आणि फ्लिपकार्ट किंवा इंटरनेट आणि विकिपीडिया नसण्याच्या काळात पुस्तकाचा शोध हे एखादे साहसच असे. जंगलात अनेक तास घालवल्यानंतर वाघ दिसताच व्याघ्रप्रेमींना होणाऱ्या अत्युच्च आनंदाची तुलना, टिकेकरांना अनेक महिन्यांच्या वा वर्षांच्याही शोधमोहिमेनंतर पुस्तक सापडल्यावर होणाऱ्या आनंदाशी करता येईल. त्यामुळे परदेशात विशेषत: इंग्लंडमध्ये त्यांचा वेळ तिथली मोठमोठाली पुस्तकांची दुकाने धुंडाळण्यात जाई. त्यातही त्यांना जुनी, दुर्मीळ पुस्तके विकणाऱ्या दुकानांमधून फिरायला आवडे. त्यांची ऊर्जा बघता त्यांचे ७२ हे काही फार वय नव्हते. ते तरुण होते आणि ते काही मृत्युशय्येवर नव्हते. मराठी आणि इंग्रजीतील नवनव्या पुस्तकात त्यांना रस असायचा. बुडहाऊस आणि पु. ल. देशपांडे किंवा जी. के चेस्टरसन आणि श्री. पु. भागवत यांच्या कुणाशीही त्यांचा सूर जुळायचा.

टिकेकर हे एक प्रकारे मराठी पत्रकारितेतले शेवटचे 'इंग्लिशमन' होते. ते 'लोकसत्ता'मध्ये जवळजवळ ११ वर्षे संपादक, तर 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये सहा वर्षे सहसंपादक होते. ते द्वैभाषिक संपादक होते, जे इंग्रजी पत्रकारितेतून, मुख्यत्वे समीक्षा आणि स्तंभलेखन यांमधून मराठीत आले होते आणि ग्रंथ व विद्वानांशी असलेल्या संबंधामुळे पत्रकार बनले होते. त्यांचा पत्रकार म्हणून टाइम्स समूहात झालेला प्रवेशही बेनेट कोलमनच्या संदर्भ विभाग कम ग्रंथालयातून झाला होता. ते या विभागात 'यूएस लायब्ररी ऑफ काँग्रेस'मधून आले होते. ते नेहमी भेट द्यायचे ती 'मंदिरे' म्हणजे आधी स्ट्रँड बुक्स आणि नंतर किताबखाना.

पत्रकारितेतून निवृत्त झाल्यावर ते एशियाटिक लायब्ररीचे प्रमुख बनले. तिथे संशोधन प्रकल्पांचे नियोजन, नामवंत इतिहासकार, विद्वान, लेखक यांची व्याख्याने आयोजित करणे यासारखी कामे करताना त्यांना घरच्यासारखे वाटत असे. त्यांचे काका हे विसाव्या शतकाच्या मध्यातले अग्रणी समीक्षक आणि भाष्यकार होते. त्यांचे बंधू हेही मुंबई विद्यापीठातील लोकप्रिय ग्रंथपाल होते. थोडक्यात पुस्तकप्रेम आणि विद्वत्ता त्यांच्या कुटुंबातच होती.

त्यांच्याकडे वीस हजार पुस्तकांचा खासगी संग्रह होता. साहित्य समीक्षा, सामाजिक इतिहास, समाजशास्त्र आणि मानववंशशास्त्र, चरित्रे, आत्मचरित्रे, प्रवासवर्णने, एकोणिसाव्या शतकाच्या आठवणी अशा विषयांचा त्यात समावेश होता. कुणीही तरुण इच्छुक पत्रकार, लेखक, संशोधक त्यांच्याकडे जाऊ शकत असे. ते त्यांना पुस्तक आणि लेखांचे अफाट संदर्भ पुरवत असत. ते त्यांना उदारपणे पुस्तकेही देत (पुस्तके परत येण्याची शाश्वती नसल्याने ती देताना त्यांच्या मनाला वेदना होत असल्या तरी!) असत. आपल्याकडील हजारो पुस्तके त्यांनी ग्रंथालयाला दान केली, तेव्हा आपल्या आयुष्याचा एखादा भागच कापला जातोय की काय, असे त्यांना वाटले. पण त्याच वेळी त्यांना या गोष्टीचाही आनंद होता की, हा सर्वोत्कृष्ट संग्रह आता अनेकांना उपलब्ध होणार होता, ते अज्ञात वाचक का असेनात.

त्यांनी 'द क्लोइस्टर पेल' नावाने मुंबई विद्यापीठाचे सर्जनशील चरित्र लिहिले. या पुस्तकातून त्यांचा एकोणिसावे शतक आणि ब्रिटिश परंपरेविषयी सखोल रुची दिसून येते. खरे तर त्यांनी आपल्या भारतीय परंपरेपेक्षा अभिजात इंग्लिश बारशाविषयीच अधिक आदर बाळगला. कुठल्याही प्रकारच्या मूलतत्त्ववादाचे, विशेषत: भगव्या प्रकारच्या, ते कट्टर विरोधक होते. हे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरेंच्या रोषाला निमंत्रण होते. त्यांना संरक्षण घेऊन फिरावे लागले. त्याबद्दल ते अनुत्सुक असायचे, पण त्यांना काही करता आले नाही.




**'द क्लोइस्टर्स पेल' नावाने मुंबई विद्यापीठाचे सर्जनशील चरित्र टिकेकरांनी लिहिले. या पुस्तकातून त्यांची एकोणिसावे शतक आणि ब्रिटिश परंपरेविषयी' सखोल रुची दिसून येते. खरे तर त्यांनी आपल्या भारतीय परंपरेपेक्षा अभिजात इंग्लिश वारशाविषयीच अधिक आदर बाळगला. कुठल्याही प्रकारच्या मूलतत्त्ववादाचे, विशेषत: भगव्या प्रकारच्या, ते कट्टर विरोधक होते.**

ते एखाद्या इंग्लिश सज्जनासारखे मितभाषी होते. याचा अर्थ असा नव्हे की, त्यांची मते टोकदार नव्हती. त्यांची टीका तिखट असे. मग ती राजकारण्यांवरची असो वा धोरणांवरची. नाटकांबाबतची असो वा सिनेमावरची. पुस्तकावरची की, विद्वत्तेचे मापदंड नाकारण्याची. त्यांनी अलीकडेच असे म्हटले होते की, त्यांना कुठेतरी गावकुसाबाहेर गेल्यासारखे किंवा तुटल्यासारखे वाटतेय. कारण फेसबुक-ट्विटर या प्रकारची उत्स्फूर्त विद्वता काही त्यांना मानवणारी नव्हती, पण त्यांना असे वाटत असले तरी जीवनाबद्दलची, वादविवादां-बद्दलची, पुस्तके विकत घेण्याची त्यांची असोशी संपलेली नव्हती.

ते विद्वान असले तरी त्यांनी कधीच देखावा केला नाही. या प्रकारे पुरोगामी आणि धर्मनिरपेक्ष, अंगभूत सुसंस्कृत आणि बुद्धिजीवी विचार यातून खऱ्या अर्थाने असा हा व्यासंगी पत्रकार घडला, ज्याने एकोणिसाव्या शतकाचा क्रॉस आपल्या खांद्यावर घेतला. सर्जनशील काळात सगळी मूल्ये ढासळत चालली असताना ते एक प्रकारे 'प्रबोधनपुरुष' होते. आपण 'हाय टेक' नसल्याचे त्यांना वैफल्य किंवा संकोच वाटायचा नाही. त्यांच्याकडे पुस्तकांचा अफाट संग्रह होता आणि त्यांचे लेखक हयात नसले तरी ती पुस्तके टिकेकरांबरोबर राहत होती. आता तेही दुसऱ्या जगात गेलेल्या या लेखकांमध्ये सामील झाले आहेत.

**– कुमार केतकर**
भ्रमणध्वनी : ९८२१५२४१३१
ketkarkumar@gmail.com
(मूळ इंग्रजी लेखाचा अनुवाद : समीर करंबे)
('मी-मराठी'च्या सौजन्याने, पुनर्प्रकाशित)

# आमची आगळी-वेगळी, संग्राह्य पुस्तके!




**सादर सप्रेम (चरित्रात्मक)**

**लेखक : रत्नाकर मतकरी.**

वेगवेगळ्या क्षेत्रांतील २१ नामवंत व्यक्तिमत्त्वांची लेखकाला भावलेली वैशिष्ट्ये टिपणाऱ्या लेखांचा खास संग्रह.

**पृष्ठे : १६८. मूल्य : रु. १८०/-**



**५१ गाजलेली भाषणे**

**संपादन : अशोक बेंडखळे**

महाराष्ट्रातल्या ५१ गाजलेल्या वक्त्यांच्या भाषणांचे संग्राह्य संकलन

**पृष्ठे : २९६.**

**मूल्य : रु. ३००/-**




**सुवासिनी**

**लेखिका : सीमा देव**

प्रख्यात अभिनेत्री सीमा देव यांच्या आत्मचरित्राची सुधारित आवृत्ती.

**पृष्ठे : २०८.**

**मूल्य : २२५/-**





**नूरजहान**

**लेखक : ऐजाझ गुल**

**अनुवाद : सविता दामले**

आपली गायकी व मादक रुपसौंदर्य या जोरावर भारत-पाकिस्तानातल्या करोडो सिनेरसिकांच्या हृदय सिंहासनावर आरूढ झालेल्या मदमस्त नूरजहानचं खिळवून ठेवेल असं चरित्र

**पृष्ठे : १६०. मूल्य : १७५/-**



**देवदास ते भुवनशोम**

**लेखक : विजय पाडळकर**

विसाव्या शतकातील हिंदी चित्रपटांचा इतिहास - खंड पहिला.

**पृष्ठे : ३४४.**

**मूल्य : रु. ४५०/-**

### आगामी प्रकाशने



**नात्यांची वीण सांधताना.... उसवताना...**

**लेखिका : स्मिता भागवत**



**सिनेमा : तंत्र, आठवणी, चिंतन**

**सत्यजित् राय**

**बंगालीतून अनुवाद : विलास गिते**



**किवी-माओरींच्या विश्वात**

**डॉ. अच्युत बन**

जिथे दोन संस्कृती आणि दोन राष्ट्रभाषा अधिकृतपणे नांदत आहेत त्या न्यूझीलंडचे, तिथले मूळ रहिवासी असलेल्या माओरींचे जीवन, संस्कृती याचे अभ्यासपूर्ण पण रंजक पद्धतीने चित्रण करणारे एक वाचनीय पुस्तक

**पृष्ठे : ११४.**

**मूल्य : रु. १५०/-**

पारधी हाऊस, एम.जी. रोड,
विलेपार्ले (पू), मुंबई . ४०० ०५७.
दूरध्वनी - २६१०१०१६/ २६१५०३५८
www.maitreyaprakashan.com
prakashanmkg@maitreyagroup.com
ऑन लाईन खरेदीसाठी
www.flipkart.com/www.majesticonthenet.com
www.bookganga.com/www.amazon.com

**मैत्रेय प्रकाशन**
आगळी वैशिष्ट्यपूर्ण निर्मिती, वाचनसंस्कृतीला देते दर्जेदार मिती

**मैत्रेय बुक क्लबचे सभासद व्हा आणि अक्षर खजिना मिळवा!!**

फक्त रु.९९९/-भरा आणि लगेचच रु.१६००/- किंमतीची पुस्तके घरपोच मिळवा तसेच वर्षभर 'मैत्रेय प्रकाशना'च्या सगळ्या पुस्तकांवर घसघशीत सूट.

**एम.ओ. करा/डी.डी. पाठवा. पुस्तकं आमच्या खर्चाने घरपोच मिळवा**

# एशियाटिक सोसायटी आणि डॉ. टिकेकर

डॉ. मीना वैशंपायन



**समाज आणि संस्कृती यांचा अभ्यास हा डॉ. टिकेकरांचा ध्यास होता. गतकाळातील समाजोपयोगी चांगल्या गोष्टी जतन करणे आवश्यक आहे व त्यासाठी आपण निरपेक्षपणे काम केले पाहिजे याच भावनेतून ते स्वत: काम करत राहिले. एशियाटिक सोसायटीची स्वायत्तता कायम राहावी, तिथे नवनवीन संशोधन होत राहावे, तिला पूर्वीप्रमाणेच उच्चतर ज्ञानोपासनेची वास्तू हे स्थान पुन्हा प्राप्त होऊन गतवैभव प्राप्त व्हावे अशी त्यांना आंतरिक ओढ होती. ती पुरी करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणं हीच त्यांना आदरांजली ठरेल.**

एशियाटिक सोसायटी ऑफ मुंबई ही ज्ञानसंपादन, संशोधन यासाठी, तसेच दुर्मीळ ग्रंथ, हस्तलिखिते यांचे भांडार म्हणून प्रसिद्ध असणारी, दोनशे वर्षांहून अधिक जुनी अशी नाणावलेली संस्था. एकोणिसाव्या शतकाचा अभ्यास व संशोधन हा ज्यांचा आयुष्यभरचा आवडीचा अभ्यासविषय होता अशा डॉ. टिकेकरांसारख्या अभ्यासकाला या संस्थेबद्दल आत्मीयता असणं स्वाभाविक होतं. निवृत्तीपूर्वीच्या व्यस्त जीवनक्रमात त्यांचं सोसायटीत येणं फारसं नियमितपणे होत नसे. मात्र निवृत्त झाल्यावर त्यांना सोसायटीत येणं व तेथील उपक्रमांमध्ये लक्ष देणं शक्य होई. विशेषत: २००४ साली सोसायटीची द्विशताब्दी साजरी झाली त्या प्रसंगी डॉ. टिकेकरांनी सक्रिय सहभाग घेतला होता. पुढे २००७ साली त्यांनी सोसायटीचे अध्यक्षपद स्वीकारले आणि २०१३ पर्यंत ते सांभाळले.

हा काळ सोसायटीसाठी अतिशय कसोटीचा होता. १९९३-९४ पर्यंत मध्यवर्ती ग्रंथालयाची जबाबदारी बरीचशी एशियाटिक सोसायटीवर होती. त्यांच्या पुस्तकांचे व्यवस्थापन बहुतांशी एशियाटिककडे होते. १९९३-९४ पासून दोन्ही संस्था आपापला कार्यभार स्वतंत्रपणे पाहू लागल्या होत्या. एशियाटिकची वाढती ग्रंथसंख्या, जीर्ण होत जाणारे ग्रंथ, पुरातन वास्तू आणि या साऱ्यांचं जतन करण्यासाठी आवश्यक तो प्रचंड निधी यासारखे अनेक प्रश्न संस्थेपुढे होते. ते वाढत जात होते, वाढतच जाणारे होते. नवनवीन संशोधनास अनुकूल अशा सुविधा अभ्यासकांना देण्याची संस्थेची धडपड चालू होती. त्याकाळात डॉ. सरदेसाई, डॉ. रायरीकर, बी.जी. देशमुख यांनीही अध्यक्षपद सांभाळून संस्था वर आणण्याचा प्रयत्न केला होता. अशा स्थितीत डॉ. टिकेकरांनी अध्यक्षपदाची धुरा खांद्यांवर घेतली व निभावली.

मुंबई विद्यापीठाचा फोर्ट परिसर व त्याचे ग्रंथालय म्हणजे डॉ. टिकेकरांचा जिव्हाळ्याचा परिसर. डॉक्टरेट करतानाचे आपले बरेचसे संशोधन त्यांनी या ग्रंथालयाच्या मदतीनेच केले. तेथील इतिहास विभागातील अनेक अभ्यासकांना त्यांनी एशियाटिकमध्ये येण्याचा आग्रह केला व विविध उपक्रम हाती घेतले.

इतिहासाच्या अभ्यासकांना डॉ. टिकेकरांकडून संदर्भ वा इतर मदत मिळे. अनेकांच्या विद्यापीठीय संशोधनाला मदत करताना एशियाटिकमधील अज्ञात वा अपरिचित संशोधन साहित्याचा उपयोग व्हावा, केला जाईल, असे त्यांनी पाहिले. त्यामुळे वर्षानुवर्षे वाचकांच्या प्रतीक्षेत असणाऱ्या महत्त्वाच्या ग्रंथांमधील माहिती, ज्ञान उजेडात आले.


एशियाटिकमध्ये अनेक संशोधकांची ये-जा असावी, त्यांच्यात संशोधनातील नवीन प्रवाहांबद्दल, मिळालेल्या नवीन माहितीविषयी, साधनांविषयी देवाणघेवाण व्हावी यासाठीही त्यांनी प्रयत्न केले. त्यांच्याजवळ नवनवीन कल्पना होत्या. त्या राबवण्यासाठी आवश्यक ती पूर्वतयारी करण्याची क्षमता होती आणि मुख्य म्हणजे स्वतः संशोधक, अभ्यासक असल्याने त्यातील खाचखळग्यांची, अडचणींची जाणीव होती. त्यांच्या प्रयत्नांनी लोक सोसायटीकडे वळू लागले, आमच्या साऱ्या परिसरात पुन्हा चैतन्य खेळू लागलं.


आरंभीच त्यांनी सोसायटीच्या पुढच्या दहा वर्षांमध्ये सोसायटी काय करू शकेल याचा आराखडा मांडला. हे चित्र पुढे ठेवून एशियाटिकसारख्या ज्ञानवृद्धी करणाऱ्या अग्रगण्य संस्थेची, त्या वास्तूच्या जतन, संवर्धनाची जबाबदारी काही अंशी सरकारचीही आहे हे केंद्र सरकारच्या सांस्कृतिक विभागाला पटवून दिलं. त्यामुळे वास्तूच्या जतनाची हालचाल सुरू झाली. राज्य शासनानेही हळूहळू लक्ष द्यायला सुरुवात केली. या भविष्यकालीन आराखड्याबरोबरच तेथील दुर्मीळ ग्रंथ व हस्तलिखिते यांच्या जतन-संवर्धनाचे काम त्यांनी हाती घेतले. यासाठी दत्तक पुस्तक योजना आखून आम्ही लोकांना त्यासाठी आवाहन करत गेलो. त्यामुळे लोकांना जुन्या, दुर्मीळ ग्रंथांची स्थितिगती कळत गेली, त्याचप्रमाणे वर्गणीदार नसलेल्यांचाही आमच्याशी संबंध जुळत गेला. त्यातही कोणत्या पुस्तकांचे जतन अधिक प्रमाणावर व तातडीने करायला हवे याविषयी त्यांची जागरूक नजर आम्हाला उपयोगी पडत होती.


एशियाटिकच्या स्थापनेपासूनची उद्दिष्टे व हेतू याबाबत डॉ. टिकेकर सतत सावध असत आणि त्याला कुठे धक्का लागणार नाही, पण त्यात कालमानाप्रमाणे बदल कसा करता येईल याची दक्षता ते घेत असत. त्यामुळे एशियाटिकमधील कोणतीही दुर्मीळ पुस्तके बाहेर जाऊ न देणे, कुणाला ती हाताळण्याची परवानगी देणे वा परवानगी नाकारणे याविषयी त्यांची ठाम भूमिका असे. आमच्या कार्यकारिणीत याची चर्चा करून त्याचे त्यांनी नियम केले होतेच, पण ते कडकपणे पाळले गेले पाहिजेत, असा त्यांचा कायमच आग्रह असे. त्याविषयी कधी मतभेद झाले, किंवा इतर कशाविषयी वादविवाद झाले तरी ते आपली भूमिका सोडत नसत. पुस्तकांच्या संरक्षणाची जबाबदारी त्यांना सर्वाधिक मोलाची वाटे.


मुंबईबद्दल त्यांना अतोनात प्रेम होतं. तिचा इतिहास, येथील वास्तू, नगरातील पुतळे याविषयींचं त्यांचं ज्ञान अफाट होतं आणि ते सतत वाढवत राहण्याची त्यांना ओढ होती. आपल्याप्रमाणेच मुंबई नगरीच्या आकंठ प्रेमात बुडालेल्या, तिचा







सर्वांगानी अभ्यास करणाऱ्या अभ्यासकांशी त्यांचा संपर्क असे. वेगळ्या, अपारंपरिक साधनांद्वारा या मुंबईचा इतिहास लिहिण्याची त्यांची इच्छा होती. एशियाटिकमध्ये स्थापन केलेलं मुंबई रिसर्च सेंटर ही त्यासाठीची सुरुवात होती. त्याद्वारा आम्ही मुंबईचं वेगळे पण आकर्षक दर्शन घडवणाऱ्या कार्यशाळांचंही आयोजन केलं होतं. आता ती कामं त्यांच्या पद्धतीनं पुढे कशी जातील याचा विचार करायला हवा आहे. पण आज तरी त्या ठिकाणी त्यांची उणीव फार जाणवतेय.

एशियाटिकबद्दलचा सगळा इतिहास, त्यातील प्रसिद्ध, अप्रसिद्ध व्यक्तींचं कार्य आणि त्यातील गमतीजमती यांची ओळख टिकेकरांमुळेच झाली. सोसायटीचा आत्मा कोणता, त्यातील प्राणतत्त्व कोणतं याची जाणीव, ज्ञान त्यांना जेवढं होतं तेवढं इतरांना क्वचितच असेल. याला कारण होता त्यांचा इतिहासाचा अभ्यास. ब्रिटिश उदारमतवादाबद्दल त्यांना असणारा जिव्हाळा, आपल्या साहित्यिक वारशाचं, परंपरांचं योग्य भान आणि विद्वानांची कदर करण्याची वृत्ती या साऱ्यांचा संगम त्यांच्या या कामात झालेला दिसे. एशियाटिक सोसायटी आणि मुंबई विद्यापीठ ही त्यांची दोन हळवी स्थानं होती. मुंबई विद्यापीठाचा इतिहास त्यांनी दोन वेळा लिहिला. (एकदा विद्यापीठाला १२५ वर्षं झाली तेव्हा आणि नंतर १५० वर्षं झाली तेव्हा.) या दोन्ही वास्तू त्यांना अतिप्रिय होत्या. ते साहजिकही होतं. एशियाटिकचा इतिहास ते लिहिणार होते. त्यासाठी साधनांची जुळवाजुळव झाली होती. पारंपरिक साधनांबरोबरच अपारंपरिक साधनं इतिहासलेखनासाठी वापरायची ही त्यांची खासियत. त्याच विचाराने त्यांनी Founders and Guardians of the siatic या नावाने मोनोग्राफ्सलेखनाची (संक्षिप्त चरित्र व कार्य) मालिका सुरू केली. २५ चरित्रांचा संकल्प होता. त्यातील दहा पुरी होऊन प्रसिद्धही झाली. पण त्यासाठी वेगवेगळे चरित्रविषय, चरित्रलेखक शोधणं, चरित्रविषयांची ओळख, मांडणी करणं हे सारं त्यांनी केलं होतं. आता ते काम पुरं करणं कसं शक्य होईल असं वाटतंय. पुरं झालं तरी त्यांच्या कुशल मार्गदर्शनाची उणीव साऱ्यांनाच जाणवेल.

महाराष्ट्राचे लाडके लेखक पु. ल. देशपांडे यांची सर्व हस्तलिखितं त्यांच्या हयातीतच सुनीताबाईंनी आमच्याकडे सुपूर्द केलेली होती. ती मिळवण्यासाठी टिकेकरांचेच प्रयत्न कारणीभूत ठरले होते. परंतु ती हस्तलिखितं मिळाल्यापासून खोक्यात पडून होती. डॉ. टिकेकर अध्यक्ष झाल्यावर आम्ही त्या हस्तलिखितांचं प्रदर्शन भरवलं. त्यानिमित्ताने एक आठवडा पु.लंच्या साहित्यावर आधारित कार्यक्रम केले. अनेक मराठी माणसं त्यामुळे प्रथमच एशियाटिकमध्ये आली. फोर्टमध्ये असणारं एशियाटिक मराठी माणसाला तसं दूरचंच वाटतं. पण डॉ. टिकेकरांच्या प्रोत्साहनाने आम्ही मराठी जनांना इकडे वळवण्यासाठी असे काही कार्यक्रम आखले व ते उत्साहाने पार पाडले.


एशियाटिकमधील हस्तलिखितांची एक आदर्श अशी सविस्तर,वर्णनात्मक सूची संस्कृत पंडित व प्राध्यापक ह. दा. वेलणकर यांनी १९३० मध्ये केली होती. त्यानंतर संस्थेने काही आणखी हस्तलिखितं मिळवली. त्यामुळे नवीन सूची करण्याची व सर्वच हस्तलिखितांचे पुनर्वर्गीकरण करण्याची आवश्यकता वाढली. तेही काम त्यांनी हाती घेऊन माझ्याकडे सोपवले व आम्ही ती सूची प्रकाशित केली. संस्थेची प्रकाशने अधिकाधिक लोकांपर्यंत पोचवणे, संस्थेचे महत्त्व लोकांना पटवण्यासाठी झटणे यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे या भावनेने आम्ही सारे आजही झटतो आहोत.

अध्यक्षपदाची कारकीर्द संपल्यावरही आमचे मार्गदर्शक म्हणून त्यांची आम्हाला सतत मदत असे. समाज आणि संस्कृती यांचा अभ्यास हा डॉ. टिकेकरांचा ध्यास होता. गतकाळातील समाजोपयोगी चांगल्या गोष्टी जतन करणे आवश्यक आहे व त्यासाठी आपण निरपेक्षपणे काम केले पाहिजे याच भावनेतून ते स्वतः काम करत राहिले आणि माझ्यासारख्यांना प्रेरणा देत राहिले. एशियाटिक सोसायटीची स्वायत्तता कायम राहावी, तिथे नवनवीन संशोधन होत राहावे, तिला पूर्वीप्रमाणेच उच्चतर ज्ञानोपासनेची वास्तू हे स्थान पुन्हा प्राप्त होऊन गतवैभव प्राप्त व्हावे अशी त्यांना आंतरिक ओढ होती. ती पुरी करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणं हीच त्यांना आदरांजली ठरेल.

**– डॉ. मीना वैशंपायन**
०२२-२८५४१७५७/९८३३८८२३०५
meenaulhas@gmail.com

# पद्मगंधा.कॉम

## 'पद्मगंधा.कॉम' वर पुस्तके खरेदी करा आणि मिळवा सर्व पुस्तकांवर २०% सूट




**अन्नपूर्णा**

मूळ किंमत ₹ १७० | सवलतीत ₹ १३५




**श्रीपर्वताच्या छायेत**

मूळ किंमत ₹ ३१० | सवलतीत ₹ २४५



**त्रिविधा**

मूळ किंमत ₹ २०० | सवलतीत ₹ १६०



**मागोवा मिथकांचा**

मूळ किंमत ₹ १८० | सवलतीत ₹ १४५



**भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण महाराष्ट्र**

मूळ किंमत ₹ १२०० | सवलतीत ₹ ९६०




**जंगलाचे मूड्स**

मूळ किंमत ₹ ३२० | सवलतीत ₹ २५५




**घर सैनिकांचे**

मूळ किंमत ₹ ३०० | सवलतीत ₹ २४०



**गालिबचे उर्दू काव्यविश्व अर्थ आणि भाष्य**

मूळ किंमत ₹ ५३० | सवलतीत ₹ ४२५



**कलर्स ऑफ द प्रिझन**

मूळ किंमत ₹ १६० | सवलतीत ₹ १३०




**तात्पर्य**

मूळ किंमत ₹ २०० | सवलतीत ₹ १६०



**आणखी, एक गझल**

मूळ किंमत ₹ २६० | सवलतीत ₹ २०८



**ध्वनिमुद्रिकांच्या दुनियेत**

मूळ किंमत ₹ १६० | सवलतीत ₹ १३०

**पद्मगंधा प्रकाशन**

१९६६, तारा-भुवन माडीवाले कॉलनी, सदाशिव पेठ, पुणे-४११०३० फोन : (०२०) २४४५०२६० मो. : ७३५०८३९९७६

**Website:** www.padmagandha.com **Email-id:** p.padmagandha@gmail.com | info@padmagandha.com

**Facebook:** www.facebook.com/pages/Padmagandha-Prakashan

# निखळ विद्वान

**सुनंदा भोसेकर**



**आ**ता डॉ. अरूण टिकेकर आपल्यात नाहीत. त्यांच्या अकस्मात जाण्याचा धक्का आता मंदावला आहे. तरीही उणीव जाणवतेच. सहजपणे म्हटलं जातं की, टिकेकरांच्या जाण्याने मोठीच पोकळी निर्माण झाली आहे. प्रत्येक जात्या माणसाबरोबर अशी पोकळी निर्माण होते. टिकेकरांच्या जाण्याने आपल्यापैकी अनेकांच्या वैयक्तिक आयुष्यात ही पोकळी निर्माण झाली आहे. पण त्याहीपेक्षा अधिक काही घडले आहे. महाराष्ट्रातच नाही तर देशभरातच वैचारिक अवकाशाचा अधिकाधिक संकोच होत आहे आणि अशा वेळी ज्याचं मत निदान ऐकावं लागतं, थोडाफार धाक वाटू शकतो अशा माणसाचं जाणं, ही फार मोठी हानी आहे. ही पोकळी मोठी आहे.

२००३ च्या जानेवारीत टिकेकरांनी लाला लजपत राय कॉलेजमधे एक व्याख्यान दिलं होतं, त्याचं शीर्षक होतं 'द रायटर अँड सोसायटी'. लेखक आणि समाज. टिकेकरांना सहजपणे कोणी साहित्यिक, लेखक वगैरे म्हणत नाही. त्यांचं बिरुद आहे ते 'ज्येष्ठ पत्रकार'. ही आपली महाराष्ट्राची पद्धत. डिसेंबरमधे त्यांना एशियाटिक सोसायटीची फेलोशिप देण्यात आली तेव्हा स्विकाराच्या भाषणात ते म्हणाले होते की, इतके दिवस मी विद्वानांमधे पत्रकार होतो आणि पत्रकारांमधे विद्वान! सोसायटीचा मी ऋणी आहे की मला निखळ विद्वानांच्या रांगेत स्थान मिळाले.

टिकेकर फार शैलीदार इंग्लिश लिहित असत. क्विनज् इंग्लिश म्हणावे तसे. सानुनासिक स्वरातले त्यांचे, अनेक संदर्भांनी, अवतरणांनी संपृक्त असे भाषण ऐकणे ही एक मेजवानीच असे. 'द रायटर अँड सोसायटी' मधे त्यांनी लेखक आणि समाज यांच्या परस्पर संबंधांविषयी विचार मांडले होते आणि मला असं वाटतं की, या भाषणात किंवा निबंधात म्हणूया हवं तर, टिकेकरांनी लेखकाकडून ज्या अपेक्षा व्यक्त केल्या आहेत, त्याच अपेक्षा त्यांना स्वत:कडून होत्या आणि त्या अपेक्षांना पुरे पडण्याचा प्रयत्न ते सातत्याने करत राहिले.

लेखकाचे सामाजिक कार्य म्हणजे समाजात जगत असताना करायचे काम, जबाबदारी. या विषयाची सुरूवातच त्यांनी लेखक का लिहितो या प्रश्नापासून केली होती. या

लेखक एखाद्या निर्वात पोकळीत लिहित नाही.
त्याच्याजवळ सर्जनशीलता आणि
कारागिरी दोन्हीही हवे. ही सर्जनशीलता
आणि कारागिरी सभोवतालच्या परंपरेच्या
अध्ययनातून आणि त्याच्या स्वत:च्या प्रतिभेने
साध्य होते. काय सांगितले आहे हे महत्वाचे
आहेच पण कसे सांगितले आहे हेही तितकेच
महत्वाचे आहे. एखादी वाङमयीन कृती, ती
सर्जनशील असो किंवा वैचारिक, अंतिमत: ती
समकालिन समाजावर भाष्य करत असते आणि
त्या अर्थाने प्रत्येक लेखक हा समाजाचा समीक्षक
असतो. हे करताना लेखक त्या समाजाच्या
विवेकाचा रखवालदार असतो. आणि हेच
लेखकाचे मुख्य कार्य आहे.
या गृहितकावर टिकेकरांची निस्सीम श्रद्धा होती.
त्यांचे सगळे काम; बॉडी ऑफ वर्कस्,
या पायावरच उभे आहे.

प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी जी. एच. हार्डीच्या 'मॅथेमॅटिशियन्ज अपोलोजी' मधलं एक अवतरण देत सांगितलं होतं की, अनेक घटक असतात- पहिला, बौद्धिक कुतूहल, सत्य जाणून घेण्याची आकांक्षा; दुसरा, व्यावसायिक अभिमान, स्वत:च्याच अपेक्षांना पुरे पडण्याची इच्छा आणि तिसरा, महत्वाकांक्षा, नाव मिळवण्याची आकांक्षा, स्थान आणि त्यासोबत येणारी सत्ता किंवा पैसा. मला स्वत:ला वाटतं की, टिकेकरांच्या स्वत:च्या लिखाणामागे या सगळ्या प्रेरणा कार्यरत होत्या. मराठी असो अथवा ते ज्या प्रकारचे इंग्लिश लेखन करत होते ते असो, धो धो पैसा मिळण्याची शक्यता नव्हती. त्यांचे बौद्धिक कुतूहल सतत जागे होते. त्यातून ते सतत नवेनवे संदर्भ धुंडाळत असत, विषयाच्या खोलात जाऊन अभ्यास करत असत. त्यात एक वैचारिक शिस्त होती, तर्कनिष्ठपणा होता. त्यांच्या कामातही स्वयंशिस्त होती. ती असल्याखेरीज कोणीही माणूस अभ्यासाचा इतका मोठा डोलारा उभा करू शकणार नाही. त्यांनी स्पर्धा करावी असे आजूबाजूला फारसे कोणी नव्हते. त्यांची स्पर्धा स्वत:शीच होती. स्वत:च्या व्यावसायिक क्षमतेचा त्यांना अभिमान होता. या क्षमतेमुळेच त्यांना त्यांच्या व्यवसायात, लेखनात असे स्थान मिळाले की, जिथे त्यांच्या शब्दाला मान होता. एशियाटिक सोसायटी ऑफ मुंबईची ऑनररी फेलोशिप हा या कारकिर्दीचा कळसाध्याय होता. वि. का. राजवाडे, पां.वा. काणे, जदुनाथ सरकार, राधाकुमुद मुखर्जी अशा विद्वानांच्या रांगेत ते मानाने जाऊन बसले.

याच निबंधात टिकेकर पुढे म्हणतात की, लेखक एखाद्या निर्वात पोकळीत लिहित नाही. त्याच्याजवळ सर्जनशीलता आणि कारागिरी दोन्हीही हवे. ही सर्जनशीलता आणि कारागिरी सभोवतालच्या परंपरेच्या अध्ययनातून आणि त्याच्या स्वत:च्या प्रतिभेने साध्य होते. काय सांगितले आहे हे महत्वाचे आहेच पण कसे सांगितले आहे हेही तितकेच महत्वाचे आहे. एखादी वाङ्मयीन कृती, ती सर्जनशील असो किंवा वैचारिक, अंतिमत: ती समकालिन समाजावर भाष्य करत असते आणि त्या अर्थाने प्रत्येक लेखक हा समाजाचा समीक्षक असतो. हे करताना लेखक त्या समाजाच्या विवेकाचा रखवालदार असतो. आणि हेच लेखकाचे मुख्य कार्य आहे.

या गृहितकावर टिकेकरांची निस्सीम श्रद्धा होती. त्यांचे सगळे काम; बॉडी ऑफ वर्कस्, या पायावरच उभे आहे. मग ते स्थल-काल असो, सारांश असो की तारतम्य, ते सतत समाजाच्या इतिहासाच्या पार्श्वभूमीवर त्याच्या वर्तमानाची मांडणी करतात. मुंबई युनिव्हर्सिटीचा इतिहास, शहर पुणे, De-intellectualisation of Mumbai, या सगळ्या ग्रंथांमधून ही शहरे, त्यांचा विकास आणि सद्य:स्थितीत आलेली मरगळ यांचा आलेख मांडतात. यासाठी व्यासंग हवा, परंपरेची खोलवर समज हवी आणि तपशीलांच्या पसाऱ्यातून नेमके सत्य हुडकून काढण्याची सृजनशीलता हवी. आणि सगळ्याच्या वरचढ तारतम्य हवे. ते त्यांच्यापाशी मोठ्या प्रमाणावर होते.

त्यांच्या मते लेखकाची भूमिका ही सामाजिक-सांस्कृतिक नेतृत्व देणारी असायला हवी. त्याने आपल्या वाचकांना मानवी मूल्यांचे भान दिले पाहिजे. अविवेकी, कालविसंगत मूल्यांचा अव्हेर करायला शिकविले पाहिजे पण असे करताना तर्काचा निकष आणि विवेक हवा. हेच ते रानडे स्कूल! समाजाच्या कलाने पण तरीही ठामपणे तर्काचा, विवेकाचा कासरा न सोडता सुधारणेच्या वाटेवर चालणारे.

पुढच्याच परिच्छेदात त्यांचा आणखी एक स्वभावविशेष दिसतो. तो म्हणजे, निरंतर सावधपणा. ते म्हणतात आपले काम जर परिणामकारक पद्धतीने करायचे असेल तर समाजापासून एक सुरक्षित अंतर ठेवायला हवे. हे अंतर किती असायला हवे याबद्दल वाद होऊ शकतील, पण लेखकाने निष्पक्ष असायलाच हवे. त्याने स्वत:शी आणि समाजाशी प्रामाणिक रहायला हवे. त्याने आदर्श घालून द्यायला हवेत, आदर्श स्थितीचे स्वप्न लोकांसमोर ठेवायला हवे. अशा स्वप्नांचा पाठलाग करतच मानवजातीची प्रगती होते. सामाजिक भान असलेला लेखक तळागाळातल्या लोकांचा प्रवक्ता असतो. त्याने समाजात खदखदत असलेल्या असंतोषाला वाचा फोडली पाहिजे. स्वातंत्र्योत्तर काळात अभिव्यक्तीस्वातंत्र्य असूनही आपल्या समाजातल्या वाङ्मयीन प्रवाहांची पीछेहाट झाली आहे. याचे मुख्य कारण म्हणजे लेखकांची आत्ममग्नता किंवा त्यांचा भेकडपणा. राजकारण व्यक्तिकेंद्रित आहे. राजकीय सत्ता नि:शक्त आहे अशावेळी सामाजिक बदल घडवून आणण्याकरता, लोकशिक्षण करण्याकरता बौद्धिक नेतृत्वाने पुढे आले पाहिजे. सरळ साध्या भाषेत परिस्थितीचे विश्लेषण करायले हवे. यासाठी निर्भयपणे विचार करायला हवा आणि निर्भयपणे विचार करायचा असेल तर राजकीयदृष्टया भाबडे असून चालणार नाही. लेखकाने सतत डोळ्यात तेल घालून स्वत:च्या अभिव्यक्ती-स्वातंत्र्याचे रक्षण केले पाहिजे. इथे त्यांनी ऑरवेलचे एक अवतरण दिले आहे. ऑरवेलने म्हटले आहे की, ऱ्हास झालेल्या समाजाची प्रवृत्ती एकाधिकारशाहीची असते आणि असा समाज कधीही सहिष्णु आणि बौद्धिकदृष्ट्या स्थिर होऊ शकणार नाही. टिकेकर म्हणतात की लोकशाहीमधे सरकारी यंत्रणेपासून लांब रहाता येत नाही, पण म्हणून त्या यंत्रणेला पोशिंदा समजणेही चूक होईल. अशा स्थितीत लेखक गप्प रहाणं पसंत करतात आणि असं भासवतात की ते समाजापासून, शासकीय यंत्रणेपासून योग्य अंतर राखून आहेत. बेगबेगळी पारितोषिके, स्वस्त घरे, बेगवेगळ्या कमिट्यांवरची वर्णी या आणि अशा अनेक मार्गांनी शासन लेखकाला मिंधेपणात ठेवू पहाते. लेखक याला स्वेच्छेने अथवा अनिच्छेने बळी पडतात आणि स्वत:चे तोंड शिवून घेतात. आज ज्याला विद्वत्ता समजली जाते ती सत्तेची बटीक आहे. सामाजिक समीक्षकाची जबाबदारी आहे की, त्याने धैर्याने आणि तर्कसंगत भूमिकेतून केवळ बहुसंख्येच्या

आधारावर उभ्या असलेल्या मताला प्रश्न विचारले पाहिजेत. तेच त्याचे खरे लक्षण आहे. अशावेळी बघ्याची भूमिका घेऊन वैयक्तिक लाभ पदरात पाडून घेता येतील, पण कर्तव्यात कसूर होईल.


या निबंधाच्या अखेरीस ते म्हणतात की, आपल्या-सारख्या विविध धर्म आणि विविध संस्कृती नांदत असलेल्या देशात आपले भौतिक अस्तित्व केवळ सहिष्णु, उदार आणि मानवतावादी मूल्ये असलेल्या जनतेवर अवलंबून आहे. लेखकाची ही जबाबदारी आहे की त्याने करुणा आणि सहिष्णुता यांसारख्या शाश्वत आणि वैश्विक मूल्यांचा प्रसार केला पाहिजे. जर उदारमतवाद, त्याच्या सर्व वेगवेगळ्या छटांसह विनाश पावला आणि मातीला मिळाला तर जनता माथेफिरू-पणाने सत्य, शिव आणि सुंदराचा नाश करेल. जर हे घडलेच तर तो कट्टर धार्मिक पुनरुत्थानाचा आणखी एक बळी ठरेल'.

इतक्या विस्ताराने ह्या एकाच निबंधाबद्दल लिहिण्याचे कारण म्हणजे मला असे वाटते की, टिकेकरांच्या मनोभूमीचे, त्यांच्या मूल्यकल्पनेचे प्रतिबिंब या निबंधात पडले आहे. तरी हा अगदी ढोबळ गोषवारा आहे. हे भाषण २००३ च्या जानेवारीतले आहे. धर्माच्या नावाने सर्व पातळ्यांवर हिंसेला उत्तेजन देणाऱ्या, बहुसंख्येच्या बळावर विवेकाला तिलांजली देणाऱ्या वर्गाची तेव्हा चाहूल लागली होती, आज तर तो मैदानात आला आहे आणि सगळ्या समाजाची घडी विस्कटू पहात आहे. टिकेकर तेव्हाच्या या भविष्याबद्दल अगदी स्पष्टपणाने बोलत आहेत आणि लेखकांना, बुद्धिवंताना त्यांच्या जबाबदारीची जाणिव करून देत आहेत.

आज अनेकजण त्यांच्या ग्रंथप्रेमाविषयी, व्यासंगाविषयी, अचुक मजकुराकरता परिश्रम घेण्याच्या वृत्तीविषयी लिहितील. त्यांनी लिहिते केलेल्या लेखकांविषयी, केशकर्तनालयातून उचलून बुद्धीजीवींच्या दिवाणखान्यात आणलेल्या वर्तमानपत्राविषयी वगैरे बोलतील. पण या सगळ्याच्या पार एक नितळ माणूस, अखंड ज्ञानलालसा असणारा एक जागल्या उभा होता. आज घडीला जेव्हा सारेच आकाश काळवंडून येत असताना त्यांचे जाणे हा मोठा आघात आहे. रानडे स्कूलला लाबून धरणे ही मोठीच जबाबदारी आहे.

अशा विद्वान, व्यासंगी माणसाचे सौहार्द लाभले हा केवळ एक योगायोग. राहूनराहून मनात विचार येत रहातो की, हे सगळे ते असताना का लिहिले नाही. आणि लिहिले असते तर त्यांची काय प्रतिक्रिया झाली असती?

**– सुनंदा भोसेकर**
भ्रमणध्वनी : ९६१९२४६९४१
Sunandabhosekar@'gmail.com


**मूल्य ४५० रुपये**
**सवलतीत २७० रुपये**

**॥ग्रंथाली॥**

## ओळख सियाचेनची – अनुराधा गोरे

जगातील सर्वात जास्त उंचीवरील युद्धभूमी- सियाचेन
सियाचेनबद्दल एखादं पुस्तक वाचून ते समजून घेणं म्हणजे सहा आंधळ्यांनी केलेल्या वर्णनावरून हत्तीचं चित्र डोळ्यासमोर आणणं-
वा वेड्यावाकड्या कागदाच्या तुकड्यांत एखादा अर्थपूर्ण आकार शोधणं-
पण हे करताना आपण जर त्याला राष्ट्रप्रेम, सैन्यदलाबद्दल आपुलकी यांची जोड दिलीत-
आणि आमचे सैन्य आमच्या आणि आमच्या मातृभूमीच्या रक्षणासाठी कोणत्या दिव्यातून जातं हे जाणून घेणं आपलं कर्तव्य मानलंत तर-
तर सगळं एकदम खूप सोपं होईल.

# टिकेकर आठवताना...

राणी दुर्वे



**मी पत्रकारितेत नव्हते, माझे क्षेत्र पूर्णपणे निराळे, मला लेखक म्हणून प्रस्थापित होण्याची हौस नव्हती. त्यामुळे मी टिकेकरांच्या वर्तुळात येण्याची जराही शक्यता नव्हती. माझे लिहिणेही असे काही महान नव्हते की, त्यांनी मुद्दाम मला प्रस्थापित करावे. पण तरीही आपल्या संपर्कात आलेल्या प्रत्येक व्यक्तीला त्याचे गुणविशेष ओळखून धारेला लावण्याचे काम टिकेकर अगदी चोख करीत. वैयक्तिकरित्या मला हे मनोमन माहित आहे की, केवळ आणि केवळ टिकेकरांनी मला लिहिण्याच्या प्रवाहाला लावले.**

**१९८६**–८७ चा काळ असावा. त्या काळात मी जरी लिहित असले तरी रुढ अर्थाने लिहीती झाले नव्हते. त्यादरम्यान मला वाटतं, कुठलासा सिक्कीमचा वगैरे ट्रेक करुन येऊन मी त्याविषयी लिहिले होते. माझे हे असे लिहिणे मित्र परिवारापुरतेच मर्यादित असायचे. एरवी खरंतर लिहिलेले काहीही वर्तमानपत्रात पोचवायची लोकांना हौस असते. मला मुळातच अशी हौस नव्हती. माझे वडील त्यांच्या काळातील सत्यकथेचे कवी असल्यामुळे लिहिणे-बिहीणे हा त्यांचाच प्रांत आहे आणि आपला त्या प्रांताशी फारसा संबंध नाही, असे मानून मी चालत असे. त्यामुळेच आपण लिहिलेले कुठे छापून यावे असा यत्किंचितही विचार माझ्या मनाला तोवर शिवला नव्हता. मी लिहिलेले वाचून, मला ढकलून महाराष्ट्र टाईम्सच्या उंबरठ्यावर नेले, माझ्या एका कवी मैत्रिणीने. काहीशा अनिच्छेने पण तिचा आग्रह समजून आणि सहज मजा म्हणून देखील मी माझे लिखाण म.टा.च्या ऑफिसमध्ये द्यायला तयार झाले. 'सा रम्या नगरी' नावाने लिहिलेला सिक्कीमच्या प्रवासाविषयीचा माझा एक लेख आम्ही दोघी म.टा.च्या ऑफिसमध्ये जाऊन देऊन आलो. वय तरुण. अनुभव काही नाही. वर्तमानपत्रात कुणाशीही ओळख नाही. त्यामुळे माझा तो लेख दस्तुरखुद्द टिकेकरांच्याच हातात मी देत आहे याची मला जराही जाणीव नव्हती. कोण नवशे-गवशे मानून आमच्या दोघींकडे दृष्टिक्षेप टाकून त्यांनी लेख ठेवून घेतला. पण माझ्याकडे कशाला, बाहेर बसलेल्या कुणाकडे तरी द्या, पोस्टाने पाठवा वगैरे सांगितले नाही. लेख दिला आणि त्यानंतर किमान महिनाभर तरी मी त्याविषयी विसरुन गेले. महिना-सव्वा महिना होऊन गेल्यानंतर लेख छापून येत नाही म्हणून काहीसे जाब विचारण्याच्या पवित्र्यात आम्ही दोघी दुपारच्या वेळी आमच्या ऑफिसमधून म.टा.च्या ऑफिसमध्ये गेलो. टिकेकरच भेटले. मी लेखाची चौकशी केली. त्यांच्या नेहमीच्या सानुनासिक स्वरात टिकेकर म्हणाले, 'लेंख वांचलेला नाहीं, हंवा असल्यास परत घेंऊन जा.' त्या स्पष्ट वक्तव्याने मी गडबडले. 'नाही, नाही. वाचा तुमच्या सवडीने. मला घाई नाही. मी फक्त चौकशी करायला आले' करत आम्ही दोघींनी काढता पाय घेतला. नशिबाने मी लेख परत घेण्याचे औद्धत्य

दाखवले नाही. (नाहीतर महाराष्ट्र एका लेखिकेला मुकला असता!). त्यानंतर काही दिवसातच लेख यथासांग छापून आला.

एकदा छापून येते म्हटल्यावर मग अधूनमधून काही लिहिणे चालू झाले. असे चार-दोन लेख म.टा.त छापून आले असतील. त्याच अनुक्रमात मी व्हॅली आफ फ्लॉवर्सच्या अनुषंगाने एक लेख लिहिला आणि चक्क दुर्गाबाईंनी त्या लेखावर प्रतिक्रिया लिहिली. आपण लिहिलेल्या लेखावर दुर्गाबाईंनी दखल देण्याइतकी तसदी घ्यावी हे लक्षात येताच मला खाडकन लिहिण्याचे भान आले. दुर्गाबाईंच्या लेखाचा आनंद तर झाला होताच पण सहज मजा म्हणून लिहिणारी मी माझ्याच लिहिण्याविषयी गंभीर झाले. वर्तमानपत्र हे असे किरकोळ व्यासपीठ नाही आणि अनेक थोर लोकं त्याचे वाचक असतात याची जाणीव झाली. लेखन ही एक गंभीर बाब आहे आणि जबाबदारीने लिहायला हवे हे न बोलता केवळ प्रतिक्रियेच्या रुपाने दुर्गाबाईंनी मला शिकवले. माझ्या लेखाच्या अनुषंगाने दुर्गाबाईंनी फुलं आणि सुगंध यांची सांगड घातली होती. तो एक स्वतंत्र असा लेखच होता, पण निमित्त माझा लेख होता. मी नंतर त्यांना एशियाटिकमध्ये भेटायला गेले. चष्म्यातून नजर रोखून त्यांनी मला सांगितले, 'चांगले लिहितेस, लिहिण्यासाठी अभ्यास हवा, वाचत रहा. दुर्गाबाई जाऊन आता इतके दिवस झाले तरी आजतागायत मला त्या वाचत आहेत असा धाक राहिला आणि कुठलाही लेख परिपूर्णच करण्याचे अदृश्य बंधन राहिले. दुर्गाबाईंच्या प्रतिक्रियेच्या काही दिवसांनंतर मी पुढला लेख घेऊन परत म.टा.च्या ऑफिसमध्ये गेले. बहुधा त्यानंतर रविवार पुरवणीचे काम बाळ फोंडके बघणार असावेत. मी नेहमीप्रमाणे टिकेकरांपाशी गेले तर ते स्वत: उठून माझ्यासोबत बाळ फोंडकेंकडे आले, माझी त्यांना ओळख करून दिली. माझ्या लेखावर दुर्गाबाईंनी लेख लिहिला आहे, असे कौतुकाने सांगितले. मला सांगितले की, यापुढे मी फोंडकेंकडे लेख द्यावेत आणि ते पुन्हा आपल्या केबिनमध्ये परतले.

आश्चर्याचा हा अजून एक धक्का मला होता. एव्हाना मला टिकेकर ही मोठी व्यक्ती आहे हे समजले होते. अगदी सुरुवातीच्या अनभिज्ञतेतून मी बाहेर आले होते पण तरीही टिकेकरांनी आपणहून माझ्यासाठी केबिनमधून बाहेर पडून माझी स्वतंत्र काही ओळख करुन द्यावी हे माझ्यासाठी खरोखरच महान आश्चर्य होते. हे खास टिकेकरांचे वैशिष्ट्य! व्यक्ती मग ती कितीही वयाने किंवा मानाने लहान असो, तिचा गुणविशेष त्यांच्या पटकन लक्षात येत असे आणि मग त्या व्यक्तीला योग्य प्रकारे बसविण्याचे काम ते अगदी सहज करुन जात. वस्तुत: किरकोळ लेख देण्याच्या निमित्ताने घडलेल्या काही भेटीं, यापलिकडे आमची ओळख नव्हती. मी पत्रकारितेत नव्हते, माझे क्षेत्र पूर्णपणे निराळे, मला लेखक म्हणून प्रस्थापित होण्याची हौस नव्हती. त्यामुळे मी त्यांच्या वर्तुळात येण्याची जराही शक्यता नव्हती, माझे लिहिणेही असे काही महान नव्हते की, त्यांनी मुद्दाम मला प्रस्थापित करावे. पण तरीही आपल्या संपर्कात आलेल्या प्रत्येक व्यक्तीला त्याचे गुणविशेष ओळखून धारेला लावण्याचे काम टिकेकर अगदी चोख करीत. वैयक्तिकरित्या मला हे मनोमन माहित आहे की, केवळ आणि केवळ टिकेकरांनी मला लिहिण्याच्या प्रवाहाला लावले.

त्यानंतर ऑफिसच्या बदलीनिमित्त मी सात-आठ वर्ष चेन्नाईला गेले आणि परत लिहिण्याच्या प्रवाहातून गायब झाले. आधीच लिहिण्याचा उल्हास, त्यातून मुंबईपासून दूर तामिळ नगरीत! मी माझ्यातले लिहिणे विसरले. तामिळनाडूत पुरती रमले. त्या सात-आठ वर्षात मी काहीच लिहिले नाही. १९९७-९८ला मी मुंबईत परतले आणि पुन्हा एकदा लिहिण्याची आठवण होऊ लागली. या वेळी काहीशा प्रकर्षाने! 'पालखी' हा लेख मी लिहिला आणि टिकेकर एक्स्प्रेस टॉवर्सला असतील असे समजून त्यांना भेटायला तिथे गेले तर कळले की ते लालबागमधल्या ऑफिसमध्ये असतात. मी एक्स्प्रेस टॉवर्सच्या खालूनच त्यांना फोन लावला, माझी ओळख त्यांना दिली आणि भेटायला येऊ का, म्हणून परवानगी विचारली. मनात शंका होती की, बहुधा त्यांच्या लक्षात नसेल आपले नाव पण फोनवरच ओळखीचा स्वर आला, जरुर या म्हणाले. आम्ही दोघी, मी आणि माझी मैत्रीण सुनंदा भोसेकर, लालबागला लोकसत्तेच्या कार्यालयात त्यांना भेटायला गेलो. केबिनमध्ये गेलो, आणि आपली ओळख टिकेकरांना असेल की नाही या संभ्रमातच होतो. तर टिकेकरांनी परेड करावी तशी त्यांच्या सगळ्या टिमला बोलावून आम्हा दोघींची लेखिका म्हणून ओळख करून दिली. आम्ही दोघी पुन्हा एकदा हतबुद्ध. जणू मधला काळ गेलाच नव्हता; जणू आम्ही रोज त्यांच्या संपर्कातच होतो, जणु या मधल्या काळात आमचे नाते दृढ झाले होते. क्रिकेटियर म्हणून मला टिकेकरांची आवड आताच कळली, पण त्यांनी जी आम्हा दोघींची त्या दिवशी विकेट घेतली त्याला तोड नाही. आम्हीच आश्चर्यचकित झालो होतो की, आम्ही कधी लेखिका झालो?

टिकेकरांनी लोकसत्ता एव्हाना नावारुपाला आणला होता. ते सतत नवीन लेखकांच्या शोधात असायचे, नवीन कल्पना आमलात आणण्यासाठी उत्साहित असायचे. माणसे जोडण्याच्या या त्यांच्या अफाट कलेने टिकेकरांनी अक्षरश: शेकडो-हजारोंनी माणसे जोडली असतील. शुभदा चौकर, ललिता ताम्हाणे, रेखा देशपांडे, रवींद्र पाथरे असे कितीतरीजणं स्नेही झाले ते टिकेकरांच्या निमित्ताने. गुणग्राहकता आणि आपले मोठेपण जाणवून न देता पलिकडच्या माणसाला आपल्याशी बांधून ठेवण्याचे कसब या माणसात होते. लालबागच्या दिवसात मग सहाजिकच टिकेकरांकडे जाणे-येणे, आम्हा दोघींचे चतुरंगला लिहिणे चालू झाले. पुढे सदराची कल्पना त्यांनी ठेवली. मी उचलली. आणि माझा लेखिका म्हणून प्रवास सुरू झाला...

टिकेकरांचा रोजचा सहवास वर्षानुवर्ष लाभलेले आणि टिकेकर नामक ज्ञानसागराकाठी अत्यंत समृध्द झालेले अनेक जणं असतील. असे त्यांच्याशी नियमित भेटणे जरी नव्हते तरी महाराष्ट्र टाईम्स, लोकसत्ता, लोकमत, सकाळ ते एशियाटिक सोसायटी या त्यांच्या प्रवासाच्या प्रत्येक टप्प्यावर मी त्यांना भेटत आले आहे. किंबहुना एकदा संबंध आलेला माणूस त्यांच्याशी कायम बांधला जात असे. लोकसत्तात झालेल्या सदराचे पुस्तक करण्याची कल्पना त्यांचीच. त्यानिमित्ताने उपेंद्र कुलकर्णी, आनंद लिमये यांची त्यांनी गाठ घालून दिली. पुस्तकाचा प्रत्यक्ष जन्म होईपर्यंत टिकेकर माझ्या सोबतीने होते, हे मला पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर जाणवले. एवढेच नव्हे, मला आठवते, पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्याला माझा काहीसा विरोध होता, म्हणजे मीच मला लेखक म्हणून मिरवून घ्यायला तयार नव्हते तर टिकेकर स्वत: उठून घरी आले होते आणि प्रकाशन समारंभाची आवश्यकता आणि रुपरेषा ठरवून गेले.

मी आणि सुनंदा, बहुधा आम्ही दोघी त्यांना एकत्रातच भेटत असू. दोघींशीही त्यांचा चांगला संवाद होता, पण त्यातही काही धाग्यांचा फरक होता. सुनंदाशी मैत्रीचे अधिक तर माझ्याबाबत, काहीशी वडिलकीची, कौतुकाची भावना अधिक होती. त्यांचे सकाळचे कार्यालय फोर्टमध्ये होते. आम्ही दोघी रिझर्व्ह बँकेतून बाहेर पडल्यावर कधीकधी त्यांना भेटायला जात असू. आम्ही आणलेली भेळ खाताखाता गप्पा रंगायच्या. म्हणजे तेच बोलायचे. आमची आपली नुसतीच श्रवणभक्ती. एकदा बोलताबोलता मी त्यांना म्हटलं की मी लिहिते खरी, पण गरज वाटते की, त्याला पैलू पाडणारे कुणी असावं. कुणीतरी असा संपादक असावा की, त्याने आपले कठोरपणे मूल्यमापन करावे. माझ्याकडे रोखून पहात मला म्हणाले, 'काळजी करू नका, तुमचा संपादक तुमच्यातच आहे'. टिकेकरांनी मला माझ्यातल्या लेखकाचीच नाही तर माझ्यातल्या संपादकाचीही ओळख करुन दिली आणि मग कुणीतरी आपले विवेचन करुन द्यावे ही गरजही आपोआप संपली. लिहिताना केवळ आपले आपणच आपल्यापाशी असतो, हे कळले आणि जबाबदारीचे अजून एक ओझे टिकेकरांनी ओटीत टाकले. आम्हा दोघींचा त्यांच्याशी असलेल्या नात्यातील सूक्ष्म फरक जसा जाणवायचा तसाच जाणवायचे की कोण काय लिहू शकेल याचे यथार्थ भान आणि काटेकोरपणा त्यांच्यापाशी होता. लोकसत्तात शेजार किंवा स्वच्छंद, एवढेच काय रुईया कॉलेजात त्यांच्या साठीनंतरच्या सोहळ्यात जाहिरात आणि समाजभान लिहिण्यास मला सांगितले तर पुस्तकांविषयी किंवा भाषेविषयी लिहिण्यासाठी सुनंदाला सांगितले. लोकांची नेमकी जाण असलेला असा एक कसलेला संपादक त्यांच्या ठायी अगदी पुरेपूर होता आणि मग त्यात काहीही गल्लत नाही. कोण लेखक किती काळापर्यंत लिहू शकेल, कुणाचा किती बकूब आहे याचे ठोकताळे अगदी बिनचूक असत. जे लेखकांच्या बाबत तेच राजकारण्यांबाबत. मनसेचा तो काळ होता. राज ठाकरे अगदी जोरात होते. त्याच वेळी ते म्हणाले होते की Udhav will have a last laugh. हे द्रष्टेपण ही त्यांची स्वतंत्र प्रतिभा होती.

अगदी पहिले सदर मला लिहायला सांगतानाही त्यांनी जो माझ्यावर विश्वास टाकला तो माझ्यासाठी अपूर्व होता. मी सुरुवात केली आणि लिहित गेले. सारे काही बरोबर चालले आहे यावर त्यांचे बारकाईने लक्ष असायचे, पण कधीही त्यांनी हस्तक्षेप केला नाही. योग्य ते आणि तेवढेच मार्गदर्शन ते जरुर करीत पण आपल्या विद्वत्तेचे ओझे, दबाव अथवा भाराखाली समोरचा दबून जाणार नाही याची ते पुरेपूर काळजी घेत. स्ट्रँड बुकस्टॉलमध्ये त्यांच्याबरोबर जाणे ही देखील एक अपूर्वाईची गोष्ट असे. त्यातही शानबाग होते तेव्हा टिकेकर आणि शानबाग ही भेट म्हणजे पुस्तकावर प्रेम करणाऱ्या दोन व्यक्तींची भेट. त्यांचे दोघांचे ऋजु वागणे, पुस्तकांविषयी चर्चा करणे, पुस्तके हाताळणे हे सारे पहाणे म्हणजे देखील आपण आपल्याला समृद्ध करुन घेणे. अनेक इंग्रजी पुस्तकांचे संदर्भ, ओळख किंबहुना पुस्तकांचेच आपल्याशी माणूस असण्यासारखे नाते स्ट्रँड बुक स्टॉलमध्ये उभ्याउभ्या टिकेकरांनी दाखवून दिले. आजही स्ट्रँड बुक स्टॉलमध्ये जाताना मी मनाने टिकेकरांसोबत पायऱ्या चढते आणि अदृश्य शानबागांबरोबर तिथे वावरते. बाजूच्या स्वागत मध्ये टिकेकर ऐकताऐकता वडा-सांबार खाते.

आयुष्यात सुखापेक्षाही दु:खाचे क्षण जास्त येतात हे माहित असूनही आयुष्य सुंदरच असते अशी माझी भावना आहे. या वाटेवर चालताचालता अशी काही माणसं भेटतात की ज्यांच्या सहवासात तुम्ही खुलता, समृद्ध होता. टिकेकरांनी केवळ समृद्धच केले नाही, तर एक छत्रही धरले होते, याची जाणीव ते गेले या बातमीने झाली. बैयक्तिक आयुष्यात २०१४-१५ मध्ये माझे अनुक्रमे वडिल आणि आई दोघेही गेले. आपले आई-वडिल हे काही आपल्या आयुष्याला पुरत नाहीत हे जरी खरे असले तरी त्यांच्या जाण्याने जे हरपते तेच काहीतरी टिकेकरांच्या जाण्याने माझ्यासाठी हरपले. साहित्य क्षेत्रातल्या कितीतरी गोष्टी अशा असायच्या की टिकेकरांना विचारू आणि मग करू म्हणून ठेवून दिलेल्या असायच्या. पुस्तकाची नवीन आवृत्ती काढायची आहे... विचारू टिकेकरांना, पुढले पुस्तक काढायचे आहे... विचारू टिकेकरांना, नवीन अमुक-ढमुक लिहिण्याचा विचार आहे... टिकेकरांशी चर्चा करून ठरवू, हा संदर्भ हवा आहे... टिकेकर सांगतील... चालताचालता एकेक दगड डोक्यावरुन मागे टाकत चालत रहावे; म्हणावे, करू गोळा नंतर, तसे टिकेकरांना विचारून करण्याजोग्या कितीतरी गोष्टी मी मागे टाकल्या होत्या आणि मला खात्री आहे की माझ्यासारख्याच अनेक माणसांनी अशा कितीतरी गोष्टी टिकेकरांसाठी राखून ठेवल्या असतील, त्या सगळ्याच आज अपूर्ण राहिल्या.

नोव्हेंबरमध्ये एशियाटिक सोसायटीने टिकेकरांना दिलेल्या

फेलोशिपच्या कार्यक्रमाला आम्ही दोघीही गेलो होतो. सोसायटीने दिलेल्या फेलोशिपमुळे टिकेकर खूप आनंदात होते आणि त्या दिवशी खूप छान बोललेसुद्धा. टिकेकरांचा आनंद लहान मुलाप्रमाणे निर्व्याज वाटायचा. एकदा बोलताना सुनंदा त्यांना म्हणाली की, तुम्ही लोकसत्ता न्हाव्याच्या दुकानातून काढून दिवाणखान्यात आणलात. ऊन पसरावे तसा त्यांच्या चेहऱ्यावर आनंद पसरला. कधीही कुठल्याही लेखाचे कौतुक करायचे नाहीत, पण कुठला लेख आवडला की, त्यांच्या चेहऱ्यावरुनच लक्षात यायचे इतका तो चेहरा पारदर्शी होता आणि तरीही ते एक अंतर ठेवूनच रहात. स्तुतीने आनंद होणारे, टीकेने व्यथित होणारे. असुया अजिबात नाहीच असे नाही, आवश्यक तेवढे पण कुचाळक्या नाहीत असे गॉसिपही जवळ बाळगणारे, राजकीय वर्तुळाची इथ्यंभूत माहिती असणारे, माणसांमध्ये प्रचंड रमणारे, अघळ-पघळपणा तरीही काटेकोर शिस्त बाळगून रहाणारे... मानवी अवताराच्या ह्या सर्व छटांपलिकडे मात्र ते होते एक दूरस्थ, आत्ममग्न व्यक्ती. प्रचंड विद्वत्ता, भाषांवर प्रभुत्व, पुस्तकांवर प्रेम, संस्कृतीबद्दल कुतूहल आणि मुंबई शहरावर व विद्यापिठावर प्रेम करणारे.

तर नोव्हेंबरमध्ये एशियाटिकमध्ये पुन्हा खूप दिवसांच्या अंतराने भेटत होतो. कार्यक्रम संपल्यावर त्यांच्यापाशी गेलो. म्हणाले, वेळ आहे ना, थांबा. त्यांच्याभोवती नेहमीप्रमाणेच किंवा अधिकच, माणसांचा गराडा. ते मोकळे होण्याची वाट पहात आम्ही दोघी थांबलो. फ्लॅशची चकमक थांबत नव्हती. एशियाटिकच्या इमारतीबाहेर आवारात उतरुन आलो. मला म्हणाले, अहो तुमचा त्या रघुराम राजनने एवढा भाषणात तुमचा उल्लेख केला, त्याद्दल मला तुम्हाला एक बक्षीस द्यायचे आहे. मी म्हटले, घरी जेवायला या, तेच माझ्यासाठी बक्षीस असेल. त्यावर ते म्हणाले, केव्हाही बोलवा. आता काय मी मोकळाच आहे. या note वर आम्ही निरोप घेतला. आता आम्हा दोघांचेहि काही राहून गेले, त्यांचे मला बक्षीस देणे आणि माझे त्यांना जेवायला बोलावणे. असो. आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यात अशी एक एकोणिस जानेवारी येणारच असते...

– राणी दुर्वे
भ्रमणध्वनी : ९६१९६६३९७२
ranidurve@gmail.com



**मूल्य ३०० रुपये**
**सवलतीत १८० रुपये**

॥ग्रंथाली॥

## सल-उकल – नरेंद्र लांजेवार

नरेंद्र लांजेवार हे प्रथम सामाजिक कार्यकर्ते व लेखक आहेत. संवेदनशील कार्यकर्ता म्हणून ते दैनंदिन घडामोडींबद्दल आपला प्रतिसाद नोंदवत असतात. त्यांचे शेतकऱ्यांच्या आत्महत्या : चिंतन आणि उपाय, वाचनसंस्कृती : आक्षेप आणि अपेक्षा, एका ग्रंथपालाची प्रयोगशाळा, अभिव्यक्तीची स्पंदने, एकाच नाण्याच्या तीन बाजू, शिक्षणावर बोलू काही/नाही... असे ग्रंथ व वृत्तपत्रीय लेखन नरेंद्र लांजेवारांनी केले आहे. त्यांच्या 'सल-उकल' पुस्तकात शंभरच्या आसपास लेख आहेत. दै. देशोन्नती या वृत्तपत्रात 'सल आणि उकल' हे त्यांचे साप्ताहिक सदर सुरू होते. या सदरातील लेखांचे या पुस्तकात संकलन केलेले आहे. नरेंद्र लांजेवारांची मते आपल्या सर्वांच्या विचार प्रक्रियेला चालना देणारी आहेत. नरेंद्र लांजेवार हे राजकीय प्रतिपादनापेक्षा सामाजिक दुर्गुणांवर नेमके बोट ठेवतात. नरेंद्र लांजेवारांचा हा लेखसंग्रह म्हणजे एका विशिष्ट कालखंडात घडणाऱ्या बऱ्यावाईट गोष्टींच्या नोंदीचा सामाजिक दस्तऐवजच नाही, तर आहे ते प्रश्न सोडविण्यासाठीचे दिशादर्शक सुंदर विचारसुद्धा आहे. – डॉ. कुमार समर्षी

नरेंद्र लांजेवार हे विदर्भाच्या त्यांच्या पिढीचे भूषणावह असे एक महत्त्वाचे विचारवंत कार्यकर्ते असलेले नाव आहे. त्यांचा वावर वाङ्मयीन, सांस्कृतिक, ग्रंथ, वाचन चळवळींबरोबरच पत्रकारिता स्तंभलेखन आणि त्यातही सामाजिक परिवर्तनवादी अशा सुधारक प्रवृत्तीचे स्तंभलेखन व परिवर्तनच्या चळवळीतील विविध विषयांवरचे प्रत्यक्ष कृतिपर कार्य आणि विचार क्षेत्रात सातत्याने राहिला आहे. प्रस्तुतचा त्यांचा हा ग्रंथ त्यांच्या ह्या व्यक्तिमत्वाचा निदर्शक ग्रंथ आहे. आपल्या पिढीला प्रश्नच पडत नाही या वास्तवापासून तो ते प्रश्न नेमके कोणते व कोणकोणत्या विषयांवरचे पडायला हवेत या संबंधात त्यांनी वेळोवेळी केलेल्या त्यांच्या स्फुट व अल्पाक्षरी मात्र प्रभावी व परिणामकारक लेखनाचा हा संग्रह आहे. भारतीयतेची जडणघडण ज्या वास्तव, विवेकी व शास्त्रीय वृत्तीच्या पायावर व्हायला हवी तो पाया सिद्ध करण्याचा विचार आणि दृष्टी या पिढीला प्रदान करण्याचे मोलाचे कार्य नरेंद्र लांजेवार यांचे हे लेखन करीत आहे. समकालीन वास्तवाच्या संदर्भात म्हणूनच या 'सल आणि उकल' लेखसंग्रहाचे मोल अधिकच आहे. – डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी

# पत्रकारितेतील गुरू

अपर्णा पाडगांवकर



**'स्थलकाल'चं लेखन सुरू होतं तेव्हा लेख लिहून झाला की मग टिकेकर संदर्भग्रंथ घेऊन लायब्ररीत जायचे. अनेकदा मी त्यांच्याबरोबर अशी लायब्ररीत गेले आहे. आज कळतं की त्यांच्याबरोबर ग्रंथालयात जाणं ही काय चीज होती... पुस्तकं हा त्यांचा श्वास होता... विशेषत: संदर्भग्रंथ. ते कसे वापरावेत, कसे अभ्यासावेत हे त्यांच्याबरोबर राहून समजलं मला.**

**सो**मवार, १० जुलै २०००. दुपारी साधारण १२ची वेळ. मी 'लोकसत्ता'च्या ऑफिसमध्ये पोहोचले. पहिलीच नोकरी. तीही आपण पत्रकार वगैरे व्हायचंय, असं न ठरवता मिळालेली. पत्रकारितेचं जग पूर्णपणे नवीन होतं मला. शुभदा पटवर्धनांशी आधीच बोलणं झालं होतं. त्या म्हणाल्या की, एकदा संपादकांशी बोलून घे. म्हणून मी संपादकांना भेटायला आले होते. मनात थोडी धाकधूकही की, बोलून घे म्हणजे नोकरी कन्फर्म आहे की नाही. तेवढं विचारून घेता आलं असतं, पण ते धाडस नव्हतं. आम्ही दोघी त्यांच्या केबीनमध्ये गेलो. कुठल्याही संपादकांना असं समोरासमोर पहिल्यांदाच बघितलं.

डॉ. टिकेकर, खुर्चीत रेलून बसले होते. हातात सिगरेट. समोरच्या टेबलवर आणि आसपास असंख्य पुस्तकं. कॉम्प्युटर होता की नाही, ते मला आठवत नाही. असावा कदाचित, पण तो फारच क्वचित वापरला गेला. नंतरच्या काळात कॉर्पोरेट कल्चरमध्ये आल्यानंतर आज मला आश्चर्य वाटतं की कॉम्प्युटरशिवाय कसा काय इतका पसारा इतका अचूक सांभाळला डॉक्टरांनी?

तर डॉ. टिकेकर. नाकावर चष्मा आणि बारीकसे पण भेदक डोळे आणि रोखून बघण्याची सवय. दरारा वाटावा असं काही होतं का त्यांच्यात? तेही मला कळलं नाही, इतकी मी बावरून गेले होते.

तेव्हा मी एम.ए. करत होते. मराठी साहित्य. 'मराठीईई???' असं त्यांनी त्यांच्या खास टोनमध्ये विचारलं. जे त्यांच्याशी बोलले आहेत, त्यांनाच तो खास टोन कळू शकेल. शब्द मोजकेच, पण काय म्हणायचं आहे, आवडलंय, राग आलाय, पटलं नाहीये... हे सगळं त्या टोनवरून कळायचं. मी मराठी घेऊन एम.ए. करते आहे, ही त्यांच्यासाठी विशेष बाब नव्हती, हे मला त्याक्षणीच कळलं. आणि माझी बॅकग्राऊंड विज्ञानाची आहे, हे कळल्यावर त्यांना वाटलेलं कौतुकही.

'लोकसत्ते'त लागून जेमतेम तीन दिवस झाले असतील. काय काम करायचं, ते अजून धड कळत नव्हतंच. तशात त्यांनी बोलावलं, डिक्टेशन घ्यायला. माझ्या हातात माझं फाऊंटन पेन होतं. ते बघून त्यांनी शंकेने विचारलं की कधीपासून वापरतेस? मी नेहमीच फाऊंटन पेन वापरते, मला वाटलं की, आता ओरडा बसेल की, त्यात कसा वेळ जातो आणि ते कसं इनकन्व्हिनिअन्ट आहे... पण ते छान हसले. मग मला कळलं की, ते स्वत: फाऊंटन पेन वापरत आणि यूज-न्-थ्रो पेन्सच्या जमान्यात फाऊंटन पेन्स वापरणाऱ्यांबद्दल त्यांना विशेष आस्था होती. त्यांची ही आवड फक्त हौसेपुरती नव्हती. फाऊंटन पेनचा इतिहास, त्यांचं वर्गीकरण, त्यातली घराणी... या सगळ्यात त्यांना रुची होती आणि हे सगळं त्यांच्या बरोबरीने असणाऱ्यांना सांगण्याची प्रचंड आत्मीय कळकळही. त्याचा त्यांच्या संपादक म्हणून असलेल्या अधिकारांशी काहीच संबंध नव्हता. फोर्टमधील त्यांची पेन्स विकत घेण्याची खास दुकानं त्यांच्या

सोबतीने मीही धुंडाळली. खेळण्यांच्या दुकानात गेल्यावर लहान मुलांचा चेहरा आनंदाश्चर्याने कसा विस्फारत असेल, तसं माझं व्हायचं आणि अशा पोराकडे बघताना बापाच्या चेहऱ्यावरचं समाधान त्यांच्या चेहऱ्यावर...

डॉक्टरांकडून किती, कसं, काय शिकायला मिळालं, याला काही मोजमाप नाही. 'मुंबई युनिव्हर्सिटी'चं राजाबाई टॉवरमधलं ग्रंथालय, 'एशियाटिक सोसायटी'चं ग्रंथालय मी त्यांच्याबरोबर पहिल्यांदा बघितलं. तेव्हा 'स्थलकाल'चं त्यांचं लेखन सुरू होतं. दर मंगळवारची डेडलाईन. तो लेख लिहून झाला की मग ते संदर्भग्रंथ घेऊन लायब्ररीत जायचे. अनेकदा मी त्यांच्याबरोबर अशी लायब्ररीत गेले आहे. आज कळतं की त्यांच्याबरोबर ग्रंथालयात जाणं ही काय चीज होती... पुस्तकं हा त्यांचा श्वास होता... विशेषतः संदर्भग्रंथ. ते कसे वापरावेत, कसे अभ्यासावेत हे त्यांच्याबरोबर राहून समजलं मला. एकोणिसावं शतक आणि तेव्हाची मुंबई हा त्यांच्या अभ्यासाचा विषय. संस्कृती किंवा सिव्हिलायझेशन आणि त्यात काळानुरुप होत गेलेले बदल यात मास्टरी. या बदलांचा अभ्यास त्यांनी मन लावून केला आणि ज्यांना ज्यांना त्यात थोडा जरी इंटरेस्ट आहे अशा प्रत्येकाला कौतुकाने त्यात अधिक रस घ्यायला त्यांनी उद्युक्त केलं. छंदाला थोडी अभ्यासाची जोड दिली, की तो आयुष्यभर साथ करतो, आयुष्य त्यामुळे एकरंगी बनत नाही, हे त्यांच्यामुळे कळलं.



**डॉक्टरांकडून किती, कसं, काय शिकायला मिळालं, याला काही मोजमाप नाही. 'मुंबई युनिव्हर्सिटी'चं राजाबाई टॉवरमधलं ग्रंथालय, 'एशियाटिक सोसायटी'चं ग्रंथालय मी त्यांच्याबरोबर पहिल्यांदा बघितलं.**

तांत्रिक प्रगतीमुळे आयुष्यात होणारे बदल मात्र त्यांना फारसे मानवत नव्हते. मी जुना माणूस आहे, ते म्हणायचे. मात्र, काळाबरोबर राहण्याचा प्रयत्न त्यांनी जरूर केला. ते जाण्यापूर्वी एक आठवडाभरच आधी आम्ही एशियाटिकमध्ये भेटलो, तेव्हा नवा घेतलेला स्मार्टफोन कसा वापरावा, ते शिकण्याचा त्यांचा प्रयत्न चालू होता.

कामात चोख असणं, हा गुण आता कॉर्पोरेट कल्चरमध्ये दुर्मीळ होत चालला आहे. महत्त्व येतं आहे ते चुकीचं खापर आपल्यावर फुटू नये, यासाठी काळजी घेण्याला... डॉक्टरांबरोबर काम करताना कामात चुका होऊ नयेत, याची डोळ्यांत तेल घालून घ्यायची दक्षता घेण्याची लागलेली सवय किंवा त्यासाठीचा अलर्टनेस अंगात आला, त्याचा अशा ठिकाणी काम करताना प्रचंड फायदा होतो.

'लोकमुद्रा' ही त्यांची ड्रीम सप्लिमेंट होती. त्यासाठीचे विषय आणि त्यातल्या मजकुराचा नेमकेपणा तपासताना किती संदर्भ तपासले असतील आम्ही त्याची गणतीच नाही. पानं लावून झाली की एथ्री साईझच्या पेपरवर त्याचा प्रिंटआउट त्यांना दाखवला जाई. इतक्या मोठ्या पानावरच्या मजकुरात झालेली शुद्धलेखनाची एकही चूक त्यांच्या नजरेतून निसटत नसे... आपलं काम प्रामाणिकपणे आणि डोळ्यांत तेल घालून करावं, ही सवय त्यामुळेच आता रक्तात भिनली आहे.


हा प्रामाणिकपणा त्यांनी आयुष्यभर जपला. आपण संपादक असताना आपल्या वृत्तपत्रात आपली छबी छापली जाऊ नये, हे त्यांनी कसोशीने पाळलं. इलेक्ट्रॉनिक माध्यमांबद्दल असलेली त्यांची दूरत्वाची भावना सर्वश्रुत होती आणि शेवटपर्यंत त्या व्यासपीठावर जाणं त्यांनी टाळलं. जे आपल्याला पटत नाही, ते करायचं नाही, प्रासंगिक प्रसिद्धी-लाभासाठी तर नाहीच नाही, हे कृतीतून दाखवून देणारी माणसं आता फारशी नाहीतच आसपास. अशावेळी, डॉ. टिकेकरांचं जाणं ही मनाला चटका लावणारी गोष्ट आहे.

आज त्यांच्याबद्दलच्या कितीतरी गोष्टी आठवतायत - - ब्रिटिश सभ्यता आणि शिष्टाचार याबद्दल त्यांना असणारं प्रेम, शास्त्रीय संगीताबद्दलची समज, जयंतराव साळगावकर आणि भीमसेन जोशींशी असलेले आत्मीय संबंध, मधुबालाही त्यांची एक खास जागा होती. सिगरेट तर सगळ्यांनाच माहीत आहे , त्याबरोबर खास सुपारीही. बरवर बघता या गोष्टी त्यांच्या करड्या शिस्तीच्या आणि अभ्यासक संशोधनवृत्तीच्या विरोधी वाटतील. पण हा विरोधाभास त्यांच्याजवळ असणाऱ्यांसाठी एक आदर्श ठरला. आपल्या वैयक्तिक आवडीनिवडी कामाच्या आड येता कामा नयेत, हे याहून ठळकपणे कसं सांगता येईल? सोबत काम करणाऱ्यांच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल काळजी जरुर होती पण त्यांनी कधी खोदून चौकशा केल्या नाहीत. तुझं बरं चाललंय ना, एवढंच ते विचारायचे. त्यातच कधीही काही लागलं तर मला सांग, हे आश्वासन होतं. हे आश्वासन गेलं. याहून मोठी काय हानी असू शकणार आहे?

**- अपर्णा पाडगांवकर**
भ्रमणध्वनी : ९८३३६६१२१३
aparna.padgaonkar@gmail.com

# तिसरा पर्याय

## डॉ. रविन थत्ते



**तत्त्वमंथन**

**एका बाजूला साम्यवाद आणि भांडवलशाही आणि दुसरीकडे ईश्वरवाद आणि जडवाद ह्या वादावादीत चष्मा डोक्यावर आणि शोधत बसतो घरभर असे होते. विश्वरूप दर्शन बघून अर्जुन घाबरतो आणि मला तुझे चतुर्भुज रूप दाखव असे म्हणतो तेव्हा त्याला श्रीकृष्ण अडाणी म्हणतो. त्या दर्शनात ज्ञानेश्वर श्रीकृष्णाला एका कोपऱ्यात दाखवतात. इथे गुरूची विद्या गुरूलाच फळते. चतुर्भुज रूप दाखवल्यानंतर तू कर्म करत रहा पण मी हे केले-मिळवले हा विचार सोडून दे असा उपदेश आला आहे. हा उपदेश जडवादात किंवा इहवादात कसा सामावून घ्यायचा हा एक प्रश्नच आहे.**

यश वेलणकर ह्यांनी ईश्वरवाद आणि जडवाद ह्या दोघांमधले द्वंद्व जानेवारीच्या 'शब्द रुची' मासिकात मोठ्या वेधकप्रमाणे मांडले आणि त्याला तिसरा पर्याय काय असा तितकाच वेधक प्रश्न आपल्यापुढे ठेवला आहे. मुळात ईश्वर ह्या शब्दाची व्याख्याच मुळी कोठल्याही धर्मात स्पष्ट नाही. आपल्यात श्रीकृष्णाच्या तोंडी 'मी कोणाचे पापपुण्य घेत नाही' असे विधान आहे; त्यावर ओवी सांगताना 'मी जन्माला घालतो, पाळतो आणि मारतो असे मानणे म्हणजे अज्ञान आहे' असे ज्ञानेश्वरांचे वचन आहे. नासदीय सूक्तात हे विश्व कसे निर्माण झाले हे देवालाही ठाऊक नसणार असा अभिप्राय सापडतो. ह्या उलट जडवाद हा (आधुनिक) विज्ञानाशी संबंधित आहे असे वारंवार ऐकू येते. हे विज्ञान प्रयोगशाळांमधले अशीही समजूत प्रचलित आहे. ज्ञानेश्वरीत विज्ञानाची व्याख्या 'प्रपंचाचे ज्ञान ते विज्ञान' अशी दिली आहे. हे विज्ञान प्रयोगशाळेबाहेरही असू शकते किंवा असते. हे विज्ञान निसर्गाशी संबंधित आहे. त्याच्या अवलोकनासाठी गणित किंवा प्रयोगशाळा आवश्यक असतातच असे नाही. माणूस, त्याचा स्वभाव, माणसामाणसामधले संबंध, त्याची स्थलांतरे, त्याच्या बुद्धीचा विकास, समाजाची रचना चालीरीती, धर्मांचा उदय आणि भल्याबुऱ्या समजुती ह्या सगळ्या गोष्टींची जी माहिति तेही विज्ञानच असते. ह्या सगळ्या गोष्टींची उकल जडवादातल्या विज्ञानाने होऊ शकेल असे म्हणणे धार्ष्ट्याचे ठरेल. ईश्वरवाद आणि जडवाद दोन्ही वाद टोकाची भूमिका घेतात. वेदप्रतिपाद्य ह्या शब्दाचा अर्थ 'जी गोष्ट वेदांच्या प्रतिपादनाचा विषय आहे' असा आहे. वेद अंतिम सत्य सांगतात असा त्याचा अर्थ नाही. अज्ञानी माणसे ठाम असतात. मला सगळ्या गोष्टींची उत्तरे माहीत नाहीत आणि म्हणून मी अज्ञानी आहे असे म्हणणारा साक्रेटिस खरे तर ज्ञानी होता. माणसाला स्वतःच्या पाठीवरून चालता येत नाही (इति ज्ञानेश्वर). जडवाद आणि चैतन्यवाद असे एक दुसरे कृत्रिम द्वंद्व आहे. पदार्थविज्ञान आणि विश्वोत्पत्तीची हल्लीची प्रमाणित कल्पना (Standard Model) एका ऊर्जेने ठसठसून भरलेल्या बिंदूचे रुपांतर विश्वात झाले असे मानते. आत्मरुपा ह्या शब्दातल्या आत्मचा अर्थ बळ किंवा Force असाही दिला आहे. त्यातूनच रूपे अवतरतात. ऊर्जा काही विझून जात नाही. त्या बिंदूच्या स्फोटानंतर ती ऊर्जा आकाश निर्माण करत विश्वभर पसरते. त्या स्फोटातली उष्णता निवू लागली की मग कण अवतरतात. ते एकत्र झाले की मेघ तयार होतात. त्यातून ग्रह-तारे जन्म घेतात. 'रात्रीविना मावळले रविराशि' ह्या ओवीतली स्थिती ह्या मेघांपूर्वीची. एका पृथ्वी नावाच्या ग्रहावर एका विशिष्ट परिस्थितीत जीव निर्माण होतात. ग्रहताऱ्यांच्या निर्मितीच्या आधी 'कशी कोण जाणे एक वेळी घनपटले उमटली नाना वर्णी' अशी ज्ञानेश्वरांची ओवी आहे. जीवसृष्टीबद्दल लिहिताना ज्ञानेश्वरांचे

पंधराव्या अध्यायाचे निरुपण मुळातून वाचायला हवे. परंतु त्यातल्या पसरणाऱ्या आणि फोफावणाऱ्या वृक्षाचे वर्णन उत्क्रांतीचे अंधुक दर्शन घडवते. इथे स्त्री-पुरुष नपुंसक, अंडज, जास्त, स्वेदज, भूमिज असे प्राणीमात्रांचे बर्गीकरण किंवा पशु-पक्षी, डुक्कर, व्याघ्र, विंचू, विखार ह्यांची वर्णने आहेत. माणसांची ज्ञानी आणि शांत, आक्रमक आणि उपद्व्यापी आणि आळशी आणि मूढ अशीही वर्णने येतात. ह्या लोकांना वेद सुचतात, परंतु म्हणून शहाणपण येते असे नाही. अशी उपरोधिक वर्णने आली आहेत. हे सगळे जडबाद किंवा ईश्वरवाद किंवा चैतन्यवाद ह्या तीन निरनिराळ्या कोनाड्यात बसवणे अवघड आहे. नाही कर्ता नावाचा प्रकार। अनाकलनीय घडतो व्यापार। घेते सृष्टी आकार। ते कर्म। त्या कर्माचे संपूर्ण आकलन आले तो उद्या जडवादातल्या विज्ञानाने शक्य आहे असा दावा आहे. परंतु त्या आधी आधुनिक विज्ञानामुळे घडलेला विध्वंस आणि अब्जावधी वर्षे फुललेला पण चारशे वर्षांत बेचिराख झालेला निसर्ग ह्याचीही मीमांसा त्यांनी केलेली बरी.

अकर्त्या ईश्वरावर कर्तेपण लादून आपण आपले कर्तेपण हरवतो तर दुसरीकडे 'कर्तृत्वाचा मदु' आणि कर्मफलाचा आस्वाद मधला आस्वाद कर्तृत्वाच्या मदूला चक्रवाढव्याजाने वाढवत जातो. त्यासाठी हे कर्म म्हणजे स्वभावे विश्वाकारू संभवे। ह्यातले विश्व सहजपणे उलगडताना जे घडते ते कर्म आणि कर्माच्या प्रवाहात माणसाचा जन्म होतो म्हणून तोही एक कर्माचे रूप आहे हे आधी ध्यानात घ्यावे लागते. माणसाचे मन माकडासारखे चंचल असते. त्या मनात सुख-दुःख, द्वेष ह्या उप्पर तिसरी भावना शक्य नसते आणि ह्या त्रिकुटाला साक्षी भावाने बघितले तर आनंद वाढतो. हे प्रमेय ईश्वरवाद किंवा जडबादावर अवलंबून नाही. तूच तुझा मित्र किंवा शत्रू आहेस ही गीतेचा निरोप साधे व्यवहारज्ञान आहे. माणसाचे मन लालची असते. त्याला आत्मानुभवाची गोडी लावावी ह्या ज्ञानेश्वरांच्या निरोपात आत्म ह्या शब्दावर आत्मा ही चीजच नाही अशी आरोळी ठोकणे विपर्यस्त आहे. भावनांचा गदारोळ आणि विषयांच्या गराड्यातला माणूस स्वबुद्धीने स्वतःचे निरीक्षण करून आपल्या स्वार्थ आणि स्वत्वाला आवरून संसार आणि समाजकार्य दोन्ही करू शकतो. तो समाजकार्य करतो कारण त्या समाजाचे तो देणे लागतो, कारण त्याचे अस्तित्व आणि त्याची मिळकत दोन्ही समाजाच्या कोंदणात घडतात; असले विचार श्रुती म्हणून प्रसिद्ध असले तरी स्वपरीक्षण किंवा समाजाचे अवलोकन करून ते माणसानेच सांगितले आहेत. त्याला देवांचा केबल टीव्ही म्हणणे अयोग्यच तसेच जडवादाने ह्या उत्स्फूर्त विचारांबर आपला हक्क सांगणेही तेवढेच चुकीचे आहे. स्फूर्ती आणि बुद्धी ह्या दोन्ही चैतन्याचा लखलखीत अबतार आहे. शरीरही तिथूनच आले आहे. प्रथम चैतन्यच होते. ते बळ आपल्यात, समाजात ऋणानुबंध प्रस्थापित करते हे समजणे म्हणजे अध्यात्म. ह्या ऋणानुबंधावर स्वारी करून आपण मतलबी वागणे ह्याला फार मोठा हातभार आधुनिक विज्ञानाने लावला हे नाकारणे अशक्य आहे. ती माणसाचीच चूक आहे; देवाचा कोप नव्हे. विज्ञान विज्ञान करत जो निसर्गावर कुरघोडी करून स्वतःला सुखी करण्याच्या मागे असतो तो एका अर्थाने आंधळा असतो. मोराच्या पिसाऱ्यावर शंभर डोळे पण ते सगळेच आंधळे, ही ओवी ज्या तेराव्या अध्यायात येते, त्यातच श्रीकृष्ण नावाच्या ईश्वराने निरीश्वरवादी सांख्य तत्त्वज्ञान सांगितले आहे. त्यात ऋणानुबंधांचा सुंदर आणि सोज्वळ आविष्कार अनुभवल्यानंतर माणसात सद्गुणांचा जन्म होतो. त्यात चडफडल्याशिवाय क्षमा कशी करायची, हात बुडणाऱ्याला बाहेर काढण्यासाठी, जर्जर माणसाच्या त्वचेवर फिरवण्यासाठी किंवा आशीर्वाद देण्यासाठी असतात हे वर्णन ज्ञानेश्वरांचे. त्याउलट हे ऋणानुबंध मोडले की कुत्रा शिळे आहे की सडलेले हे न तपासता जसे खातो किंवा उघड्यावर संग करतो किंवा दूरवर भिरकावलेल्या चेंडूच्या मागे विचार न करता पळतो असलेही दाखले दिले आहेत. सांख्यांनी सगळ्याच घडणीमधे जी तत्त्वे सांगितली त्यात चैतन्य हा एक भाग सांगितला. वेदात्यांनी चैतन्य मूलभूत मानून त्यातून विश्व प्रसवते आणि ते सर्वत्र हजर असते असे म्हणून तत्त्वज्ञानाचा कळस गाठला. अठराव्यात आपोआप उगवते गवत, पेरावा लागतो भात, नदी स्वाभाविक वाहते, विहीर खणावी लागते आणि शरीर घडते परंतु करावे लागतात दागिने अशा अर्थाच्या ओव्या आहेत. तिन्ही गोष्टींत पृथ्वी खणली जाते. ज्यांना हे जमते, ते आर्थिक विषमतेची बीजे पेरतात आणि शिरजोर होतात. ईश्वर इथे काय करू शकतो? जडवाद आणि इहवादाचे ह्या समस्यांवर काय उत्तर आहे? एका बाजूला साम्यवाद आणि भांडवलशाही आणि दुसरीकडे ईश्वरवाद आणि जडवाद ह्या वादावादीत चष्मा डोक्यावर आणि शोधत बसतो घरभर असे होते. चष्मा नीट चढवून जर बघितले तर खरे तर सगळे स्पष्ट होते. विश्वरूप दर्शन बघून अर्जुन घाबरतो आणि मला तुझे चतुर्भुज रूप दाखव असे म्हणतो तेव्हा त्याला श्रीकृष्ण अडाणी म्हणतो. त्या दर्शनात ज्ञानेश्वर श्रीकृष्णाला एका कोपऱ्यात दाखवतात. इथे गुरूची विद्या गुरूलाच फळते. चतुर्भुज रूप दाखवल्यानंतर तू कर्म करत रहा पण मी हे केले-मिळवले हा विचार सोडून दे असा उपदेश आला आहे. हा उपदेश जडवादात किंवा इहवादात कसा सामावून घ्यायचा हा एक प्रश्नच आहे. एकंदरच माणसापुढील माणसानेच तयार केलेल्या समस्यांवर उपाय माणसानेच स्वबुद्धीने शोधावे लागतील. बुद्धी होती म्हणूनच पुरातनकाली नैतिकतेचा जन्म झाला. ईश्वर त्याला जबाबदार नाही आणि जडवादाच्या कोनाड्यात नैतिकता कोंबता येत नाही.

– डॉ. रविन थत्ते
भ्रमणध्वनी : ९८२०५२३६१६
rlthatte@gmail.com



# प्रतिसाद

**रुचीचा अंक टपालाने आणि इंटरनेटच्या माध्यमातून गोंदवल्यापासून गोंदियापर्यंत आणि सिडनीपासून सिनसिनाटीपर्यंत सर्वदूर जातो आणि साहजिकच अनेकजण वेळोवेळी अंकावरील प्रतिक्रिया आमच्याकडे पाठवत असतात. त्या प्रसिद्ध कराव्यात अशी त्यांची अपेक्षाही नसते. पण हा प्रतिसाद वाचकांसाठी आणि एकूण वाचन व्यवहारासाठीही नोंदवण्याजोगा असतो, असे काही वाचकांनी कळवले. त्यामुळे या अंकापासून निवडक आणि मोजका प्रतिसाद प्रसिद्ध करीत आहोत, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी. आपल्या प्रतिक्रिया जरूर कळवाव्यात. – संपादक**

### व्यापाराच्या मार्गाने संक्रमणाची दिशा

**आ**ज जगभरात चालू असलेला संघर्ष हा संस्कृतींमधील आहे का विचारधारांमधील आहे याबद्दलच्या तत्वमंथनाचे स्वागतच आहे. अशा प्रकारचा संघर्ष मानवी इतिहासात वेळोवेळी होत आला असून त्यातूनच काही नवीन मूल्यांचा जन्म झाला आहे आणि विधायक मार्गही सापडत गेले आहेत.

सर्वप्रकारच्या संस्कृतींचा उदय व विस्तार हा समाजाच्या भौगोलिक परिस्थिती व जीवनशैलींवर अवलंबून असतो. अप्रगत अवस्थेतील संस्कृती व विचारधारा, प्रगत अवस्थेत बदलत जातात. प्रगत अवस्थेतच सत्तेचा प्रवेश होतो व त्यानंतर अवलंबिलेल्या संस्कृती व विचारधारेवर राजकारणाचा अंमल असतो. आर्थिकदृष्ट्या सधन आणि सत्ताकारणातील व्यक्ती व समूह मग मूल्यांची धारणा ठरवतात आणि सर्वसाधारण जनसमुहाला ती स्वीकारण्यापलीकडे पर्याय नसतो.

धर्म आणि शिक्षणाची फारकत सुमारे दोनशे वर्षांपासून जगभरात होत आली आहे. ज्या समाजात अशी फारकत झालेली नाही त्या समाजाची विचारधारा व संस्कृती आजच्या विज्ञाननिष्ठ युगात मागासलेली वाटते आहे. परंतु सरसकट असे समजायचे कारण नाही. विज्ञाननिष्ठ अशा विचारधारेला संस्कृती बनण्यात अजून बराच काळ लागेल, कारण बऱ्याच स्थित्यंतरांमधून या विचारधारेला जायचे आहे. तेव्हा कुठे त्या संस्कृतीचा उदय होईल.

शिक्षणाप्रमाणेच मूल्यांचीही फारकत धर्मापासून मोठ्या प्रमाणावर ह्या आधुनिक युगात होत आहे. मूल्यांच्या मागे असणारी पाप-पुण्याची तसेच स्वर्ग-नरकाची भावना जाऊन वैश्विक नीतिमुल्य आज सरकारे, प्रसारमाध्यमे, लिखित वाङ्मय व त्या त्या ठिकाणची न्यायव्यवस्था राबवण्याचा करत आहेत. ही मूल्ये भौगोलिक परिस्थिती, वर्ण, धर्म, जात, भाषा व स्थानिक संस्कृती आणि इतिहास यांना बाजूला सारून रुजविण्याचा प्रयत्न पद्धतशीरपणे होत आहे. परंतु ही मूल्येही अतिप्रगत आणि सामर्थ्यशाली देश आपल्या व आपल्या समर्थकांच्या हितासाठी रुजवायचा प्रयत्न करतात असा संशय येण्याजोगी परिस्थिती आहे.

राहिला प्रश्न विधायक मार्ग शोधण्याचा. वर वर्णन केलेल्या संदिग्ध व गुंतागुंतीच्या परिस्थितीत सर्व समाजासाठी एकच मार्ग शोधणे कठीण आहे. जगातील भौगोलिक विविधता, धार्मिकता, विविधवर्णीय समाज, भाषिक आणि आर्थिक विषमता लक्षात घेता ते काहीसे दुरापास्तच आहे असे वाटते.

परंतु ह्या तिन्ही प्रश्नांच्या जवळ जाण्याचा मार्ग, तंत्रज्ञान व त्यापासून फायदा घेण्यासाठी निर्माण होणारी संस्कृती ह्यातून सापडू शकतो. इंटरनेट, मोबाईल फोन सेवा, कॉम्पुटर, दळणवळणाची तसेच आर्थिक व्यवहाराची प्रणाली, वैद्यकीय उपचार व मार्केटिंग ह्यामुळे जगातील सर्व समाज एकाच पातळीवर येत आहे. त्यांच्या वापरामुळे कोठेही संघर्ष झालेला दिसत नाही. त्यामागचे उपयुक्तता मूल्य सर्व लहानथोरांना एकाच मनोधारणेमध्ये आणण्यात यशस्वी होत आहे.

व्यापाराच्या मार्गाने होणारे हे संक्रमण हाच विधायक मार्ग आता जगापुढे पुढील वैश्विक स्थित्यंतरापर्यंत असेल असे वाटते.

– **श्रीराम घैसास** (भ्रमणध्वनी ९८२०६ २८३११)

---

रुची जानेवारी १६ मधील 'तत्त्वमंथन' हा आरंभलेख खूप खूप आवडला. ही विचारप्रक्रिया काहीतरी पॉझिटिव्ह अवश्य देऊन जाईल, याची खात्री वाटते.

– **लाखनसिंग कात्रे**

बोरकन्हार, जिल्हा गोंदिया. (भ्रमणध्वनी ७०६६९६८३५०)

---

रुची' चा दिवाळी अंक आवडला.

आणिबाणीवरील तीन लेख विशेष वाटले. सतीश कामतांनी त्या पर्वाचा उत्तम पण संयत आढावा घेतला आहे व आजच्या काळाशी त्याचा योग्य संबंध जोडला आहे. पुपुल जयकरांच्या स्मृती अतिशय हृद्य. पण त्यांच्या व धर यांच्या लेखातील अनेक घटना अथवा निरीक्षणांसाठी पुरावा काय हा प्रश्न राहतो. त्यांचे इच्छाचिंतन व स्मृतिप्रदूषण हे धोके नाकारता येत नाहीत. इंदिरा गांधींनी निवडणुका का घेतल्या याचे खरे उत्तर काय याबाबत राशोमानसारखे अनेक संभाव्य सत्य कळतात.

आल्हाद गोडबोलेंचा जर्मन चित्रपटावरील लेख – विषय, आशय व शैली तिन्ही अंगाने सुंदर वाटला.

गांगलांच्या ग्रंथालीबाबत आठवणी हृद्य. आजच्या अनेक नवीन उपक्रमांसाठी त्यात विचारार्थ मुद्दे आहेत.

**– अभय बंग**

गडचिरोली

search.gada@gmail.com

# भयभीत अमेरिका

**डॉ. अनंत पां. लाभसेटवार**



**अमेरिका एकमेव महासत्ताक राष्ट्र असून तिचा जगभर दरारा असला तरी हल्ली त्या देशातले लोकच भितात असं आढळून येतं. दहशतवाद्यांमुळे सगळी अमेरिका हैराण झाली आहे. आतापर्यंत ते या हल्लेखोरांची दहशतवादी दूरस्थ कृत्ये दूरचित्रवाणीवर बघून त्यापासून आपण सुरक्षित आहोत म्हणून समाधान मानीत. पण आता या दहशतवाद्यांनी अमेरिकेलाच लक्ष्य केलं आहे. म्हणून प्रत्येक बुरखा म्हणजे लपलेला हल्लेखोर अशी त्यांची मानसिकता झालेली आहे. अलिकडे झालेल्या अनेक निर्घृण हत्यांमुळे आपलं अंगण सुरक्षित नाही याची त्यांना खात्री झालेली आहे.**

**न**वीन वर्षाच्या सुरुवातीला फिलाडेल्फीयामध्ये एका कृष्णवर्णीय मुस्लिम माणसानं 'अल्ला हो अकबर'चे नारे देत एका पोलिसाला १३ गोळ्या घातल्या. त्याच्या आयुष्याची दोरी एवढी बळकट की तो बिचारा वाचला. त्याच सुमारास पोलिसांनी दोन मुस्लिम निर्वासितांना अटक केली. त्यांचा जन्म इराकमधला. त्यांच्याजवळ आयसिस (ISIS) या संघटनेशी निष्ठा दाखवणारी कागदपत्रं सापडली. आता दहशतवाद दारी आला म्हणून सर्व अमेरिका चिंताग्रस्त झाली आहे. मॉलवर जाणं देखील आवडेनासं झालं आहे.

युरोपमध्ये १५ लाख निर्वासितांनी घर केलं. त्यातल्या १० लाख लोकांचं एकट्या जर्मनीत पुनर्वसन झालं. पण त्याचे परिणाम लवकरच त्या समाजावर उमटून चँसेलर अँजेला मर्कल राजकीय कोंडीत सापडल्या. सिरियातून आलेल्या काही निर्वासितांनी लैंगिक हल्ले केले. कोलोन (Cologne) या शहरात १२० स्त्रियांनी आरोपपत्र दाखल केले व तिथल्या पोलिस आयुक्ताला राजीनामा द्यावा लागला. हेच चित्र इतर सिरीयन विस्थापितांना स्वीकारणाऱ्या स्वीडन, नॉर्वे, स्वित्झर्लंड आदी देशांत दिसलं. स्वीडन तर जगाची बलात्काराची राजधानी म्हणून ओळखली जाऊ लागली. सापाला दूध पाजल्यानं त्याचं विष कमी होत नाही तसंच या निर्वासितांना आडोसा दिल्यानं त्यातले दहशतवादी एकदम तुकाराम बनत नाहीत हेच खरं.

त्यावर औषध म्हणून लोकांनी स्वसंरक्षणार्थ शस्त्र धारण करण्यास सुरुवात केली. बंदुकांचा खप वाढला. या देशात ते कायदेशीर समजण्यात येतं. २०१६च्या पहिल्या आठवड्यात इथल्या शेअर बाजारानं ऐतिहासिक कोलांटी खाल्ली. पण त्याला एक अपवाद होता. बंदुका व त्यासाठी लागणाऱ्या गोळ्या तयार करणाऱ्या कंपन्यांचे समभाग वर गेले. टेक्सास या राज्यानं तर टोकाचं पाऊल उचललं. तिथे बंदुका व अग्निशस्त्र उघडपणे अंगावर बांधून मिरवण्यास लोकांना परवानगी मिळाली. आता तिथले लोक कमरेला बंदूक बांधून फिरतात. ओहायो प्रांतातही शस्त्र लपवून बाहेर पडता येतं. अनेक तरुणींच्या बटव्यात सौंदर्य प्रसाधनाबरोबर बंदूक ठेवलेली आढळते. पण शस्त्र बाळगून

हल्ले कमी होतात याला पुरावा नाही. या शस्त्रधारणेवरून अमेरिकन लोक प्रक्षुब्ध झालेले आहेत हे सिद्ध होतं. उभ्या अमेरिकेचं मानसिक स्वास्थ्य असंतुलित होऊन त्यातले ७० टक्के लोक आपल्याला या माथेफिरूंची भीती वाटते असं मत व्यक्त करतात. अनेकांनी गर्दीच्या ठिकाणी जाणं बंद केलं.

या भितीची परिणती मुस्लिमांच्या द्वेषात झालेली आहे. अमेरिकेत एकूण नव्वद लाख ते एक कोटी मुस्लिम धर्माचे लोक राहतात. तुलनेनं भारतीयांची संख्या तीस लाख आहे. धर्मप्रसारासाठी सौदी अरेबियानं दान केलेल्या पैशामुळे या देशात देवळांपेक्षा मशिदी कितीतरी जास्त. त्यांच्यावर अनेकांनी रंग फेकले. खिडक्या फोडल्या. डोनाल्ड ट्रंप नावाचा अध्यक्षीय पदाचा दावेदार यापुढे गेला. युद्धग्रस्त देशातून येणाऱ्या मुस्लिमांनाच नव्हे तर सर्व नवीन मुस्लिमांना अमेरिकेत काही काळ तरी प्रवेशबंदी करा म्हणून घोषणा केली आणि त्यानं सर्व राजकारण ढवळून टाकलं. अनेकांनी त्याच्यावर टीका केली. पण सर्वसामान्य जनता त्याच्यामागे आहे. त्याची लोकप्रियता लगेच वाढली. १७ उमेदवारांत तो अग्रस्थानी आहे.

या हल्ल्याविषयी अमेरिका किती संवेदनशील झाली आहे याची १५ डिसेंबर, २०१५ रोजी झालेल्या एका घटनेवरून कल्पना येईल. त्या दिवशी जर्मनीतल्या मुस्लिमांनी लॉस अँजेलिसच्या शाळांमध्ये दहशतवादी हल्ले होणार अशी वल्गना केली. या जिल्ह्यात जवळजवळ ९०० शाळा व ७ लाख विद्यार्थी आहेत. लगेच सर्व शिक्षणसंस्था बंद करून सगळ्या विद्यार्थ्यांना शिक्षण खंडित करून घरी पाठवण्यात आलं. सर्व शाळांची बाँबसाठी तपासणी करण्यात आली. शेवटी ती धमकी पोकळ व निराधार आहे असं आढळून आलं आणि शैक्षणिक अधिकारी खजिल झाले. दहशतवाद्यांच्या संकेतानुसार हे महासत्ताक राष्ट्र कसं नाचतं हे जगाला कळलं.

१३ नोव्हेंबर, २०१५ला संध्याकाळी दहशतवाद्यांनी पॅरिसला लक्ष्य केलं. तिथल्या अघोर हत्येत १३० लोकांचे आयुष्य अकाली संपुष्टात आलं. अमेरिकेत असं होण्याची चिन्हं दिसत नाहीत असं ओबामा व त्यांचे गृहमंत्री सारखे सांगत असल्यामुळे आपण निर्धास्त आहोत असं अमेरिकन जनतेला वाटलं. परंतु अवघ्या अडीच आठवड्यानंतर म्हणजे २ डिसेंबर, २०१५ रोजी– जेव्हा सगळा देश नाताळच्या सणासाठी भेटवस्तू विकत घेण्यात मग्न झाला होता– दोन पाकिस्तानी वंशाच्या हल्लेखोरांनी ख्रिसमसची पार्टी रंगात आली असताना गोळीबार केला व १४ लोकांना स्वर्गवासी केलं. त्या हत्येमुळे सर्व अमेरिकेला धडकी बसली आणि जो तो संरक्षणार्थ बंदुका विकत घेऊ लागला. ही वागणूक भारतीय लोकांपेक्षा वेगळी आहे. आपण मरणाला भीत नाही. त्यानंतर थोड्याच आठवड्यांत पठाणकोट येथील वायुदलाच्या छावणीवर पाकिस्तानी हल्लेखोरांनी हल्ले केले म्हणून आपल्या मानसिकतेत बदल झाला नाही. त्या मुस्लिम देशाच्या अणुबाँबच्या छायेत आपण राहतो म्हणून कुणाचं मानसिक संतुलन ढळल्याचं ऐकिवात नाही. पण हे वैराग्य अमेरिकन लोकात सापडत नाही. म्हणून आपल्यात शत्रू असलेला बघून ते विचलित झाले तर नवल कसलं?

आयसिस (ISIS) या संहारक व गळे चिरण्यात आनंद मानणाऱ्या संघटनेचे अनुयायी आपल्या देशात सुप्त स्थितीत राहतात असं इथली जनता गृहीत धरीत असे. पण या समजाचं जानेवारी २०१६ मध्ये वास्तवात रुपांतर झालं. टेक्सास व कॅलिफोर्निया या प्रांतात सुरक्षायंत्रणेनं दोन मुस्लिम तरुण पकडले. ते आयसिसचा या देशात प्रचार करीत होते. मिनेसोटा या प्रांतात सोमाली या आफ्रिकन देशातील अनेक निर्वासितांचं पुनर्वसन करण्यात आलं. त्यांची अनेकांची तरुण मुलं आयसिसच्या बाजूनं लढण्यासाठी सिरिया व इराकमध्ये गेली. ते अमेरिकन नागरिक असल्यामुळे त्यांना मायदेशी परतण्यास मुळीच अडचण पडणार नाही. पण त्यांचं माथेफिरूकरण (Radicalization) झालं असल्यामुळे ते केव्हा हल्ले करतील याचा नेम नाही. या भितीनं अमेरिका गर्भगळीत झाली.

तसंच अनेक युरोपियन देशाचे नागरिक ९० दिवसांसाठी व्हिसामुक्त प्रवास अमेरिकेला करू शकत होते. म्हणजे हल्लेखोरांना अमेरिकेत प्रवेश करण्यासाठी कवाड सताड उघडं होतं. या वस्तुस्थितीमुळे अमेरिकन लोकांची झोप उडाली. पण सरकारनं मुस्लिम आमचे शत्रू नाहीत हे थोतांड सुरूच ठेवलं. ओबामा या हल्लेखोरांना धर्मांध मूलतत्ववादी दहशतवादी म्हणून कधीच संबोधत नाहीत. ते त्यांचे हल्ले म्हणजे गुन्ह्याचा एक प्रकार असं समजतात. असं राजनिरपेक्ष भाषेत (Politically Correct) बोलल्यानं आपण जगातल्या १.९ अब्ज मुस्लिमांचा रोष ओढवत नाही असं त्यांना भासवायचं असतं. पण अमेरिकन जनतेला ते मान्य नाही.

अमेरिकन संसद गोगलगाईला लाज यावी एवढ्या मंदगतीनं नेहमी काम करते. कुठलाही कायदा संमत करण्यापूर्वी ती महिने महिने चर्चा करते, तज्ज्ञांशी बोलते व मग वारंवार सुटीवर जाते. त्यामुळे तिची लोकप्रियता अवघी १५ टक्के तर ओबामांची ४४ टक्के. वाउलट मोदींची ७० टक्क्यांच्या घरात आहे. परंतु या हल्लेखोरांनी संसदेची सुस्ती घालवली आणि तिला जागृत केलं. संसदेनं लगेच कायद्यात बदल करून युरोपी हल्लेखोरांना ९० दिवस उघडं असलेलं दार बंद केलं. आता जो कुणी युरोपियन नागरिक गेल्या ५ वर्षांत सिरीया, इराक किंवा इराणसारख्या युद्धग्रस्त देशाला भेट देतो त्यास व्हिसामुक्त प्रवेश नाकारण्यात येणार असून त्यांना व्हिसा प्राप्त करावा लागेल. त्यावेळी त्याच्या पार्श्वभूमीची कसून तपासणी केली जाईल हे ओघानं आलंच. म्हणजे या दहशतवाद्यांत कुंभकर्णी निद्रेत असलेली अमेरिकन संसद जागृत करण्याची अद्भुत शक्ती आहे म्हणायची.

२ डिसेंबर, २०१५ रोजी सॅन बनरनारडिनो या शहरात ज्या मुस्लिम जोडप्यानं १४ निष्पाप लोकांचा धुव्वा उडवला याचं नाव फरूक. त्याचे आईवडील पाकिस्तानमधून आलेले.

त्याला नगरपालिकेत गृहपरीक्षक म्हणून ५१,००० डॉलरची नोकरी होती. त्याची महाजालावर एका तशफीन मलिक नावाच्या २६ वर्षीय तरुणीशी भेट झाली. मग हाजसाठी जेव्हा फरूक सौदी अरेबियाला गेला तेव्हा त्यानं तशफिनला प्रत्यक्षात बुरख्यात बघितलं आणि तिच्याशी लग्नबद्ध होण्याचं ठरवलं. तिच्याजवळ पाकिस्तानी पारपत्र. ती एवढी सनातनी वृत्तीची की बुरखा घातल्याशिवाय बाहेर पडत नसे. तिचं अगोदरच माथेफिरूकरण झालं होतं असं म्हणतात. पण ते तिनं लपवून ठेवलं. टोपणनाव वापरून ती पाश्चात्यांविषयीचा द्वेष सामाजिक माध्यमातून व्यक्त करे. नवलाची गोष्ट म्हणजे तिला प्रियकराचा व्हिसा मिळाला. त्याला K-1 व्हिसा म्हणतात. दरवर्षी असे ३०-४० हजार व्हिसा वाटण्यात येतात. त्यांचा मुख्यत्वेकरून फिलीपाईन्सचे लोक उपयोग करतात. त्याची अट एकच की अमेरिकेत आल्यावर ९० दिवसांत लग्नबंध व्हावं. फरूकनं त्याप्रमाणे लग्न केलं व डिसेंबर २०१५ला त्यांचं मूल सहा महिन्याचं झालं. पण मातृप्रेमापुढे धर्मांध निष्ठा महत्त्वाची ठरली आणि तशफिननं आपलं मूल मागे ठेवून या हत्याकांडात भाग घेतला. आयसिसच्या विषारी तत्त्वज्ञानानं तिला पछाडलं होतं. त्यांच्या अपार्टमेंटमध्ये केंद्रीय अन्वेषण विभागाला (FBI) अनेक रायफली (AK-47) व निरनिराळ्या बांधणी अवस्थेत असलेले पाईप बॉंब (Pipe Bombs) सापडले. तसंच तिथे एखाद्या तुकडीला युद्ध लढण्यास पुरतील एवढ्या गोळ्या व दारूगोळा होता. त्यांचं अपार्टमेंट म्हणजे एक शस्त्रागारच झालं होतं.

फरूकच्या वडिलांना त्याचा विवाह मान्य नसावा कारण त्यांनी सुनेला किंवा नातवंडाला कधीच भेट दिली नाही असं म्हणतात. तसंच त्यांनी घटस्फोट घेतल्यामुळे आई मुलाजवळ राहत असे. वडिलांवर विमानानं प्रवास करण्यास बंदी घालण्यात आली. आईही कायद्यात अडकली आहे. आपला पुत्र अशा वामकृत्यात गुंतलेला आहे हे तिला ठाऊक असणार. अशी माहिती FBI ला देणं बंधनकारक असतं. आता मौनव्रतामुळे कायद्याची तलवार तिच्या मानेवर टांगते आहे.

आता संसदेनं या प्रेम व्हिसावर नेम धरला असून त्यात बदल करण्याची बोलणी सुरू आहेत. पण हे स्थित्यंतर लवकर होणार नाही कारण त्याची चर्चाच अजून सुरू झालेली नाही. तोपर्यंत या व्हिसासाठी अर्ज करणाऱ्या इच्छुकांची कडक तपासणी व्हावी म्हणून वटहुकूम काढण्यात आला. त्यामुळे प्रेमिकांना अमेरिकेत येण्यास अडचणी येणार हे ओघानं आलंच. तसंच अमेरिकन मुस्लिमांवर येथील सुरक्षायंत्रणेनं लक्ष ठेवण्यास सुरुवात केली. सध्या FBI नं ९०० हून अधिक मुस्लिम व्यक्तींना लक्ष्य केलं. माथेफिरूकरणाचं मुख्य स्थान म्हणजे त्यांच्या मशिदी. तिथे इमाम विषारी भाषणं देऊन भक्तांवर संस्कार करतात असं आढळून आलं. पॅरिसमध्ये तर अनेक मशिदी बंद करण्यात आल्या. अमेरिकेनंही तसंच करावं म्हणून अध्यक्षीय निवडणुकीच्या प्रचारात अनेक दावेदार उपदेश करतात. पण तसं अजून तरी करण्यात आलेलं नाही.

अशा परिस्थितीत भारतीय मनुष्य संभ्रमात पडतो. त्याच्या मनात मुस्लिमांविषयी विष नसलं तरी फारसं प्रेम आहे असं म्हणता येणार नाही. परंतु ते भारतीयांशी वागताना वाजवीपेक्षा जास्त आस्था दाखवतात असा मला अनुभव आला. ५ डिसेंबर, २०१५ला म्हणजे कॅलिफोर्नियात हत्याकांड धगधगत असताना मला पूर्वनियोजित प्रवासाला निघणं भाग पडलं. एरवी मी ती वारी रद्द केली असती. परंतु तसं केलं असतं तर मला जबरदस्त भुर्दंड तर भरावा लागला असताच पण इतर अनेक गोष्टी विस्कळीत झाल्या असत्या. विमानतळावर जाण्यासाठी मी नेहमीप्रमाणे अुबर (Uber)वर टॅक्सी बोलावली. लगेच वाहनचालकाची छबी व नाव माझ्या आयफोनवर दिसलं. ते बघून मी कपाळाला हात मारला. ड्रायव्हरचं नाव लियाकत. ते धर्मसूचक नाव आहे हे अमेरिकन लोकांना ठाऊक नसलं तरी भारतीयांना जन्मतःच ठाऊक असतं. अमेरिकेतली प्रसारमाध्यमं मुस्लिमांविषयी उलटीसुलटी चर्चा करीत असताना आपण त्यात पडणं मला उचित वाटलं नाही. अशा संवेदनशील चर्चेत तो विषय निघाला तर आपण लियाकत (अली)शी काय व कसं बोलणार म्हणून मी पेचात पडलो.

लियाकतनं कमालीची आपुलकी दाखवली. तो गोऱ्या ग्राहकाशी मनमोकळेपणानं कधीच बोलत नसेल. तो मुस्लिम आहे हे त्यांना त्याच्या नावावरून किंवा रूपावरून ओळखताही येत नसेल म्हणा. त्यामुळे मी भारतीय म्हणजे एक नातेवाईक असं समजून त्यानं संभाषणास सुरुवात केली. आपण एकाच आईची दोन लेकरं असं मला भासवलं. म्हणाला, आपल्या दोन लोकांत काहीच वैर नाही. वैर आहे ते राजकारण्यांत. आपल्या अस्तित्वाचं समर्थन करण्यासाठी ते धार्मिक कलहाचं घोंगडं भिजत ठेवतात असं त्याचं ठाम मत होतं. तसं म्हटलं तर लियाकत काही माथेफिरू नव्हता. हसरा चेहरा. मध्यम वय उलटलेलं. पांढरी दाढी व केस आणि आवाजात कमालीची मार्दवता. तो सफाईदार इंग्रजी बोलत होता. अुबर आपल्या ड्रायव्हर्सला ग्राहकांचं पतमापन करण्यास सांगतात. म्हणजे मद्यधुंद किंवा हिंसक माणूस टाळता येतो. या परीक्षेत त्यानं मला अत्युच्च गुण दिले. 'मी भारतीयांना आपलेच लोक समजतो; म्हणून त्यांना आदर्श ग्राहक म्हणून शिफारस करणं कर्तव्य समजतो' असं बोलून त्यानं कलुषित मनावर फुंकर घातली.

हल्ली मुस्लिमांची प्रतिमा डागाळलेली आहे हे त्याला चांगलं ठाऊक होतं.

**– डॉ. अनंत पां. लाभसेटवार (Ph.D.)**
latalabh@aol.com
(लेखक फर्स्ट नॅशनल बँक आणि ट्रस्ट कंपनी, कॅन्सास अमेरिका या वित्तसंस्थेचे १४ वर्षं चेअरमन ऑफ दी बोर्ड होते.)

# 'ग्रंथाली' ठाणे केंद्र : 'वाचकदिन'

## नंदिनी अविनाश बर्वे

'ग्रंथाली'चा लेखक वाचक मेळावा स्थापनेपासून दरवर्षी दादर येथे २५ डिसेंबर या दिवशी होत असतो. रसिक वाचक या मेळाव्यास आवर्जून उपस्थित राहतात.

पण तरुण पिढीमध्ये वाचनाची आवड निर्माण करायची असेल तर त्याची सुरुवात शालेय वयापासूनच करायला पाहिजे. 'ग्रंथाली'च्या ठाणे केंद्रामध्ये हा प्रयत्न आवर्जून केला जातो. त्यासाठी दरवर्षी विद्यार्थ्यांसाठी 'वाचकदिन' घडवून आणला जातो. गेली १९ वर्षे श्रीधर गांगल व अविनाश बर्वे हा उपक्रम परिश्रमपूर्वक करत आहेत.

मोठमोठ्या वक्त्यांची, विचारवंतांची भाषणे ठेवण्यापेक्षा शालेय विद्यार्थ्यांना वाचायला काय आवडेल, जे वाचले-समजले-आवडले ते त्यांना स्वतःच्या पद्धतीने, कल्पकतेने आविष्कृत करता येईल का असा विचार करून या 'वाचकदिना'चे आयोजन केले जाते. ठाण्यातील २५-३० शाळा यामध्ये सहभागी होतात.

विद्यार्थ्यांना भाषिक उपक्रमासाठी एक विषय दिला जातो. त्यासाठी आवश्यक ती पुस्तकेही अगोदर उपलब्ध करून दिली जातात. पुस्तकांचे वाचन करून विद्यार्थ्यांनी त्यातील आवडलेला भाग आपल्या कल्पकतेप्रमाणे व्यासपीठावर सादर करावा. गरज वाटेल तिथे शिक्षकांची मदत घ्यावी. शिक्षकांनी देखील अगोदर विद्यार्थ्यांना वाचनास प्रवृत्त करावे आणि नंतर सादरीकरणाचा विचार करावा अशी अपेक्षा असते.

प्रत्येक वर्षी ठाण्यातील एक शाळा या कार्यक्रमासाठी यजमानपदाची जबाबदारी स्वीकारत असते. यावर्षी ठाण्यातील जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूटच्या मो. ह. विद्यालयात 'ग्रंथाली' 'वाचकदिन' संपन्न झाला. स्टेट बँक, ठाणे जनता सहकारी बँक, सारस्वत बँक यांनी यासाठी प्रायोजिकत्व दिले.

यावर्षी 'वाचकदिना'चे सूत्र होते 'गुलज़ार यांच्या बोस्कीच्या गोष्टी'. नऊ पुस्तकांचा हा संच आहे. अतिशय सुंदर चित्रे, मुलांना आवडतील अशा छोट्या-मोठ्या कथा यामध्ये आहेत. गुलज़ार यांच्या मूळ कथांचे मराठीतील सिद्धहस्त लेखकांनी मराठीत भाषांतर केले आहे. अतिशय देखणी आणि दर्जेदार अशी ही पुस्तके बालवाङ्मय विश्वात नक्कीच अव्वल ठरतील. या पुस्तकसंचाचे प्रकाशन ठाण्यामध्ये गडकरी रंगायतन









इथे झाले होते. स्वतः गुलज़ार त्यासाठी उपस्थित होते. त्याच दिवशी म्हणजे १५ सप्टेंबरला 'ग्रंथाली' ठाणे केंद्राने जाहीर केले की, या वर्षीच्या 'वाचकदिना'साठी 'बोस्कीच्या गोष्टी' वाचायच्या आहेत. सहभागी होणाऱ्या प्रत्येक शाळेस हा संच दिला गेला. सुमारे दोन महिने अगोदर पुस्तके दिली जेणेकरून सर्व विद्यार्थ्यांना सर्व पुस्तके वाचायला मिळतील. त्याशिवाय स्टेजवर येऊन सादरीकरण करणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यास पुस्तक भेट बक्षीस म्हणून दिले जाते.

१६ व १७ जानेवारी २०१६ असे दोन दिवस हा 'वाचकदिन' सोहळा होता.

कार्यक्रमाची सुरुवात कवी गुलज़ार यांच्या 'बरसो रे मेघा बरसो' या गीतावरील नृत्याने झाली. मो. ह. विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी हे नृत्य सुंदर रितीने सादर केले.

त्यानंतर सुरू झाल्या 'बोस्कीच्या गोष्टी!' या नऊ पुस्तकांत अगदी एक वर्षाच्या मुलापासून टीनएजपर्यंतच्या मुलांना आवडतील अशा कथा आहेत.

अनेक विद्यार्थ्यांना 'कॅप्टन काका' ही गोष्ट खूप आवडलेली दिसली. सात शाळांनी ही कथा सादरीकरणासाठी निवडली होती. अर्थात सादरीकरणात वेगळेपणा होताच. स्वातंत्र्याचे, प्रजासत्ताक दिनाचे व आपल्या तिरंग्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना चांगलेच कळले होते. राष्ट्रीय अस्मिता जागवण्याचा छान प्रयत्न यातून साध्य झाला. आपल्या राष्ट्रध्वजातील तीन रंग, अशोकचक्र याचे वर्णन, त्याचा अर्थ, सैनिकांविषयी अपार कृतज्ञता व आदर अशा अनेक गोष्टी यातून सांगितल्या गेल्या. 'तिरंग्याच्या कापडाचा वेगळा वापर करून त्याचा अपमान करू नका' असे या कथेतील मुलांनी, मोठ्या माणसांना शिकवले. त्यांचे मार्गदर्शक आणि आदर्श अर्थातच 'कॅप्टनकाका' होते.

'बोस्कीची त्सुनामी' ही कथा काही शाळांनी निवडली होती. कथेच्या सादरीकरणातून लहान मुलांशी कसे वागावे, कसे वागू नये हा संदेश दिला गेला. आईचे प्रेम, त्याला वंचित मुलगी, तिची स्वप्ने यांचे नाट्यातून अतिशय सुंदर, समजून घेऊन सादरीकरण विद्यार्थ्यांनी केले. काही ठिकाणी संगीताचा वापरही छान केला होता. यामध्ये श्रीरंग विद्यालयाचे सादरीकरण उल्लेखनीय होते.

केवळ पुस्तकातील मजकूर जसाच्या तसा सादर न करता 'शाहू विद्यालया'ने 'बोस्कीचे लहानपण' पद्यातील शाहिरी लोकगीतातून आणि नृत्यातून बहारदारपणे सादर केले. माजिवड्याच्या 'न्यू इंग्लिश शाळे'ने 'पंचतंत्र' साकारताना त्याची निर्मिती कशी झाली हे नाट्यातून सादर केले. कथेतील माकड, सिंह यांनी आपणास वाचविणाऱ्याबद्दल कृतज्ञता दाखविली पण माणसाने मात्र दगा दिला हे वास्तव दाखविते तर 'चांगल्या कामाचे फळ चांगलेच मिळेल' हा संदेशही दिला.

ठाणे महानगरपालिका शाळा क्र. ७ ने 'बोस्कीचा वाढदिवस' साजरा करताना छोट्या बोस्कीबद्दलच्या सर्वांच्या अपेक्षा व्यक्त केल्या.

'बोस्कीची गिनती' दोन-तीन शाळांनी सादर केली पण सर्वात बहार आणली ती ठाणे महानगरपालिका शाळा क्र. २ (दगडी चाळ)च्या विद्यार्थ्यांनी! १ ते १०० अंकांची उजळणी पद्यनाट्यातून तालासुरावर अतिशय सुंदर झाली.

पुस्तकातील कथांच्या आधारे काही शाळांनी स्वतःचे संहितालेखन केले होते. 'पहिला धनवान' या कथेवरून 'शक्तीपेक्षा युक्ती श्रेष्ठ' या शीर्षकाचे संहितालेखन इंदिरा गांधी आणि मो. ह. विद्यालयाने केले होते. मो. ह. विद्यालयाने कथेस नृत्याचीही जोड दिली होती.

'सावित्रीबाई थिराणी'ने 'बोस्कीच्या गप्पागोष्टी'चे संहितालेखन केले तर वर्तकनगर माध्यमिक विद्यालयाने बोस्कीच्या पंचतंत्रातील 'सत्यमेव जयते' कथेसाठी शीर्षकगीत आणि संहिता खूप सुंदर केली. खऱ्याखोट्याचा किस्सा सुरेख सादर केला.


ज्ञानप्रसारिणी कळवा हायस्कूलने 'अजब गजब धनवान' सादर करताना दोन डोकी व चार हात प्राप्त झालेल्या माणसाचा अभिनय फारच सुंदर केला. 'ऐकावे जनाचे करावे मनाचे' हा संदेश त्यातून दिला.

असे एकाहून एक सरस कार्यक्रम सादर झाले. विद्यार्थ्यांमध्ये विविधांगी कल्पकता, बुद्धिमत्ता, चातुर्य असते. त्याला संधी मिळाली की ते छान व्यक्त होते हा तर दरवर्षीचाच अनुभव आहे आणि विशेष म्हणजे ठाणे महानगरपालिका शाळांतील विद्यार्थी व शिक्षक विशेष मेहनत घेतात हेही जाणवते.

श्रीधर गांगल, अविनाश बर्वे यांचेबरोबर सुरेश भिडे हेही कार्यकर्ते आहेत. यावर्षी श्रीमती शिल्पा खेर या टीममध्ये नव्या उमेदीने सहभागी झाल्या आहेत. शैक्षणिक व सामाजिक कामाची त्यांना जाण व आवडही आहे. आणखी काही उत्साही तरुण कार्यकर्ते या उपक्रमासाठी तयार व्हावेत अशी अपेक्षा सुरेश भिडे यांनी आभार मानताना व्यक्त केली. प्रभाकर भिडे यांनी प्रास्ताविकात विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले.

मो. ह. विद्यालयाचे मुख्याध्यापक रजपूतसर, उपमुख्याध्यापिका व शिक्षक यांनी दोन दिवस कार्यक्रमासाठी आणि अगोदर पूर्वतयारीसाठी मोलाचे सहकार्य दिले. विशेषतः सुषमा शेडगे, श्रीमती बोर्डे, अहिरे यांनी विशेष मेहनत घेतली. सुषमा शेडगे यांनी दोन्ही दिवशी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अतिशय सुंदर केले. या सर्वांचे 'ग्रंथाली'तर्फे अभिनंदन! भविष्यातही सर्व शाळांचे असेच सहकार्य मिळत राहील हा विश्वास आहे.

**– नंदिनी अविनाश बर्वे**
भ्रमणध्वनी : ९८६९२२७२५०
avinash.d.barve@gmail.com





**मूल्य १६० रुपये**
**सवलतीत १०० रुपये**

ग्रंथाली

## फुलाला सुगंध मातीचा –

### डॉ. अनुराधा हरकरे / डॉ. अंजली कुलकर्णी

प्रत्येक सुजाण व्यक्ती व पालकांनी अवश्य अनुभवावा असा फुलाला सुगंध मातीचा...
ह्या पुस्तकात लेखिकांनी, समाजातील काही निवडक सुजाण, सुशिक्षित, सुसंस्कृत, सजग आणि सर्वार्थाने प्रज्ञावंत,यशवंत कीर्तिवंत व्यक्ती व त्यांच्या पालकांशी संवाद साधला आहे व त्यांची माहिती शब्दात गुंफून त्याचा भरजरी शेला विणला आहे. ह्या सर्व व्यक्तींच्या संगोपनात योगदान देणाऱ्या आप्तस्वकीयांशी प्रत्यक्ष चर्चा करून माहिती मिळवली असल्याने त्यात ओघवता सचेपणा जाणवतो. – डॉ. स्नेहलता देशमुख




**मूल्य २०० रुपये**
**सवलतीत १२० रुपये**

ग्रंथाली

## माझे स्वप्न – प्रभाकर जोशी

मी लोकांच्या बरोबर फ्रीडम मार्च, नागरिक हक्क बिल, बसवरील बहिष्कार, रेस्टॉरंट–मॉलमधील बैठा सत्याग्रह, सेलमातील मोर्चा या सर्व ठिकाणी मी तुमच्याबरोबरच होतो. मी तुमच्याबरोबर असणार आहे. हे माझे वचन आहे. सगळ्यांनाच दीर्घ आयुष्य जगण्याची इच्छा असते. मलाही आहे. मला तुम्हा लोकांना तुमचे हक्क मिळवून द्यायचे आहेत. हे कार्य करत असताना असेही घडू शकेल की तुम्हाला तुमचे हक्क मिळाले आहेत व त्यावेळी मी तुमच्यात नाही. मला तुमच्याकरता मरण आले तरी चालेल. मला माझी काळजी नाही. मला तुमची काळजी आहे. तुमच्या हक्कांची काळजी आहे. तुम्हा लोकांना, तुमच्या सर्व मागण्या मिळणारच आहेत. माझे काय? मी कदाचित...'

# सामान्य माणसाच्या लहान जगण्यातूनही इतिहास घडतो

## डॉ. अरुणा ढेरे यांचे मत

केवळ राजे-राजवाडे यांचा कालखंड, सन-सनावळ्या आणि युद्ध-लढाया म्हणजे इतिहास नव्हे. तर, सर्वसामान्य माणसाच्या लहान जगण्यातूनही इतिहास घडत असतो, असे मत प्रसिद्ध कवयित्री डॉ. अरुणा ढेरे यांनी मंगळवारी व्यक्त केले.

स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावरील स्त्रीमनाची स्पंदने असलेल्या इंदिराबाई वाडीकर लिखित 'इंदिरेची स्मृतिकथा' या पुस्तकाचे प्रकाशन ढेरे यांच्या हस्ते झाले. 'थिंक महाराष्ट्र डॉट कॉम'चे दिनकर गांगल कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. ज्येष्ठ समीक्षक डॉ. द.दि. पुंडे, डॉ. नीलिमा गुंडी, इंदिराबाई वाडीकर यांचे नातू डॉ. मधुकर बाडीकर आणि अॅड. नितीन बाडीकर, 'ग्रंथाली'चे सुदेश हिंगलासपूरकर यावेळी उपस्थित होते.

हे पुस्तक म्हणजे सजग गृहिणीचे सहज आत्मकथन असल्याचे सांगून अरुणा ढेरे म्हणाल्या, इंदिराबाईंचे रुढार्थाने शालेय शिक्षण झाले नाही. या अर्थाने त्या अशिक्षित होत्या. मात्र, शिक्षण आणि प्रतिभा किंवा समंजसपणा यांचा संबंध नसतो हे इंदिराबाईंच्या लेखनातून स्पष्टपणे जाणवते. मध्यमवर्गीयांनी मूल्यनिष्ठ जगण्याने सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाला आधार दिला होता. अशा कालखंडातील लेखन हे केवळ त्या व्यक्ती आणि कुटुंबापुरतेच मर्यादित न राहता ते समाजाचे दर्शन घडविणारे ठरले आहे. उत्तरार्धात ज्येष्ठ अभिनेत्री



ज्योती सुभाष आणि गौरी लागू यांनी या पुस्तकातील काही भागाचे अभिवाचन केले. वाडीकर बंधू यांनी आपल्या मनोगतातून इंदिराबाई वाडीकर यांच्या आठवणी जागविल्या. राजीव वाडीकर यांनी सूत्रसंचालन केले.

---

# कवी सुदेश लोटलीकर यांना 'वाङ्मय चर्चा मंडळाचा विशेष साहित्य पुरस्कार'

बेळगांव येथे १९२७ साली स्थापन झालेली ''वाङ्मय चर्चा मंडळ'' ही एकमेव अत्यंत (बेळगावची) प्रतिष्ठेची अशी साहित्य संस्था आहे. ह्या संस्थेतर्फे दरवर्षी उत्कृष्ट मराठी साहित्यकृतींना ''वाङ्मय चर्चा मंडळाचा विशेष साहित्य पुरस्कार'' देऊन सन्मानीत केले जाते. यंदाचा ''वाङ्मय चर्चा मंडळाचा विशेष साहित्य पुरस्कार'' नामवंत मराठी व कोकणी कवी सुदेश शरद लोटलीकर यांच्या 'अंतर्नेत्र' ह्या कवितासंग्रहाला जाहीर झालेला आहे. ह्या पुरस्काराचे स्वरूप रोख रक्कम व विशेष स्मृतिचिन्ह असे असून, हा पुरस्कार बेळगाव येथे वाङ्मय चर्चा मंडळाने आयोजित केलेल्या विशेष कार्यक्रमात कवी सुदेश लोटलीकर यांना प्रदान करण्यात येणार आहे. यापूर्वी हा पुरस्कार अनेक नामवंत लेखकांना प्राप्त झालेला आहे. त्यता विजयकुमार दळवी, चंद्रकांत पोतदार, आ.रा. किल्लेकर अशा नामवंत अनेक लेखकांचा समवोश आहे. कवी सुदेश लोटलीकर यांचा 'अंतर्नेत्र' हा सातवा कवितासंग्रह असून तो मुंबई येथील 'ग्रंथाली' ह्या नामवंत प्रकाशन संस्थेतर्फे प्रकाशित झाला आहे.

कवी सुदेश लोटलीकर यांना यापूर्वी महाराष्ट्राचे, गोव्याचे व राष्ट्रीय पातळीवरचे अत्यंत प्रतिष्ठेचे असे चोवीस पुरस्कार काव्यलेखनासाठी प्राप्त झालेले असून त्यात बा. भ. बोरकर पुरस्कार, भैरूरतन दमाणी पुरस्कार, कवी कालिदास पुरस्कार, अनंत काणेकर पुरस्कार, गोवा कला अकादमी पुरस्कार अशा अनेक पुरस्कारांचा समावेश आहे.

सुदेश लोटलीकर यांचा 'अंतर्नेत्र' हा आध्यात्मिक पिंडाचा कवितासंग्रह असून त्याला प्रसिद्ध समीक्षक डॉ. केशव सद्रे यांची प्रस्तावना लाभली आहे. यापूर्वी सुदेश लोटलीकर यांच्या काव्यावर डॉ. म.द. हातकणंगलेकर, डॉ. सदानंद मोरे, डॉ. श्रीधर शनवारे, अरुणा ढेरे, लक्ष्मीकांत तांबोळे अशा अनेक नामवंत समीक्षकांनी समीक्षा-लेखन केले आहे.


''आधुनिक मराठी कवितेला समृद्ध करणाऱ्या तरुण पिढीतील कवीमध्ये सुदेश लोटलीकरांचे नाव अग्रक्रमाने नोंदवावे लागेल'' हे विधान आधुनिक मराठी कवितेचे साक्षेपी समीक्षक डॉ. सदानंद मोरे यांनी आपल्या समीक्षालेखात नोंदवले आहे. कवी-लेखक याच बरोबर सुदेश लोटलीकर हे उत्तम दर्जाचे माहितीपट निर्माते आहेत.

रोहन प्रकाशन

# ग्रंथपान

**मनोगत**

गेल्या पन्नास–साठ वर्षांत आपल्या समाजात झालेल्या पडझडीचे चित्रण करण्याचा हा एक अल्पसा प्रयत्न. स्वातंत्र्याच्या कालखंडात महाराष्ट्राने काय गमावले, काय कमावले याचा आलेख काढणारा. त्यात कमावण्याच्या बाजूला थोडेच आणि गमावण्याच्या बाजूला भरपूर असल्याचेच आढळून आले. समाजबदल तर होत होता. तो केवळ बाह्यस्वरूपी होत आहे, का केवळ तंत्रज्ञानाने आपल्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणले आहेत, की समाजमन वैज्ञानिक विचारांची कास धरून विवेकवादी होत आहे, धर्माचे अवडंबर कमी होत आहे, की वाढत आहे, असे प्रश्नही मनात येऊ लागले. पन्नास–साठ वर्षांपूर्वी काय परिस्थिती होती? त्यात झालेला बदल हा जुनी पिढी –नवी पिढी यांतील अंतराचा आहे, की वेगाने पुढे चाललेला समाज गतिरोध दिसताच पुन्हा माघारी चालला आहे, आपल्याला अपेक्षित आहे त्या गतीने आणि दिशेने समाजबदल होत नाही, की बदलासाठी आवश्यक असणारी मानसिकता आपल्यात नाही, या आणि अशा प्रश्नांची उत्तरे शोधू गेल्यास ध्यानात येते की, ज्या प्रकारची पडझड झाली आहे ती स्वागतार्ह बदलापेक्षा किती तरी अधिक आहे. त्यामुळे काय झाले तर, झालेली समाजसुधारणा टिकाऊ ठरली नाही, उलट एकेक करून प्रत्येक महनीय समाजसुधारकाचा आपण पराभव केला. याला समाजजीवनाचे कोणतेही क्षेत्र अपवाद नाही. आता यावर उपाय काय, हा मोठा प्रश्न झाला. या कालखंडात आपण काय मिळवले आणि काय गमावले याची चर्चा तर सुरुवातीला केली पाहिजे. अशी चर्चा करणे हा या लेखसंग्रहाचा हेतू आहे...




...अर्थात भरपूर पडझड झाली म्हणून निराश होण्याचे कारण नाही, हे तर खरेच आहे. जगातील सर्व समाज अशा नाउमेद करणाऱ्या परिस्थितीतून गेले आहेत आणि सावरलेसुद्धा आहेत. मग आपणच अपवाद ठरण्याची भीती कशाला बाळगायची? चांगल्या बदलाची सुरुवात होण्यासाठी कोणाला काय करावे लागेल, याबद्दल अनेकजण अनेक उपाय सुचवतीलही. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांनी अशा हताश वाटायला लावणाऱ्या परिस्थितीचे समर्पक वर्णन केले होते. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला त्यांनी म्हटले होते : ''आपण विकृत झालो आहोत, हे आपण सर्वजण मान्य करत आहोत. आपली प्रतिष्ठा आपण गमावून बसलो आहोत. अनेक ठिकाणी वाकलो आहोत. आपली नजर नको त्या वस्तू न्याहाळण्यासाठी वखवखली आहे. आपले कान आपल्या शेजाऱ्या–पाजाऱ्यांबद्दल उठणाऱ्या कंड्या ऐकण्यासाठी आसुसले आहेत. आपल्या जिभा अभक्षणीय फळाची चव चाखण्यासाठी आतुर झाल्या आहेत. आपले हात परधन हडप करण्यासाठी वळवळत आहेत. आपली पचनेंद्रिये अतिभक्षणामुळे बिघडली आहेत. आपल्याला स्वत:च्या पायांच्या बळावर चालणे कठीण झाले आहे. काठीचा किंवा पांगुळगाड्याचा आधार घ्यावा लागत आहे. अशी ही आपली आजची सामाजिक परिस्थिती बनली आहे. आणि आता आपल्याला ही विकृती दूर करावयाची इच्छा आहे....''

...या कालखंडात प्रत्येक क्षेत्रात साधे–साधे वाटणारे बदल झाले. त्यांपैकी काही बदल केले गेले. ते का केले गेले याचाही पत्ता लागत नाही. शालेय जीवनात मराठीची आबाळ का झाली, इंग्लिश भाषेबद्दलच्या धोरणात धरसोड का होत गेली, पाठांतरासारख्या पद्धतींचा त्याग का झाला, अशा कितीतरी समस्या मनात डोकावू लागल्या. कालचे चित्र आणि आजची परिस्थिती यांतील फरक टिपण्याचा एकमेव हेतू मनात होता. शालेय, महाविद्यालयीन तसेच विद्यापीठीय शिक्षण यांच्या बदलांतून मला दिसला तो तसा दाखविला. सामाजिक तसेच व्यक्तिगत शिष्टाचाराच्या अभावातून, सार्वजनिक चारित्र्याच्या उणिवेतून झालेले गोंधळ दाखविले. धार्मिकता वाढल्याचे जे दिसत आहे, त्यात अवडंबर कसे वाढले आहे, प्रामाणिक श्रद्धेचा भाग कसा कमी झाला आहे आणि भविष्याबद्दल वाटणाऱ्या आर्थिक असुरक्षिततेचा भाग अधिक कसा आहे हे उकलण्याचा प्रयत्न केला...

...समाजात चांगली मंडळी उरलेलीच नाहीत का? तर तसेही नाही म्हणता येत. काल–परवाच्या तुलनेत संख्येने आज ती कमी असतील, पण प्रत्येक क्षेत्रात अजूनही विचारक्षम आणि विवेकी मंडळी आहेत. पण ती समाजाच्या मूळ प्रवाहापासून दूर फेकली गेली आहेत. पराभूतांचे जिणे जगत आहेत. नाउमेद होऊन हताशपणाचे बळी ठरत आहेत. त्यांचे कोणी ऐकत नाही. त्यांना कोणी जुमानत नाही. त्यांचा प्रभावच उरलेला नाही. त्यांच्यासमोर नतमस्तक होऊन त्यांचा सन्मान करत त्यांना अडगळीत बसवण्याचे तंत्र नव्या राज्यकर्त्यांनी चांगलेच अवगत केले आहे. प्रभावहीन सज्जन आणि स्वार्थी शक्तिमान असलेल्या परिस्थितीत समाज कोणत्या दिशेला झुकेल, हे वेगळे सांगावयाची आवश्यकता नाही...

...आणखी एक मुद्दा स्पष्ट करावासा वाटतो. सार्वजनिक जीवनातील बदलाची चर्चा करणे एवढाच हेतू मनात ठेवून हे लेखन केले आहे. व्यक्तिगत जीवनात भरपूरच बदल झाले आहेत. तंत्रज्ञानाने आपले जीवन आमूलाग्र बदलून टाकले आहे. एवढेच नव्हे, निरनिराळ्या समाजसंस्थांच्या बंधनात शिथिलता आली आहे. वैयक्तिक स्वातंत्र्याच्या निमित्ताने स्त्री–पुरुष संबंधात मुक्तपणा आला आहे. एवढेच नव्हे, तर, विवाहबंधनात न अडकणे, विवाह न करता 'लिव्ह इन' रिलेशनशिप राखणे, विवाहच न करणे यांसारखे बदल पुढच्या किंवा मागच्या दरवाज्याने घरात शिरत आहेत. पण त्यांच्यावर भाष्य करण्यासाठी वेगळी मालिका लिहावी लागेल...

– अरुण टिकेकर

**पृष्ठ १५६, मूल्य १८० रु. । 'ग्रंथाली' येथे सवलतीत १४५ रु.**

## लोकवाङ्मय प्रकाशन
# ग्रंथपान

**व्यवस्थेविरुद्धचा एल्गार**

'मम म्हणा फक्त' हा वीरधवल परब यांचा कवितासंग्रह लोकवाङ्मय गृह प्रकाशनाने प्रकाशित केला आहे. परिवर्तनशील, पुरोगामी विचारांची पाठराखण करण्याचे ह्या प्रकाशन संस्थेचे धोरण आहे. ह्या संग्रहाच्या निमित्ताने 'मम' म्हणायला भाग पाडणाऱ्या बिनचेहऱ्याच्या सुस्त चिवट व्यवस्थेविरुद्ध उपहासात्मक रीतीने एल्गार करण्याचा रोकडा प्रयत्न शिक्षक असलेल्या ह्या कवीने केला आहे. आसपास दिसणाऱ्या भयाण विसंगतीवर, कुरुप विस्कटलेपणावर, निखालस दांभिकतेवर, पोसलेल्या भ्रष्टाचारावर, अघोरी अंधश्रद्धांवर आणि वर्ग–वर्णव्यवस्थेतून येणाऱ्या अन्यायावर कवीने त्याच्या रोखठोक भाषेत कोरडे ओढले आहे. कधी उपहास, उपरोध, प्रहार, पर्दाफाश तर कधी श्लेष, कानपिचक्या, मर्मावर बोट ठेवत परब यांनी आपल्या आतली घनघोर तगमग व्यक्त केली आहे. त्यात व्यवस्थेतील विरूपता जावी, ही तळमळ आहे. कधी प्रमाणित मराठी, कधी ग्रामीण बोली तर कधी कोंकणी बोलीतील ही कविता आहे. कवीच्याच शब्दांत – चांगल्या कवितेच्या शक्यतेसाठी अनुभूतीच्या तळापर्यंत स्वत:ला खोलवर खणत जावं लागतं, ह्याची प्रचीती देणारी...




गाववस्तीवरच्या अंधश्रद्धा, भाबड्या वातावरणात वारूळ बनून बसलेल्या आदिमाया मूळ भूमिकेविषयीची पहिलीच कविता श्रद्धांच्या सांकेतिक धूसरतेत हळूहळू पराकोटीचा बकालपणा कसा येतो, हे अधोरेखित करते. आदिमाया मूळ भूमिका म्हणजे जणू माती आहे, जणू स्त्री आहे, जणू ती अफूच्या गोळीसारखी अंधश्रद्धा आहे, जणू माणसाच्या नाड्या आवळणारी व्यवस्था आहे! ह्या साऱ्या अस्वस्थतेत तत्त्वांचा एक पोलादी कण होऊन सारखा ठिसूळपणा रोखण्याची पराकाष्ठा करत एकमेव निर्णायक असते ती – कविताच असते एकमेव विश्वासार्ह. पण दुसऱ्या क्षणी कवितेतून व्यक्त होण्यातले फोलपणही तो नजरेआड करत नाही–

''कविता काही कामाची नसते
किंवा चार शहरी लोकांची असते कविता
मंडपाबाहेरचे हजार लोक
बाहेरूनच वाजवत असतात
कवितेसाठी टाळ्या
त्यांना फारसं काही ऐकू गेलेलं नसतंच!''

आजकाल अभिव्यक्तिस्वातंत्र्यावर गदा आणणारे प्रसंग घडत असल्याने कधी कधी डझनच्या डझन कागद असूनही कवीची एकही कविता लिहून होत नाही. कागदी घोड्यांना नाचवत तयार केलेले अहवाल नि श्वेतपत्रिकांच्या गदारोळात जगण्यातली अटळ–तात्कालिक निरर्थकताच उतरून येते! माणसाच्या आशा–आकांक्षा, सुख–दु:ख यांबद्दल निर्जीव कागद अनभिज्ञ असतात. सवंग असूनही टाळ्या घेत मिरवणाऱ्या बकवास कवितेची तो यथेच्छ टर उडवतो.

कवी समाजवादी चळवळीला जोडलेला आहे. वर्ण–वर्गाच्या उतरंडीतून निर्माण झालेल्या व्यवस्थेला तो थेट प्रश्न विचारतो. विचारांचे कंगोरे, पापुद्रे, टोकं घासून गुळगुळीत मऊ–सुरळीत केल्या गेलेल्या स्थिर, पण मिळमिळीत आयुष्याला तो बोल लावतो.

'ताजे वाटत नाही हल्ली' ह्या कवितेतून आधुनिक, कृत्रिम, प्रदूषित यंत्रयुगातील मरगळ नि बथ्थडपणा कवी दाखवतो. असे नि तसे कसेही जगू न देणाऱ्या सामाजिक दबावामुळे रोगट झालेल्या हवेतील घुसमट हाही कवितेचा विषय होतो. ध्यान, समाधी तसेच विशिष्ट परंपरा यांच्या भ्रामक नि दांभिक मायाजालात न फसता कठोर नि विवेकी वास्तवाचे बोट धरण्याचे धारिष्ट्य 'सुसुत्ती' व 'निराकाराच्या दिशेनं तसूभर तरी' ह्या कविता देतात.

महात्मा गांधीजींच्या विचारातील मूळ गाभा गमावलेले सांगाडे, त्यांच्या वस्तू सांभाळण्यासाठी प्रचंड खर्च करणारे अनुयायी, गांधी जयंतीचे कृतक औचित्य, त्यातील कालबाह्यता, त्याचा 'इव्हेन्ट' करणारे संधीसाधू यांविषयीच्या उपहासात्मक कविता विषण्ण करणाऱ्या आहेत. कवी शिक्षक आहे. शिक्षकी पेशातील परिस्थितीशरण असहायता आणि चांगला माणूस घडवण्यात 'नापास' होण्यातले भकासपण कवी काही कवितांतून मांडतो. आपण कामचलाऊ, लेचापेचा, गयावया टाइपचा, 'जी हाँ जी हाँ' करणारा, भूमिकाहीन सामान्य माणूस असल्याचे कवी घोषित करतो. निगरगट्ट सरकारच्या अनागोंदी कारभारावर, निवडणुकीतील लॉटरीवर, गेंड्याची कातडी पांघरणाऱ्या मंत्र्यांवर उपहासाचे शिंतोडे उडवतो. यंत्रयुगातील तथाकथित प्रगतीमुळे विस्थापित होणारी गावं, माणसं नि त्यांचा क्षीण विरोध हाही कवितेचा विषय आहे. 'तुम्ही मम म्हणा फक्त' ही कविता निरुपाय माणसाचं बधिरपण वर्णन करते. श्रद्धा–अंधश्रद्धांचा बागुलबुवा करून भोळ्याभाबड्यांना त्याचं भय दाखवणाऱ्या मतलबी व्यवस्थेचे यथासांग उपरोधी वर्णन त्यात आहे.

वीरधवल परब यांच्या सगळ्या कविता मुक्तछंदातील असून त्या विमुक्तपणे व्यक्त होतात. त्यात उपहास नि सूचकता भरपूर आहे, पण सांकेतिकता नाही. परंपरा आणि आधुनिकता यात भरडणाऱ्या काळाचं विस्कटलेपण त्यात आहे. विसंगती आणि विषमता यांतून फोफावलेल्या अन्यायकारक गोष्टींचा उघडपणे तीव्र निषेध करणारी आहे. पुस्तकाच्या ब्लर्बवर कवी सतीश काळसेकर यांनी म्हटल्याप्रमाणे – 'खासगी आणि सार्वजनिक आयुष्य यांतील भेदरेषा पूर्णत: मिटवून त्यातून एकरस वर्तमान निर्माण होण्याची अद्भुत किमया या कवितेत घडली आहे.'

**– आश्लेषा महाजन**

**पृष्ठ ११२, मूल्य १५० रु. । 'ग्रंथाली' येथे सवलतीत १२० रु.**

## ग्रंथपान

**साक्षी पवार**

# व्यासांच्या लेकी
## एक संग्राह्य वेध!

**महाभारत** हा संघर्षाचा इतिहास आहे . कोणत्याही संघर्षात बहुतेकदा केंद्र स्थानी असतात त्या स्त्रियाच. आणि सर्वात जास्त होरपळतात त्याही स्त्रियाच; भारतातील दोन अजरामर महाकाव्ये म्हणून ज्यांचा उल्लेख केला जातो, जी महाकाव्ये भारतीय संस्कृतीचा आधार आहेत, ज्यांच्यावर इथली संस्कृती पोसली त्यातले एक असलेल्या महाभारततही असंख्य स्त्रियाच केंद्रस्थानी आहेत..त्या भलेही कुरुक्षेत्रावर लढायला गेल्या नसतील. पण त्यांच्या जीवनातला प्रत्येक क्षण हा संघर्षाने भरलेला होता .

पण महर्षी व्यासांचे कौतुक या साठी करावेसे वाटते की त्यांनी कुठेही या स्त्रिया संघर्षामुळे हताश झालेल्या, पिचलेल्या अशा दाखवलेल्या नाहीत . त्या तेजस्विनी आहेत . या संघर्षात त्यांचे तेज अधिकच झळाळून उठल्याचे महर्षी व्यासांनी दाखविले आहे .




हे सगळे पुन्हा मनात येण्याचे कारण म्हणजे मैत्रेय प्रकाशनाने प्रकाशित केलेले, मधुवंती सप्रे यांचे 'व्यासांच्या लेकी' हे पुस्तक. या आटोपशीर पुस्तकात त्यांनी महाभारतातील केवळ कुंती, गांधारी आणि द्रौपदी या तीन महत्वाच्या स्त्री व्यक्तिरेखांचाच आढावा न घेता देवयानी, शर्मिष्ठा ,माधवी, दमयंती, अंबा, शिखंडीनी, सावित्री, द्रौपदी, गांधारी, कुंती व अभिमन्यूची पत्नी उत्तरा या सर्वच म्हणजे एकूण १० तेजस्विनींचा साकल्याने, परिपूर्ण वेध घेतला आहे . यातल्या काही जणी या तशा दुर्लक्षितच राहिल्या. समाजातही... आणि त्यांचा जन्म ज्या महाभारतात झाला त्या महाभारततही ! द्रौपदी वगळता त्यातल्या बहुतेक सर्वांचाच उल्लेख अगदी महाभारततही , केवळ त्यांच्यावर जेव्हा संकट येते त्याच वेळी येतो. बाकी मग ती कथा फिरत राहते ती त्या स्त्रियांच्या आयुष्यात आलेल्या पुरुषांच्या अंगाने. असे का? -या प्रश्नाने लेखिकेला अस्वस्थ केले; आणि तिने या प्रश्नाचा तसेच या स्त्रियांच्या आयुष्याचा वेध घ्यायचा प्रयत्न सुरु केला. अगदी त्यांची भाषा, केश-वेशभूषा काय असेल इथपासून ते त्यांचे पार्थिव शरीर नष्ट होईपर्यंत त्यांच्या आयुष्यात काय-काय घडले असेल याचा अभ्यासपूर्ण वेध लेखिकेने घेतला; आणि त्या जसा जसा हा अभ्यास करत गेल्या तसे तसे त्यांना त्या स्त्रियांचा संघर्ष हा आपल्या, आपल्या आजुबाजूच्या स्त्रियांच्या संघर्षात प्रतिबिंबित झालेला असल्याचे जाणवू लागले. हे पुस्तक केवळ त्या महाभारत कालीन स्त्रियांचे राहत नाही..त्याची नाळ आपल्याशीही जोडली गेल्यासारखे वाटते याचे कारण हे आहे .

प्रा. डॉक्टर यशवंत पाठक यांची विलक्षण अभ्यासू प्रस्तावना या पुस्तकाला लाभली आहे . त्यात ते म्हणतात, 'मधुवंती सप्रे यांनी या स्त्रियांकडे बघण्याची वेगळी दृष्टी दिली आहे . अगदी पुस्तकाचे 'व्यासांच्या लेकी' हे शीर्षकही त्याचे वेगळेपण दाखवते . यातून लेखिका हे सूचित करते की वात्सल्य आणि सहनशीलता यांच्या द्वंद्वातून या स्त्रियांचा हा विलक्षण जीवन प्रवास झाला आहे.' डॉ पाठक यांनी केलेली या लेकींच्या आयुष्याची मीमांसा मुळातच वाचण्यासारखी आहे .'व्यासांच्या लेकी' जगण्याच्या पारंपारिक चौकटी मोडतात . नव्या चौकटी प्रस्थापित करतात . वर्तमानातील संघर्षांनी हताश झालेल्या आपल्या मनांना वर्तमानात जगण्याचे भान देतात. 'टू बी ऑर नॉट टू बी' च्या काळात त्याला योग्य निर्णयाच्या आधाराची काठी देतात असे त्यांनी म्हटले आहे . पुस्तक वाचताना ते पुन्हा पुन्हा प्रत्ययाला येत राहते .

थोडक्यात सांगायचे तर लेखिकेने म्हटल्या प्रमाणे हा व्यासांच्या लोकविलक्षण प्रतिभेतून साकारलेल्या महाभारतातील स्त्री व्यक्तिरेखांच्या जीवन संघर्षाचा, त्यांच्या मूल्यांचा, अस्मितेचा, त्यागाचा आणि कर्तृत्वाचा समग्र वेध आहे. केवळ वाचावा असाच नव्हे तर संग्रही बाळगावा असा!

**व्यासांच्या लेकी**
**लेखिका : मधुवंती सप्रे**
**प्रकाशक : मैत्रेय प्रकाशन**
**पृष्ठे -१२८, मूल्य-१४०/-**
'ग्रंथाली' येथे सवलतीत ११५ रु.

# ग्रंथपान

## मोनिका गजेंद्रगडकर यांची नवीन कादंबरी




मूल्य २५० रु.
ग्रंथाली येथे सवलतीत २०० रु.

नारवक्कम हे दक्षिणेतलं,
समुद्रकिनाऱ्यावरचं चर्चेस,
मंदिर-गोपुरांचं वाऱ्यावर
झुलणारं, हिरवंशार छोटंसं गाव.
ते नुसतं गावच नाही तर
सरवणा आणि व्हिक्टर
या बालमित्रांच्या अबोध मैत्रीचा
हा आरंभ–रुजवात आहे.

चर्चचे ग्रेव्हयार्ड, त्याच्या बाजूच्या
उपसागरावरच्या रेल्वे-ब्रिजवरून
दूरवर जाताना दिसणारी गाडी,
हा या कथेचा मर्माचा संकेत.

व्हिक्टरच्या मृत्यूने ही कथा
अधिकच गहिरी होते आणि
पाण्याला स्वत:चा ओघ
मिळावा, तशी मुंबईसारख्या
अजस्र महानगरात, मदर
सिव्हियांमधल्या आईपणाच्या
उद्‌भवात जाणतेपणाने मिसळून
अथांग होत जाते.

कादंबरीचे हे दोन आरंभबिंदू
असे जोडले जातात.

स्त्रीच्या सृजनाच्या अद्‌भुत
ताकदीचा नि दुसरीकडे
माणसाच्या मुळांचा ठाव घेत,
अपार करुणेने त्याच्या मनाचाही
तळ शोधणारी ही कादंबरी.

ही कादंबरी माणूसपणाची बीजं
पेरणारा म्हणून धर्म या
संकल्पनेचा एक वेगळा अर्थही
लावू पाहते.

स्वत:ला कथाकार म्हणून
सिद्ध केल्यावर आलेली
मोनिका गजेंद्रगडकर यांची
ही वेगळ्या वाटेनं जाणारी
कादंबरी, त्यांची कादंबरीकार
म्हणूनही ओळख दृढ करेल,
असा विश्वास व्यक्त करणारी...

–आशा बगे

पद्मगंधा प्रकाशन

# ग्रंथपान

## कवितेचा मराठी विश्वकोश

डॉ. अक्षयकुमार काळे मराठीचे ज्येष्ठ-श्रेष्ठ काव्यमीमांसक आहेत. त्यामुळे त्यांचा गौरवग्रंथ कवितेविषयी असावा हे स्वाभाविकच झाले. संपादकांनी अर्वाचीन मराठी कवितेशी संबंधित जे जे दर्जेदार, गुणवान आणि मौलिक असे विचारधन आहे, त्या सगळ्यांचे एकत्रीकरण यानिमित्ताने केले आहे.

'काव्यमीमांसे'चा पहिला विभाग 'काव्यरूपमीमांसा' हा आहे. त्यात कवितेचे कवितापण कशात असते हे सांगणारे निशिकांत ठकार, रमेश तेंडुलकर आणि शिरीष गोपाळ देशपांडे यांचे लेख आहेत.




कै. रमेश तेंडुलकर यांचा लेख या ग्रंथाचे भूषण आहे. एक वाङ्मयप्रकार म्हणून कविता वाङ्मयप्रकारापेक्षा कसा आणि कोणत्या बाबतीत भिन्न आहे हे तर उत्तमरीतीने या लेखात आले आहेच, पण कवितेची स्वरूपमीमांसा म्हणूनही हा लेख उत्कृष्ट आहे.

विभाग दोनमध्ये महाकाव्य, खंडकाव्ये, गीत, गझल, सुनीत आणि दशपदी अशा सहा काव्यप्रकारांवर सहा लेख आहेत. पैकी महाकाव्य हा डॉ. द. भि. कुलकर्णी यांच्या प्रबंधाचा विषय होता, तो त्यांनी मांडला आहे. गीत हा 'कविता आणि प्रतिमा' या डॉ. सुधीर रसाळांच्या 'मौज' प्रकाशनाने काढलेल्या ग्रंथातला उत्कृष्ट लेख आहे. डॉ. अविनाश सांगोलेकरांचा गझलवरील लेख आवडावा असाच आहे. कविवर्य अनिलांचा त्यांच्याच दशपदीवरील त्यांचा लेख या विभागात घेण्याचे प्रयोजन मात्र समजू शकले नाही. 'दशपदी' १९७६ साली प्रसिद्ध झाला. सुनीत, गझल, हायकूसारखा दशपदी हा प्रयोग मराठीत रुजू शकला नाही. हा प्रकार इतिहासजमा झाला आहे.

तिसऱ्या विभागात निरनिराळे 'इझम' आणि मराठी कविता असा अभ्यास आलेला आहे. मराठी कवितेला प्रभावित करणाऱ्या या विचारसरणी दोन प्रकारच्या आहेत. पैकी पहिला प्रकार वाङ्मयेतर विचारप्रणालीनिष्ठ प्रवृत्ती, ज्यात मार्क्सवाद, राष्ट्रवाद, गांधीवाद, आंबेडकरवाद, देशीवाद, इ. येतात. यांतल्या एकेक विचारप्रणालीला घेऊन मराठी कवितेचे त्या त्या परिप्रेक्ष्यातून विवेचन करणारे लेख वसंत आबाजी डहाके, भ. श्री. पंडित, म. शं. वाबगावकर, अरुणा देशमुख इ. नी लिहिले आहेत. विचारसरणीचा दुसरा प्रकार साहित्यातील निरनिराळ्या संप्रदायांचा जसे स्वच्छंदतावाद, वास्तववाद, अतिवास्तववाद, अस्तित्ववाद आहे, या भूमिकेतून मराठी कवितेचा अन्वयार्थ लावणारे लेख निशिकांत मिरजकर, प्रज्ञा आपटे, मदन कुलकर्णी, प्रणव कोलते आदी विद्वानांनी लिहिले आहेत.

प्रस्तुत ग्रंथाचा चौथा विभाग 'नवे काव्यप्रवाह' असा आहे. आपल्याकडे केशवसुतांपासून आधुनिक किंवा अर्वाचीन मराठी कविता सुरू होते असे मानले जाते, तसे नवकाव्य, नवकथा इ. ची सुरुवात बा. सी. मर्ढेकर, गंगाधर गाडगीळांपासून मानली जाते. नवे काव्यप्रवाह म्हणजे स्थूल मानाने स्वातंत्र्योत्तर काव्यप्रवाह, त्यामध्ये वसंत पाटणकरांनी नवकाव्य, म. सु. पाटलांनी दलित कविता, रवींद्र ठाकूरांनी ग्रामीण कविता, नीरजा यांनी स्त्रीवादी कविता, डॉ. मधुकर वाकोडे यांनी आदिवासी कविता तर फकरुद्दीन बेन्नूर यांनी मुस्लीम कवितेचा आढावा घेतला आहे.

प्रस्तुत ग्रंथाच्या विभाग पाचला संपादकांनी 'काव्यसमीक्षा पद्धती' असे नाव दिले आहे. या विभागात सुरेश भृगुवार यांनी शैलीशास्त्रीय समीक्षेची संकल्पना स्पष्ट केली आहे. नुसतं व्याकरण न सांगता तीन महत्त्वाच्या कवितांचे शैलीशास्त्रीय दृष्टिकोनातून आकलन आणि विश्लेषण मांडून दाखवले आहे.

शुभांगी पातुरकरांचा छंदशास्त्रीय समीक्षा, म. सु. पाटलांनी मराठीतल्या नवकाव्याच्या संदर्भात केलेली आदिबंधात्मक समीक्षा आणि डॉ. रमेश वरखेडे यांनी बालकवींच्या कवितेच्या संदर्भात केलेली मानसशास्त्रीय समीक्षा यांनी हा विभाग समृद्ध केला आहे.

प्रस्तुत काव्यमीमांसेतला सहावा आणि अंतिम विभाग 'साहित्य सिद्धान्तसापेक्ष काव्यमीमांसा' हा आहे. या विभागाची मलावण करताना संपादकांनी भालचंद्र नेमाडे यांचं एक फारच सुंदर अवतरण दिलं आहे. 'समीक्षा... जी केवळ एका पायावर उभी नसते तर तिला गोमेसारखे अनेक पाय असतात. ...तिला मानसशास्त्र लागतं, मानववंशशास्त्र लागतं, समाजशास्त्र लागतं, इतिहास लागतो, भूगोल लागतो, अशा पद्धतीनं समीक्षा चालते. एका समीक्षकाला हे एवढं सगळं येण्याची गरज नाही. पण एकूण मराठी समीक्षा म्हटली तर ती अशी सर्व पायांनी चालली पाहिजे.' नेमाडे हा ग्रंथ जर वाचतील तर सर्व पायांनी चालणारी कवितेची डौलदार समीक्षा त्यांना या ग्रंथात भेटेल, हा ग्रंथ वाचणाऱ्या सर्वांना भेटेल.

हा ग्रंथ अक्षयकुमार काळे यांचा गौरवग्रंथ असल्यामुळे स्वाभाविकच सातवा विभाग 'अक्षयकुमार काळे : जीवन व समीक्षा' असा आहे आणि ते योग्यच आहे. त्याहीपेक्षा लक्ष वेधावे, ते परिशिष्टातल्या 'काव्यविषयक संदर्भ ग्रंथसूची'कडे. अर्वाचीन मराठी कवितेला कवेत घेणारे, सर्वोत्कृष्ट काव्यसमीक्षा असणारे दोनशे एकाहत्तर लेख तिच्यात नोंदवले आहे. चकित करणारे, परिपूर्ण आणि समृद्ध संशोधन कसे असते, याचा ही सूची आणि हा दिमाखदार ग्रंथराज एक वस्तुपाठच आहे.

**अर्वाचीन मराठी काव्यमीमांसा**

संपादक : डॉ. राजेंद्र नाईकवाडे, डॉ. कृष्णा साकुळकर, डॉ. कोमल ठाकरे, डॉ. सुनील रामटेके, डॉ. अमृता इंदूरकर

पृष्ठ : ८५६ । मूल्य : ९०० । **'ग्रंथाली' येथे सवलतीत ७२० रु.**

भारद्वाज प्रकाशन

# ग्रंथपान

**शेक्सपिअरच्या नाट्यकथा**

अनेक वर्षे बासनात पडून राहिलेलं हस्तलिखित पुस्तकाच्या रूपात अनपेक्षितपणे समोर यावं आणि ते वाचायला घेताच त्यात गुंतून जावं असं एक पुस्तक नुकतंच वाचनात आलं. त्याचं नाव आहे 'शेक्सपिअरच्या नाट्यकथा'. वाई येथील हायस्कूलमध्ये नामवंत शिक्षक असलेल्या जुन्या पिढीतील गणेश व्यंकटेश ढवळीकर ह्यांनी ते लिहिलेलं आहे. ढवळीकर परिवारातील पुढच्या पिढीतील नातवंडांनी ते आकर्षक रूपात प्रसिद्ध केलेलं आहे. सर्वसाधारणपणे कुटुंबीयांनी प्रकाशित केलेल्या पुस्तकांना कृतज्ञता आणि हौस एवढंच एक मूल्य असतं. मात्र हे पुस्तक त्यापलीकडे जाणारं आहे. शेक्सपिअरच्या गाजलेल्या नाटकांची कथेच्या माध्यमातून करून दिलेली ही ओळख नव्या वाचकांना शेक्सपिअर अधिक जाणून घेण्यास नक्कीच उद्युक्त करेल.




गणेश ढवळीकर १९१९ ते १९४१ या काळात वाईच्या द्रविड हायस्कूलमध्ये शाळेचे मुख्याध्यापक होते. वाई अर्बन बँकेचे चेअरमन आणि वाईचे नगराध्यक्ष म्हणूनही त्यांची वेगळी ओळख होती. हाडाचे शिक्षक असलेल्या शिस्तप्रिय ढवळीकरांचा इंग्रजी हा शिकवण्याचा आवडता विषय होता. त्यातूनच या नाट्यकथा लिहिण्याची निकड त्यांना वाटली असावी. त्यांनी अन्य स्फुट लेखनही केलं होतं. त्यातला 'स्वप्नातली जग' हा लेख वानगीदाखल परिशिष्टात छापलेला आहे. भविष्यकालीन घटनांची सूचना काही व्यक्तींना स्वप्नांद्वारे मिळते त्याची काही उदाहरणं या लेखात दिलेली आहेत आणि ऱ्हाइन दांपत्य करीत असलेल्या अतिंद्रिय चमत्कारिक अनुभवांबद्दलच्या संशोधनाची माहितीही यात आहे. 'मनाला जसा अंतराचा अडथळा होत नाही तसा काळाचाही प्रतिबंध होत नाही... अंतर व काळ मिळून दोन्ही जगाचीच रूपे आहेत. ती एकमेकांना पूरक आहे' असा निष्कर्ष ढवळीकरांनी काढला आहे आणि अमेरिकेतील तज्ज्ञांचा निष्कर्ष भारतीय अध्यात्माच्या परिभाषेत मांडला आहे. ते म्हणतात, 'मनुष्यामध्ये असे काहीतरी 'एक' आहे की ते आकाश (स्पेस) व काल (टाइम) यांच्या बंधनापलीकडे आहे – म्हणजे ते 'प्रकृती' स्वरूपाचे नाही ते 'पुरुष' स्वरूपाचे आहे. हा जो ईश्वरी अंश मनुष्यामध्ये आहे त्याची मर्यादा काय, त्याचे वाढण्याचे स्वरूप काय आहे, हे आपल्या मानवी शक्तीच्या बाहेर आहे.' परिशिष्टातला हा लेख शेक्सपिअरच्या नाट्यकथांना पूरक असल्यामुळे तो समयोचित आहे. शेक्सपिअरच्या नाटकांमध्येही मानवी स्वभाव आणि नियती, व्यवहारी जग आणि अद्भूत सृष्टी, तर्कसंगत आणि तर्कातीत अशा प्रकृती–पुरुष तत्त्वांचा संघर्ष पहायला मिळतो.

तर आता पुस्तकाचा गाभा असलेल्या शेक्सपिअरच्या नाट्यकथांविषयी. शेक्सपिअरने एकूण छत्तीस नाटकं लिहिली त्यापैकी सात नाटकांच्या नाट्यकथा या पुस्तकात आहेत. 'हॅम्लेट', 'किंग लिअर' यासारख्या शोकांतिका, 'मर्चंट ऑफ व्हेनिस', 'रोमिओ अँड ज्युलिएट', 'मॅकबेथ' ही लोकप्रिय नाटकं आणि तुलनेने मराठी वाचकांना अपरिचित अशी 'सिंबेलाइन ऑगस्टस सीझर' आणि 'टेम्पेस्ट' ही नाटकं यात आहेत. 'सिंबेलाइन' आणि 'टेम्पेस्ट' ही शेक्सपिअरने अखेरच्या काळात लिहिलेली नाटकं. रोमासेन्स म्हणून ती ओळखली जातात. अनुक्रमे इमोजिन आणि मिरांडा या नाटकांच्या दोन नायिका आकर्षक आणि निष्पाप आहेत. या नाटकांची कथानकंही गुंतागुंतीची पण गोड शेवट असलेली आहेत.

ढवळीकर ह्यांनी कथारूप देताना मूळ नाटकांमधली नाट्यात्मता कायम ठेवली आहे. शेक्सपिअर कालानुरूप आणि प्रदेशानुरूप वेगवेगळ्या रूपात अवतरतो त्याप्रमाणे हे कथालेखन करताना वापरलेली सत्तर–पंचाहत्तर वर्षांपूर्वीची मराठी भाषा, मूळ पाश्चात्य संदर्भांना दिलेलं मराठमोळं रूप यामुळे या नाट्यकथांना एक वेगळी रंजकता आलेली आहे. उदाहरणार्थ निसर्गकन्या मिरांडाची शकुंतलेशी केलेली तुलना, फायरप्लेसला योजलेला शेकोटीगृह हा प्रतिशब्द. 'रोमिओ अँड ज्युलिएट'मधील पुढील वाक्य पहा, 'लग्नाचे वेळी मंत्र म्हणणाऱ्या भटजीऐवजी उत्तरक्रियेचे मंत्र म्हणणाऱ्या भटजीची जरुरी आली. लग्नाकरिता प्रार्थना मंदिराकडे नटूनथटून, वाजतगाजत जाणारी ज्युलिएट आता स्मशानातील शवगृहाकडे गेली.'

सर्वात महत्त्वाचं म्हणजे गणेश ढवळीकरांच्या या मूळ लेखांचं महत्त्व वाढवणारा पूरक मजकूर यात समाविष्ट केल्यामुळे आणि शेक्सपिअरची नाटकं, त्यात भूमिका करणारे आणि ही नाटकं मराठीत आणणारे नाटककार यांची छायाचित्रं, शेक्सपिअरची प्रसिद्ध वचनं त्यात असल्यामुळे हे पुस्तक परिपूर्ण झालेलं आहे. सौ. मीरा आपटे–ढवळीकर आणि ढवळीकरांच्या नातवंडांनी ज्या गांभीर्याने हा उपक्रम केला त्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

**– दीपक घारे**

**शेक्सपिअरच्या नाट्यकथा**
गणेश व्यंकटेश ढवळीकर
भारद्वाज प्रकाशन, पुणे
श्रीराम रानडे, 'उमेश', १२८/२/१२ कोथरूड,
पुणे (०२०) २५४४८०३८

**पृष्ठे १७६, मूल्य १६७ रुपये**

# ग्रंथपान

'अंतरंग' या संग्रहात विजया राजाध्यक्ष रमेश तेंडुलकरांविषयी लिहितात, त्यांनी सचिनचे वलय स्वतःभोवती खेचून घेतले नाही, आणि स्वतःभोवती स्वतःचे वलय कधी निर्माण होऊ दिले नाही. त्यांच्याच एका कवितेच्या शब्दात सांगायचे तर, 'व्यापक संदर्भ' नकोच होते. त्याना फक्त स्वतःत झुलणारी एक कोवळी– क्वचित दुखरीही डहाळी जपायची होती.'

गंगाधर गाळगीळांचे बोल त्याना दोन पातळीवरील जाणवले,'आता वयाप्रमाणे काही ना काही होत राहणार. ते स्वीकारलं पाहिजे. अजून लिहितो आहे मी. खूप सुचतं. लिहिताना आनंद वाटतो.'

नवसाहित्याच्या काळात नवे निर्माण करत त्या नव्याचे प्रवक्तेपणही करणे, ही दुहेरी भूमिका गाळगीळांनी बजावली. आणि आजूबाजूच्या कितीतरी लेखकांच्या काहीशा दडपलेल्या सर्जनशक्ती बंधमुक्त केल्या

स्वयंपाक करणे, एक विरंगुळा या लेखात त्या म्हणतात,' लेखिका व स्त्री वेगवेगळ्या भूमिका आहेत का? निदान स्वयंपाक या विशिष्ट बाबतीत तरी नाही. तो जसा स्त्रियांना एकमेकीशी जोडतो तसा लेखिकांनाही एकमेकीशी जोडतो. माझे स्वयंपाकावर इतके प्रेम आहे म्हणूनच तर मला 'भातपिठल्याची गोष्ट' लिहिता आली.




कविता ही त्यांची एकमेव मैत्रीण आहे. साद घातली की ती जवळ येते. नाहीतर दूर राहते. ती तिथे आहे हे त्याना ठाऊक असते. ती शुद्ध आहे, मुक्त आहे. अनेक कवींच्या कविता पाठ आहेत. हात मोडला आणि लिहिणे थांबले तेव्हा याच कवितांनी साथ दिली. मर्ढेकरांच्या कवितेच्या आणि अनुषंगाने त्यांच्या अन्य ललितलेखनाचा व समीक्षेचा अभ्यास असलेले दोन खंड प्रसिद्ध झाले. मात्र मर्ढेकरांची भेट झाली नाही. ही टोचणी मागे राहिलीच. साहित्य अकादमीच्या चर्चासत्रानिमित्ताने बँगलोरला जाणे झाले. तिथे 'द लाँग सायलेन्स' ची लेखिका शशी देशपांडे ची भेट झाली. ती भेट म्हणजे आत्मसंवादाची वाट. त्यामुळे आता भिंतींचं भय वाटत नाही, असं त्या म्हणतात. ब्युटी पार्लर मधून चेहरा उजळ करून आले तरी 'यांनी' त्याची दखल घेतली नाही. तेव्हाच कळले, नाते दृढ करण्यासाठी याची आवश्यकता नाही. आताच्या मुलांना सगळं कसे झटपट हवं. त्यांच्या वेगाने आपणाला पळता येणार नाही का? की मागेच राहणार? असा प्रश्न त्या 'ससा आणि कासव' लेखात स्वतःला विचारतात.

विजया राजाध्यक्ष यांचा 'अंतरंग' हा लेखसंग्रह वाचनात आला. तेव्हा प्रत्येक लेखात काहीतरी वेगळेपण जाणवत होते, ते असे. प्रत्येकाची एक एक ओळ घेतली तरी हे टीपण सहज पूर्ण होऊन जाईल असे हे लेख. विजया राजाध्यक्ष यांचं नाव प्रामुख्याने घेतले जाते ते त्यांच्या मर्ढेकरांवरील संशोधना संदर्भात. परंतु त्यांचा खरा पींड आहे तो कथा लेखनांचा. वैदेही पासून अनेक कथा आपल्या वाचनात आहेत. वेगवेगळ्या विषयांच्या, स्वभावांच्या, मानसिकतेच्या. सहज फुलत जाणाऱ्या. ओढ लावणाऱ्या. मनात रूतून बसणाऱ्या. त्याच पद्धतीचा त्यांचा हा लेखसंग्रह. काहीतरी मनात रूजवून जाणारा. प्रथम पुरुषी निवेदनात असल्याने आपुलकीने भरलेला. जणू स्वतःचे अनुभव सांगत असल्यासारखा. स्वतःचे मनोगत व्यक्त करीत असल्यासारखा.

या संग्रहाचे दोन भाग करण्यात आलेले आहेत. त्यातला एक भाग हा १९७४ सालात 'मानिनी'त प्रसिद्ध झालेल्या लेखांचा आहे. तर दुसरा भाग नंतरच्या काळात वेगवेगळ्या नियतकालिकात प्रसिद्ध झालेल्या लेखांचा आहे. या लेखन प्रकाराविषयी त्यानीच मनोगत व्यक्त केले आहे, 'हा एक ऐसपैस साहित्यप्रकार आहे. कथा, कादंबरी, नाटक हे प्रमुख साहित्यप्रकार. ललितलेख हा दुय्यम साहित्याप्रकार मानला जातो तो त्याच्या ऐसपैसपणामुळेच. प्रमुख साहित्यप्रकारांमध्ये लेखकाचा एखादा 'करार' समाविष्ट असतो. कथा–कादंबरीमागे सांगण्याचा करार, कवितेमागे भावविण्याचा करार, नाटकामागे दाखविण्याचा करार, ललित लेखनात सांगणे असते, त्याप्रमाणे भावविणे असते... ललितलेख हे आता प्रचलित झालेले नाव. आरंभीच्या काळात हे लघुनिंबध, गुजगोष्टी यासारख्या नावांनी ओळखले जात असे, हे सर्वपरिचित आहे.'

विजयाबाईंनी स्वतःच लेखनामागचे सूत्र उघड केलेले आहे. तरीही हे लेख वाचत जाताना आपण कुठे जाणार आहोत याचे औत्सुक्य शेवटपर्यंत सोबत करीत राहते. चांगला लेख वाचल्याचा आनंद देत राहते. काळाचे अंतर लेखाच्या खाली दिलेल्या सनावळीवरून लक्षात येते इतकेच. तरीही त्यांच्यातला टवटवीतपणा आजही तसाच जाणवतो. सतीश भावसारांचा अंतरंगातला बहुरंगपर्णी वृक्ष आणि तिथपर्यंत जाणारी नागमोडी वाट, ही कल्पना लेखांच्या प्रवासाला साजेशी असल्याने मुखपृष्ट आकर्षक झाले आहे.

**मूल्य १२५ रु. सवलतीत ७५ रु.**



# ग्रंथपान

निखळ आनंद देणारी पुस्तके शोधून काढावी लागतात. तशी ती सहज उपलब्ध आहेत, जा आणि घेऊन ये, असा सल्ला देणारा कुणी अलिबाबाही सहजपणे भेटत नाही. बरे वाचकांचे मेळावे भरत नसल्याने कुठले पुस्तक तरल असा वाचनानंद देईल, त्याची चर्चाही होत नाही. त्यामुळे वाचकांची मोठीच पंचाईत झाली आहे. अशावेळी विद्या हर्डीकर सप्रे यांचे 'मांजरफन' हे पुस्तक हाती आले. ही अडचण काही अंशी दूर झाली, असे ठामपणे म्हणावेसे वाटते.

विनोदाचे काही प्रकार असतात हे आपण ऐकले ते अ.वा. वर्टी, वि.आ. बुआ आणि पु.ल. देशपांडे यांच्याकडून. त्यांचा निखळ आनंदही घेतला वाचनातून आणि त्यांनी केलेल्या सादरीकरणातून. त्यांचाच धागा पकडून परंतु अधिक खोलवर जाऊन हेमलता अंतरकर यांनी प्रस्तावनेत त्यांची वर्गवारी केली आहे, शब्दनिष्ठ, स्वभावनिष्ठ, व्यक्तिनिष्ठ, प्रसंगनिष्ठ आणि संस्कृतीनिष्ठ. तर हर्डीकर सप्रे स्वतःच्या लेखनाची वर्गवारी करतात, हास्यललिते, तरलललिते आणि सरळललिते अशी. हे आहे लेखाचे पुस्तक. परंतु काही लेख हे कथेच्या जवळ जाणारे आहेत. तर काही कथात्म लेख कथेच्या जवळ जाणारे आहेत. कथा आणि लेख यांच्या सीमा पुसट वाटत असल्याने, त्यांनी या लेखनाला ' लेकथा ' असेही नाव दिले आहे. तसेच या पुस्तकाचे पाळण्यातले नाव 'मांजरपण' असे मनाशी होते. परंतु चित्रकर्तीने ते 'मांजरफन' केले. मग तेच नाव निश्चित झाले, दाखल्यावर नोंदवल्यासारखे. यांचे संदर्भ आपल्याला प्रस्तावना व मनोगतात सापडतील.




मांजरफन हे लेकथांचे पुस्तक. यात आलेली ललिते ही विविधांगी आहेत. ती बरीचशी प्रथम पुरुषी निवेदनात आहेत. यात आलेली स्थळे, वातावरण, संस्कार, आजी, इतर नातेवाईक यांचे संदर्भ, परदेशातात आलेले विविध अनुभव, यामुळे ती लेखिकेच्या जीवनप्रवासाचा भाग म्हणून आत्मचरित्राकडे झुकलेली आहेत, असा भास होतो. त्यांच्यात आलेली उत्कटता, आणि निवेदनातील आपलेपण, हे त्यांचे कारण असू शकते.

लेखिकेच्या शब्दात सांगायचे तर या पुस्तकात २१ ललिते आहेत. प्रत्येकाचा विषय वेगळा, आशय वेगळा, ठेवण वेगळी, तसा प्रसंग व व्यक्ती स्वभावातला गोडवा देखील वेगळा. 'आम्रफलम? चौर्यसफलम' मध्ये भारतातून मागवलेल्या हापूस आंब्याचे वर्णन आहे. त्यात लेखिका लिहितात, 'अख्ख्या प्रवासात मला आंब्याच्या अढीत बसल्याची स्वप्नं पडत होती.' 'पातेली आणि..' मध्ये कढई खरेदी केली, तिचे वर्णन करतात, ' ती धरली कानाला आणि क्यारी ऑन लगेज म्हणून चक्क विमानातून मिरवत आणली.' 'असाध्य ते साध्य' यात कर्करोग झालेल्या माधुरीला साक्षात्कार झाला, ' आपलं आयुष्य वाचवायला आपण आपल्याच आयुष्याचा नैवेद्य दाखवायला हवा.' 'बागवासरी' मध्ये जाईचे रोप बागेत लावले, तिच्या बहराचे वर्णन केले आहे, 'तिच्या वासानं हिरवळ गंधावली आहे.' असे प्रत्येक ललितात वेगळेपण सापडते. हे वेगळेपण केवळ विनोदासाठी आहे असे नाही. 'आठवणी देवचाफेच्या' मधील काव्य आणि भावविश्व याचे वेगळेपण, 'जुईची बाग'मधील अंतर्मुख करणारी वेदना आणि जीवदानाचा आनंद याचे वेगळेपण. 'भूक' मध्ये शिकवलेल्या अपरिग्रहाचे वेगळेपण.

पुस्तकावर लेखिकेचा पत्ता पाहिला तर तो इंग्रजीत आहे, म्हणजे आपल्या बोली भाषेत फॉरेनचा. पुस्तक वाचताना त्यांचा पत्त्याचा पत्ता सापडतो तो अमेरिकेचा. म्हणजे या पुस्तकात येणारी वाक्ये हे मिंग्लिश असण्याची शक्यता खूपच संभवनीय. परंतु या समजाला इतका छेद बसतो की आपणच बापडे ठरतो. मूळचा पिंड मराठी असल्याने तो जराही संकरित झालेला नाही. उलट मराठीच अधिक शुद्ध स्वरुपात उजळलेली दिसते, खडबडीत दगडावर कुऱ्हाडीला धार लावतात, तशी. आपण संगणकाच्या टायपिंग बोर्डला 'कीबोर्ड ' म्हणतो, इथं 'टंकलेखणी' असा शब्द वापरला आहे. इमोशनल ब्लॅकमेलिंग साठी शब्द वापरला आहे, 'भावनिक चपळाई '. 'कॅट सिटर' साठी 'मांजरपालिका'. 'वाटरस्प्रिंकलर' साठी शब्द योजला आहे, जलशिंपाचे नळ. असे कितीतरी शब्द आले आहेत, ते वाचताना आपण त्या शब्दांच्या गंधाने मोहीत होऊन जातो. आणि संभ्रमही पडतो, लेखिका अमेरिकेत आहेत, की पुण्याच्या तुळशीबागेत?

विनोदी लेखनात भाषा त्या त्या प्रकाराप्रमाणे तरल असावी लागते. उगीच ओढाताण करून विनोदाच्या साच्यात बसवता येत नाही. तरच अपेक्षित विनोद साधतो. वाचकाच्या मनाला गुदगुल्या करतो. त्याचवेळी वाचकाला अंतर्मुख करण्याची किमया साधलेली असावी लागते. लेखिकेला ही कला साधली आहे असे म्हणण्यापेक्षा ती त्यांच्यात मुरलेली आहे, असे म्हणणे अधिक योग्य ठरेल. शब्दांचा चपखलपणा आणि वर्णनातील सहजता, ही त्यांची वैशिष्ट्ये आहेत. त्यामुळे हे सारे लेखन वाचत असताना एक प्रसन्न निखळपणाचा आनंद वाट्याला येतो.

मुखपृष्टावर मांजरीचे रेखाचित्र आहे. त्यातून केवळ शीर्षकाची गंमत दिसत नाही, तर मासोळी डोळे, फुलपाखरांचे कान आणि फुलांची माथ्यावरील सजावट, ही चित्रकर्तीच्या कल्पकतेची सुबक निर्मिती म्हणता येईल. ही निर्मिती आहे प्रियांका देसाई यांची. आत रेखाचित्रे आहेत. ती रेखाटलेली आहेत, राधिका देसाई आणि अश्विनी खाडिलकर यांनी.

। **मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**

## ग्रंथपान

आपल्यासोबत असलेल्या माणसांचे सहचर्य इतके असते की, त्यांच्यातले वेगळेपण आपल्या लक्षात येत नाही. आले तरी त्याचा उच्चार ओठावर अवतरत नाही. केवळ माणसांचेच नाही, निसर्गात असलेले डोंगर, जंगले, नद्या, समुद्र अशा अनेक जागा आहेत, ज्यांचा आनंद घेतो, त्यांच्यासोबत बावरतो, आपल्यातेच एक म्हणून सोडून देतो, थोडेसे दूर होताच. उन्हाळा,पावसाळा, हिवाळा यांचीच तऱ्हा तीच. हीच गोष्ट, तारे, चंद्र आणि सूर्याविषयी. दररोज दिसणारे तारकामंडळ तर जणू आपले नाहीच. चंद्र उरला तो अमावस्या-पौर्णिमा आणि तिथीसाठी. आणि सूर्य? जो नित्य उगवतो, मावळतो, ऊन देतो, प्रकाश देतो. बस. त्यापलीकडे त्याचे महत्त्व हे शास्त्रज्ञांच्या प्रयोगशाळेत, आणि अर्ध्यदान, सूर्यनमस्कारापुरते. पुढे? आणखी असणारे महत्त्व आपल्या ध्यानीच येत नाही. मग देवत्व सापडायचे ते कुठून. दगडात देव शोधणारे आम्ही या खऱ्या देवाकडे देव म्हणून कधी लक्षच दिलेले नाही, ना देत आहोत. जो दिसत नाही, त्याचे रूप आम्ही काल्पनिक उभे करून त्याचा शोध घेत राहतो. आणि जो समोर दिसतो, त्याला ओळखण्यात उणे पडतो. हे उणेपण जागृत करण्याचे, खरोखर दिसणाऱ्या देवाचे रूप आहे सूर्य! ज्याची ओळख होते, ती 'सर्वसाक्षी 'या पुस्तकातून. ती करून दिली आहे संजीवनी खेर यांनी.




संजीवनी खेर यांची साहित्य संपदा आपण यापूर्वीच वाचलेली आहे. कथा, कादंबरी, लेख, अनुवाद, असे बहुविध साहित्य जे बहुतांशी संशोधनावर आधारित आहे. समाज, संस्कृती, चित्रपट यांचा वेध घेणारे आहे. पत्रकार, सहसंपादक, लघुपटकार, दूरदर्शनवरील कार्यक्रमांचे संचालन व त्यात सहभाग, अशा विविध भूमिकांमधूनही आपणास त्यांचा परिचय आहे, जो लेखनाच्या इतकाच व्यासंगाचा परिचय देणारा आहे. त्यांचे 'सर्वसाक्षी' हे पुस्तक या परिचयाला आप्तपणात परिवर्तीत करणारे ठरावे.

सूर्य हा देखील सगळ्यांच्या सारखाच कुटुंबातील एक घटक आहे, स्वतः कुटुंबकर्ता आहे. ऋषी कश्यप आणि देवमाता आदिती यांचा हा पुत्र. त्याच्या पत्नीचे नाव संज्ञा, विश्वकर्म्याची कन्या. संज्ञा, राज्ञी, निष्कुंभा, सरन्यू ही सूर्याच्या एका पत्नीचीच चार रूपे. ऋग्वेदात उषा, प्रत्युषा, संज्ञा, छाया या त्याच्या पत्नी असल्याचा उल्लेख आहे, तर मत्स्यपुराणात राज्ञी, सवर्णा, छाया,सवर्चसा अशी पत्नींची नावे आहेत. त्याच्या अपत्यांची नावे वैवस्वत मनू, यम, यमी; अश्विनीकुमार, शनी, सवर्णी, तपती, रेवंत.

सूर्याला अनेक नावे आहेत, तशा अनेक शक्ती आहेत. भारतातील बहुतेक सण त्याच्याशीच बांधलेले आहेत. हल्ली जिचा अनेक कारणाने गाजावाजा झालेला आहे, ती छटपूजा सूर्योपसना आहे. सूर्य प्रकाशदेव आहे, उर्जेचा देव आहे, वरुणाचा कर्ता आहे, सृष्टीचा, आरोग्याचा विधाता आहे, तो अनेक चालीरीती आणि व्रत, सोहळ्यांच्या अग्रभागी आहे. जयपूर आणि दिल्ली येथील जंतरमंतर ही कालमापने सूर्याशी नाते ठेवून तयार केलेली आहेत.

सूर्य हा नित्य दिसणारा देव आहे. परंतु त्याची मंदिरे आहेत का, आणि असतील कुठे आहेत? त्यांची उभारणी कशी आहे. त्याचे अस्तित्व कसे आह, त्याची ओळख ठसवणाऱ्या खूणा कोणत्या आहेत, त्याची पूजा केली जाते ती कशी? या कुतूहलाला प्रेरणा दिली ती ठाण्याजवळील नालासोपारा येथे असलेल्या सूर्यमंदिराने. त्यात भर घातली ती राजापूर तालुक्यातील कशेळीच्या कनकादित्य मंदिराने. तिथे मिळालेल्या ताम्रपटाने. मग त्यातून सुरू झाला शोध महाराष्ट्रात असलेल्या सूर्यमंदिरांचा. त्यानंतर देशभरातील मंदिरांचा. आपल्याला कोणार्कचे सूर्यमंदिर, तेही पडझड झालेल्या अवस्थेतील ठाऊक आहे. परंतु देशभरात अनेक ठिकाणी सूर्यमंदिरे आहेत, महाराष्ट्रातही अनेक ठिकाणी आहेत. नेबरे, संगमेश्वर, खारेपाटण, सिन्नर, लोणार, चाफळ, वेरूळ-भाजा लेण्या, गोवा, गुजरात, राजस्थान, काश्मीर, मध्यप्रदेश, काशी. इतकेच नाहीतर विदेशातही सूर्याची पूजा केली जात असे. तिथेही त्याची मंदिरे असल्याचे संदर्भ आहेत. जपान, इजिप्त, अमेरिका, मेक्सिको, ग्रीक ही त्याची काही उदाहरणे होत.

या 'सर्वसाक्षी' चा शोध घेणे म्हणजे तप्त तेजालाच आव्हान देण्यासारखे. अशा मंदिरांचा, त्यांच्या अस्तित्वाचा शोध घ्यायचा तर प्रत्येक प्रस्तर घासून, अन्वयार्थ उलगडून पाहणे आलेच. त्यासाठी अनेक संदर्भांची पवित्र मंदिरेही उघडून पाहणे अगत्याचे. या विषयातील मठाधिपतींची मदत तर आवश्यकच. आणि शेवटी या सगळ्यांचा समन्वय साधून त्याला मूर्त रूप देणे, न थकता. हे सारेच अथक परिश्रमाचे काम, कल्पना आणि संयम यांची कसोटी पाहणारे. परंतु लेखिकेने हे आव्हान समर्थपणे पेलले आहे. विषय वरवर रुक्ष वाटणारा. तो वाचकाच्या हाती देताना त्याला तो बोजड वाटता कामा नये, ही दक्षता महत्त्वाची. ती त्यांनी घेतली आहे. लेखनातला सहजपणा जसा जपला आहे, तसा विषयाचाही जपला आहे. विषयवार प्रकरणात विभागणी केली आहे. सोबत पुरेसे फोटो दिले आहेत. त्यामुळे पुस्तक केवळ वाचनीयच नाही तर, आकर्षक देखील झाले आहे. मिथक आणि वरवर वाटणाऱ्या कल्पनांना संदर्भांचे कोंदण लाभले आहे. बूट घालणारा देव,हा संदर्भ तर न विसरता येणारा.

सतीश भावसार यांचे प्राचीन प्रतिमा आणि आताचे मंदिर परिसर यांच्या संगमातून साकारलेले रेखीव मुखपृष्ट छानच.

**मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**

# ग्रंथपान

'बेलाग कडे – कपारींनी नटलेली शिखरं पांढऱ्याशुभ्र हिमाच्या पदराआडून खुणावत होती. गिर्यारोहकाच्या विजीगिषू वृत्तीला साद घालणारं दर्शन एखाद्या मदनिकेप्रमाणे घायाळ करणारं होतं. गियारोहकांचं या हिमालयाशी असलेलं नातंच वेगळे आहे. यापुढे प्रेयसीच्या उन्मादक सहवासाची आसही फिकी पडेल. गोठवून टाकणाऱ्या थंडीत धपापणाऱ्या श्वासांसह त्या उत्तुंग आव्हानांना भिडण्याचा, साहसाचा अनुनय करण्यात एक जबरदस्त आसक्ती आहे. एक अस्पर्श्य तृषाग्नी आहे.' गिर्यारोहक असलेल्या प्रत्येकाच्या काळजातून उठणारी स्पंदने कोणती असतील तर ती ही. हिमालयाच्या अंगाखांद्यावर खेळल्याशिवाय त्यांच्या शैशवाला खऱ्या अर्थाने वैभव प्राप्त होत नाही. आणि त्यासोबतीला आपला सह्याद्री, दणकट देशाचा रांगडा आणि तितकाच पित्ततुल्य, तो तर जणू या गिर्यारोहकांना आपल्या हातांचा पाळणा करून जोजवत असतो. अशा सह्याद्री, हिमालय, आणि आस्ट्रियासह संपूर्ण युरोपातील कॅम्पसाईटस् , यांच्याशी घनिष्ठ जिव्हाळा असलेले गिर्यारोहक अनेक आहेत. अनेकांनी त्यांच्या अनुभवांना पुस्तकरुपात शब्दबद्ध केलेले आहे. त्यांच्याशी एकरूप होताना आपणच या कॅम्प्सवर आहोत, इतका समरसतेचा अनुभवही आपण घेत आला आहोत. त्यासारखेच, परंतु त्यातही खूप वेगळेपण जोपासलेले पुस्तक, 'कॅम्प फायर ' आपल्या हाती सोपवले आहे, वसंत वसंत लिमये यांनी.




वसंत लिमये यांचा परिचय यापूर्वीच्या त्यांच्या 'धुंद–स्वच्छंद' आणि 'लॉक ग्रिफिन' द्वारा झालेला आहे. 'हाय प्लेसेस ' च्या व्यवस्थापकीय प्रशिक्षण कार्यक्रमामधून निसर्ग आणि साहसाचे पाठ गिरवलेल्या हजारो व्यक्तींच्या अनुभवातून तो समृद्ध होत गेला आहे. आय आय टी पवई चे विद्यार्थी असलेले लिमये नाट्य, छायाचित्रण या छंदात रमलेले आहेत, परंतु त्यांना ओढ आहे ती या शिखरांच्या सहवासात रमण्याची, त्यांच्यासोबत हितगुज करण्याची, कधी कधी स्वतःची मस्ती जिरवण्याची. महाराष्ट्र हा संपन्न देश आहे, गोविंदाग्रजांच्या कवितेप्रमाणे. गड, किल्ले, पर्वतरांगा, नद्या, ओढे, जंगले आणि समशितोष्ण हवामान. ज्यांच्या सहवासात रमायचे म्हटले तरी एक जन्म पूरणार नाही. अशा सुंदर, रमणीय निसर्गाच्या अंगाखांद्यावर खेळण्यातली मजा काही औरच. यात साहस आहे, धाडस आहे, जिव्हाळा आहे, प्रेम आहे. किती घेशील दो कराने इतकी विपुलता आहे. ज्याचा मनापासून आनंद घेतला आहे तो लिमये यांनी. कॉलेजच्या जीवनात लागलेली ही चटक आणि जीवनाचा अविभाज्य भाग झाली आहे. माथेरान, रायगड, राजगड, सिंहगड, राजमाची अशा ठिकाणांपासून सुरू झालेली भ्रमंती सह्याद्रीच्या सर्व कड्याकपारीतून झाली. हिमालय आव्हान देवू लागला तेव्हा त्याच्याही जंगल, बर्फ, शिखरे यांच्याशी मैत्री जोडली. अनेक जीवघेण्या आणि तितकाच उत्कट साहसाचा आनंद देणाऱ्या अनुभवांनी स्वतःला समृद्ध केले. निसर्ग पाहण्यासाठी, अनुभवण्यासाठी, त्याच्याजवळ जायला हवे, त्याच्याशी एकरूप व्हायला हवे. तरच त्याचे खरे विलोभनीय रूप पाहता येते. लिमये यांनी केवळ भ्रमंती केली नाही, शिखरे पादाक्रांत केली नाहीत, साहसाचे उच्चांक गाठले नाहीत. निसर्गाशी एकरूप झाले आहेत. त्याच्या संवर्धनाचा वसा चालवणारे पाईक झाले आहेत. निसर्ग तुम्हाला काही देतो, तसे तुम्हीही त्याला काही परत केले पाहिजे. नाहीच काही तरी किमान त्याचा ऱ्हास करू नका, इतकी तळमळीची ते हाक देतात. हे सारे आहे ते अनुभवातून आलेले अमृत.

कॅम्प फायर हा प्रकार म्हणजे रात्री लाकडे पेटवून त्याभोवती गप्पागोष्टी किंवा मनोरंजन करण्याची जागा. फारपूर्वीपासून चालत आलेला हा प्रकार, विश्रांतीच्या वेळेतला, पुढचे मनसुबे ठरवण्याचा, श्रम दूर करण्याचा. गिरीभ्रमण, प्रस्तरारोहण, गिर्यारोहण करणाऱ्यांचा तर हा आवडीचा प्रकार. तेच नाव लिमये यांनी त्याच्या या पुस्तकाला दिले आहे. हे पुस्तक म्हणजे त्यांनी केलेल्या गिरीभ्रमणाच्या, गिरीरोहणाच्या आठवणी आहेत. परंतु तेवढेच नाही. या निमित्ताने भेटलेल्या अनेक व्यक्ती, मित्र, निसर्गाची दिसलेली विविध रूपे, गिर्यारोहण करताना घ्यावयाची काळजी, सोबत काय काय असावे ते साहित्य, त्याची तयारी कशी करावी, ग्रुप लिडरची जबाबदारी, नकाशे, दिशाशोधक यांची आवश्यकता, अवजारे, त्या त्या ठिकाणांची माहिती, यांचाही ते तपशील देतात, तेही अनुभवास धरून प्रसंगाचे वर्णन करून. यात अनेक उत्तम तपशीलही संदर्भासाठी उपयुक्त ठरणारे आहेत. गिर्यारोहणाचा इतिहास, त्याचे प्रशिक्षण देणाऱ्य संस्थांची नावे व ठिकाणे, एव्हरेस्ट सर करणारे पहिले शेर्पा तेनसिंग– एडमंड हिलरी आणि या मोहिमेचे नेतृत्व करणारे लॉर्ड जॉन हंट यांची माहिती आणि प्रत्यक्ष या तिघांना भेटण्याचा लाभलेला विलक्षण योग. अशी कितीतरी उपयुक्त माहिती भांडारासारखी आपल्यासमोर खुली करण्यात आलेली आहे. लक्षात राहावेत असे लक्षणीय प्रसंगही खूप आहेत, तिथे पुनर्जन्म झाला, असेच म्हणता येईल.

लिमये हे निष्णात गिर्यारोहक आहेत, त्यासाठी त्यांनी खास प्रशिक्षण घेतलेले आहे. परंतु त्याच जोडीला ते उत्तम लेखकही आहेत. व्यक्ती चित्रण, निसर्ग वर्णन आणि अनुभवांचे कथन किती सहज सुंदरपणे केलेले आहे, वाचताना त्यात आपण हरवून जावे. लेखन लेख स्वरूपात आहे, परंतु प्रत्येक लेखाच्या सोबत सुरेख चित्रे दिलेली आहेत. मुखपृष्ट आणि त्यावर साकारलेले दृष्य उत्तुंग आणि निबिडाच्या जवळ आणून उभे करतात. नीलेश जाधवांची ही कल्पना सुरेख आहे. या सुंदर आठवणींना साजेशी पुस्तकाची निर्मिती ही सुद्धा लक्ष वेधून घेणारी आहे.

। **मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**

# ठाणे बाल वाचकदिन क्षणचित्रे




















भाऊ गावंडे यांना 'वांझुठाव' या कादंबरी लेखनासाठी
पु. य. देशपांडे स्मृती विदर्भ साहित्य संघ पुरस्कार प्रदान.



RNI No. MAHMAR/2013/50137
Postal Registration No. MCW/310/2016 -2018
Published on 10th of Every Month. Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th of Every Month.




मुद्रक, प्रकाशक, संपादक सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.